


नवभारत

मे २००९

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष

द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

नोंदणी क्र. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई – ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

निवेदन

राज्य मराठी विकास संस्था, मुंबई ही महाराष्ट्र शासनाने स्थापन केलेली स्वायत्त संस्था आहे. मराठी भाषा विभागाच्या पत्राप्रमाणे (संदर्भ क्र. मसंस २०१६/प्र.क्र.११५/२०१६/भाषा-२, दि. ३ जानेवारी, २०१७) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे '**महाराष्ट्रातील मराठी संशोधन मंडळ/ संस्थांना अर्थसाहाय्य योजना**' कार्यान्वित करण्यात आली असून या योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील मराठी भाषा, साहित्य व संस्कृती वृद्धिंगत होण्यासाठी काम करणाऱ्या महाराष्ट्रातील मान्यताप्राप्त मंडळ/ संस्थांना अर्थसाहाय्य करण्यात येते.

सदर प्रकल्पांतर्गत प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांना राज्य मराठी विकास संस्थेद्वारे नवभारत मासिकांचे ऑक्टोबर १९४७ ते सप्टेंबर २०१७ पर्यंतच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासाठी अर्थसाहाय्य करण्यात आले होते. याअंतर्गत सदर अंकांचे संगणकीकरण करण्यात आले असून **प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांनी हे अंक जतन केलेले असल्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.**

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर असणार नाही.

अनुक्रमणिका

काय करावं

वाचावं तर अभ्यास आठवतो
रंगवावं तर पसारा होतो
खेळावं तर दमछाक होते
पडावं तर आळस येतो.
गाण्याचा गोंगाट होतो
नाचाचा धिंगाणा होतो
बसावं तर कंटाळा येतो
हसावं तर रागावतील
खावं तर म्हणतील खादाड
उंडारलं तर म्हणतील द्वाड
ओळखा तर मी काय करेन?
काय करू हा विचार सोडेन.

वाकडी वाटचाल

मला वाटले काही जणांची
चाल वाकडी असते

मग कळाले कधीतरी
ती वाट वाकडी असते

शेल सिल्व्हर्टन (१९३०-१९९९) या नावाजलेल्या अमेरिकन कलावंताने लहान मुलांसाठी गाणी व कविता लिहिल्या व त्या अतिशय लोकप्रिय झाल्या.

त्यातील काही कवितांवर आधारीत, संतोष शिंत्रे आणि जयंत गाडगीळ यांच्या 'शेलक्या कविता' या संग्रहातील काही कविता आम्ही दरमहा प्रसिद्ध करणार आहोत. या अंकात दोन कविता दिल्या आहेत.

- संपादक

प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई संचालित मासिक

नवभारत

वर्ष ६२ । अंक ८ । मे २००९
वैशाख/ज्येष्ठ शके १९३१
वार्षिक वर्गणी ३०० रुपये.
या अंकाची किंमत रु. २५/-

नवभारतची भूमिका*

मानवाच्या व मानवसंस्कृतीच्या विकासास व उन्नतीस पोषक होईल अशा प्रकारे महाराष्ट्रीय जीवनाचा व संस्कृतीचा विकास करणे, हे या मासिकाचे ध्येय व उद्दिष्ट आहे.

ध्येयप्रवण व्यक्तींनी स्वोन्नतीच्या हेतुपूर्तीसाठी जे आपले सांस्कृतिक मूल्यमापन ठरविलेले असेल, उच्च वातावरणातील जो अभिजात अनुभव स्वतःच्या साधनेने संगृहीत केलेला असेल, त्याचे दिग्दर्शन हेच संस्कृतिपोषक वाङ्मय होऊ शकते, असा संचालक व संपादक मंडळ यांचा विश्वास आहे.

या मासिकात येणाऱ्या लेखांत कोणत्याही विशिष्ट मताचा, वादाचा, पक्षाचा किंवा पंथाचा प्रचार करण्याचा हेतू नाही.

संचालक व संपादक-मंडळातील सर्व व्यक्ती यांचेही सर्व विषयांत मतैक्य आहे, असे नाही. मानवी जीवनविषयक व सांस्कृतिक मूल्यांसंबंधी सदृश अशा दृष्टिकोणानेच त्यांना एकत्र आणले आहे. तथापि प्रत्येकाचे व्यक्तिवैशिष्ट्य व विचारस्वातंत्र्य यांचा विनाश न होता विकास व्हावा या दृष्टीनेच त्यांचे सहकार्य राहील. प्रत्येक व्यक्ती आपल्या नावाने प्रसिद्ध होणाऱ्या लेखाबद्दलच जबाबदार राहील.

मासिकात प्रसिद्ध होणाऱ्या प्रत्येक लिखाणात सत्य-निष्ठा, संयम आणि सहिष्णुता असतील अशी काळजी घेतली जाईल.

* नवभारत, ऑक्टोबर १९४७, वर्ष १ ले, अंक १ मधील कै० शंकरराव देव यांच्या 'संचालकांचे मनोगत' मधून.

प्राज्ञ पाठशाळा मंडळ
वाई
13/5/2009

संपादकीय पत्रव्यवहार :
संपादक, *नवभारत* मासिक,
द्वारा : प्राज्ञपाठशाळा मंडळ,
वाई - ४१२८०३ (जि. सातारा).

व्यवस्थापकीय पत्रव्यवहार :
घ. वा. जोशी
व्यवस्थापक, *नवभारत* मासिक,
द्वारा : प्राज्ञपाठशाळा मंडळ, ३१५ गंगापुरी,
वाई - ४१२८०३ (जि. सातारा).

अनुक्रमणिका

नवभारत

मे २००९

अनुक्रमणिका

(मुखपृष्ठ : श्री. देवीदास बागुल यांनी आपल्या कॅमेऱ्याने टिपलेल्या 'पिवळा जर्द' या चित्राचे रसग्रहण करणारा श्री. बागुल यांचा लेख या अंकातच वाचावा.)

ज्ञानव्यवहार आणि संशोधन

प्रा. रत्नाकर बापूराव मंचरकर

०१. विज्ञान, धर्म आणि कला

माणसाचं अस्तित्व तसं अर्थशून्य असतं. दिशाहीन असतं. मराठीतील एक थोर कवी बा. सी. मर्ढेकर[०१] म्हणतात,

काळ्या हवेतून
काळेंच विमान
घेतसे उड्डाण
अंधारांत
नाहींत सिग्नल
हिरवे वा लाल
कैंची दिशाभूल
अदृश्यांत

मानवी जीवनाची गती अशी तर्कहीन आणि अज्ञेय आहे. येथल्या काळोखाच्या दिव्याला काजळाचीच वात आहे.

जगून थोडें अखेर मरणें
उघडझांप ही डोळ्यांचीच;[०२]
एवढाच जणू माणसाच्या जगण्याचा अर्थ.

तेव्हा माणसाच्या अस्तित्वाला मुळात अर्थ नसतो. अर्थ प्राप्त होण्याआधी आपले अस्तित्व असते. Existence is prior to essence आणि म्हणून जगण्याला अर्थ प्राप्त करून देण्याची माणसाची धडपड असते. आपलं जगणं म्हणजे एका परीने जीवनार्थाचा शोध असतो. 'being' कडून 'becoming' कडे होणारी ही वाटचाल असते. 'असण्या'तून 'होण्या'कडे होणारा हा प्रवास म्हणजे अस्तित्वाला अर्थ देण्याचा एक प्रयत्न असतो.

क्षणभंगुरता, अर्थशून्यता आणि वेदना यांनी माणसाचं जीवन वेढलेलं आहे. हा अंधार आपल्या प्रज्ञेने आणि प्रतिभेने उजळण्याचा प्रयत्न माणसाने सतत केला आहे. त्याचे तीन मार्ग मला जाणवतात – विज्ञान, धर्म आणि कला. विज्ञान बुद्धिप्रामाण्याने विश्व जाणून घेते आणि माणसाला ते कसे उपयुक्त होईल हे लक्षात घेऊन त्यात परिवर्तन घडविते. बाह्यवास्तवाची यंत्रणा जाणणे आणि मानवी जीवन सुकर होण्यासाठी ती वापरणे; हेच विज्ञानाचे कार्य असते. विज्ञान सत्याचा शोध घेते आणि माणसाच्या आयुष्यात सुख निर्माण करते.

शिवत्वाचा शोध घेत धर्मसाधना माणसाच्या पारलौकिक विश्वाला स्पर्श करते. हे जे बाह्य विश्व आहे त्याच्या अतीत, त्याच्या पलीकडे काही आहे काय? तेच माझ्याही आत आहे का? जे बाहेर आहे ते परमतत्त्व आहे. जे आत आहे ते आत्मतत्त्व आहे. हे दोन्हीही एकरूपच आहे. त्याच्या साक्षीने नीती आणि विवेक यांनी सदाचरण करीत मी माझे जीवन घडवीन. धर्म असा शिवत्वाचा शोध घेतो आणि माणसाच्या मनात समाधान निर्माण करतो.

साहित्य, संगीत, नृत्य, चित्र, शिल्प आणि वास्तू या ललित कला आहेत. या कला सौंदर्याचा शोध घेत या विश्वाला रूपसुंदर करू पाहतात. चराचरात दडलेल्या लावण्याचे लवथवते दर्शन घडवितात आणि माणसाला अपार आनंद देतात.

माणसाच्या जीवनाला अर्थ प्राप्त करून देण्याचे विज्ञान, धर्म आणि कला हे असे तीन मार्ग आहेत. त्यांच्या रूपाने आपण सत्य, शिव आणि सौंदर्य यांची उपासना करतो. त्यामुळे आपले जीवन सुखाने, समाधानाने आणि आनंदाने भरून जाते. अंधाराने माखलेले मानवी जीवन प्रकाशाने उजळून जाते.

०२. ज्ञाननिर्मित मानवी सृष्टी

या प्रकाशाचा एक किरण ज्ञानाचा आहे. विज्ञान, धर्म आणि कला यांच्या पाठीमागे हीच ज्ञानाची शक्ती आहे. आपल्या जीवनाला अर्थ आणि आकार देणारे ज्ञान हे एक महातत्त्व आहे.

ज्ञान म्हणजे जाणणे. आपण सगळेच भोवतालचे जग जाणून घेण्याची धडपड करीत असतो. माणूस हा त्या जगाचाच एक भाग असतो. पण तो स्वतःला जगापेक्षा वेगळा मानतो. स्वतःला ज्ञाता आणि जगाला ज्ञेय

अनुक्रमणिका

मानतो. ज्ञेयाचे ज्ञात्याला होणारे आकलन म्हणजे ज्ञान. ज्ञानाच्या रूपाने जग आणि माणूस पुन्हा एकमेकांच्या जवळ येतात. ज्ञानाने माणसाच्या विश्वाची मर्यादा आखली जाते.

विश्वाचा विस्तार केवढा
या प्रश्नाचे
ज्याच्या त्याच्या डोक्याएवढा[३]

असे उत्तर केशवसुतांनी दिले आहे. माणसाचे जगाविषयीचे ज्ञान जसजसे वाढत जाते तसतसे त्याचे विश्व विस्तारत जाते.

हे विश्व चि माझें घर। ऐसी मति जेयाची स्थिर
किंबहुना चराचर। आपण जाला।।
ज्ञानेश्वरी १२।२११
विचरे विश्व होऊनि। विश्वामाझि।।
ज्ञानेश्वरी २।३६६

अशी ज्ञानाची परिपूर्ण अवस्था श्रीज्ञानदेवांनी उभी केली आहे. डोक्याएवढे विश्व असलेल्या माणसापासून विश्वाएवढे डोके असलेल्या माणसापर्यंत हा ज्ञानाचा प्रवास आहे.

विश्वाचे माणसाला ज्ञान होते ते त्याच्या ज्ञानेंद्रियांनी. त्याद्वारे तो भोवतालच्या विश्वातील स्पर्श, रूप, रस, गंध, स्वाद यांचा अनुभव घेतो. ज्ञानेंद्रियांबरोबरच माणसाच्या आंतरिक मानसशक्तींचाही मोठा वाटा त्याच्या ज्ञानप्रक्रियेत असतो. माणसाला वस्तूंचे ज्ञान होते. निरनिराळ्या वस्तूंच्या परस्परसंबंधांचेही त्याला ज्ञान होते. एवढेच नव्हे तर आपल्याला ज्ञान होत आहे याचीही त्याला जाणीव-अभिज्ञान-होतच असते. या ज्ञानाचे त्याला सामान्यीकरण (generalization) करता येते.

ज्ञानातून निरनिराळ्या संकल्पनांचा उदय होतो. आपण दुसऱ्याचे काही लागतो आणि तोही आपले काही लागतो; या जाणिवेतून जबाबदारीची, कर्तव्याची आणि सहकाराची जाणीव निर्माण होते. समूहात वावरताना आपल्या अधिकाराची जपणूक करण्याची म्हणजे हक्काची कल्पना आणि शेवटी वर्चस्वाची कल्पना उदित होते. आपण दुसऱ्याचे काही लागत नाही; मी केवळ माझेच लागतो; यातून स्वार्थ निर्माण होतो. इतर सगळे माझ्यासाठी आहे, आणि मी त्यांचा भोक्ता आहे असे वाटू लागते. सरंजामशाही, गुलामगिरी, भांडवलशाही, साम्राज्यशाही यांचा जन्म अशा स्वार्थी प्रवृत्तीतून होतो.

ज्ञानामध्ये त्याचा उपयोग करण्याचे सामर्थ्यही अभिप्रेत आहे. मला पोहण्याचे ज्ञान आहे; याचा दुसरा अर्थ मी पोहू शकतो असाही आहे. या प्रकृतिदत्त म्हणजे प्रकृतीने दिलेल्या विश्वामध्ये माणसाने आपल्या ज्ञानाच्या उपयोगाने एक वेगळी मानवी सृष्टी निर्माण केली आहे. विज्ञानाच्या साहाय्याने त्याने माणसाचे जीवन श्रमसुकर करणाऱ्या असंख्य वस्तूंचे एक नवीन जग निर्माण केले आहे. दगडाच्या शस्त्रापासून परग्रहावर जाण्यापर्यंत त्याने मजल मारली आहे. माणसाने निर्माण केलेले हे नवे विश्व केवळ विज्ञानापुरते मर्यादित नाही. सामाजिक नीतिनियम, वेगवेगळ्या सामाजिक संस्था आणि साहित्य-संगीतासारख्या कला या सगळ्यांचाच जन्म माणसाच्या ज्ञानसाधनेतूनच झालेला आहे. ज्ञान हेच माणसाचे सामर्थ्य आहे. ज्ञाननिर्मित मानवी सृष्टी हाच माणसाचा पराक्रम आहे. पुरुषार्थ आहे.

'तमसो मा ज्योतिर्गमय', 'ज्ञानम् एव अमृतम्', 'न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते', 'श्रद्धावान् लभते ज्ञानम्' 'यः क्रियावान् सः पंडितः' यासारख्या वचनातून समाजाने आपली ज्ञाननिष्ठाच व्यक्त केली आहे. आपल्या परंपरेत असा ज्ञानाचा महिमा परोपरीने गायिलेला आढळतो. याचे कारण माणसाचा ज्ञानाचा शोध म्हणजे सभ्यतेचा आणि संस्कृतीचा शोध आहे. त्यामुळे ज्ञान या भूमीत नेहमीच पूजनीय राहिले आहे.

०३. जीवनक्षेत्रे आणि ज्ञानशास्त्रे

माणूस आणि त्याच्या भोवतालचे जग हाच आपल्या ज्ञानाचा विषय आहे. अस्तित्वाची ओढ, भूक आणि वासना या तीन धाग्यांनी माणूस मातीशी बांधलेला आहे. त्याचे शरीर त्याला या भौतिक विश्वाशी जखडून ठेवते. या जड शरीराबरोबरच अतिशय तरल असे मनही माणसाला लाभलेले आहे.

मन एवढं एवढं
जसा खाकसाचा दाना
मन केवढं केवढं?
आभायात बी मायेना[४]

अनुक्रमणिका


असं हे मन म्हणजे जणू देवाला जागेपणी पडलेलं स्वप्न आहे. लौकिकाला पालाण घालून ते नेहमीच अलौकिकाला साद घालीत असते.

जीव ओढतो वरवर जाया चैतन्यापाठीं;
हाय ! सुटेना दृढ देहाची परि बसली गांठी ![०५]

अशी या शरीर-मनाच्या द्वंद्वात होणारी घालमेल एका प्रतिभावंताने व्यक्त केली आहे. शरीर आणि मन या परस्परविरोधी गोष्टी माणसाच्या ठिकाणी एकवटल्या आहेत. त्यामुळे

रात्री दिवस आम्हां युद्धाचा प्रसंग
अंतर्बाह्य जग आणि मन।।[०६]

असा अटळ झगडा माणसाच्या वाट्याला आलेला आहे. अशा या माणसाचे सभोवतालच्या विश्वाशी अनेक प्रकारचे संबंध असतात. ज्ञानक्षेत्रांच्या दृष्टीने महत्त्वाचे असे त्यातील चार संबंध येथे ढोबळपणे लक्षात घेता येतील.



अशा आकृतिद्वारा हे संबंध दाखविता येतील.

आदिमकाळापासून माणसाला परतत्त्वाची ओढ आहे. या दृश्य जगाच्या पलीकडे काही तरी परतत्त्व आहे.

या नदीच्या पार वेड्या यौवनाचें झाड आहे
अमृताचा चंद्र त्याच्या पालवीच्या आड आहे.[०७]

माणसाचे जीवन परिवर्तनशील, क्षणभंगुर आणि सान्त आहे. या जीवनप्रवाहाच्या पैलतीरावर स्थिर, शाश्वत आणि अनादी-अनंत असे परतत्त्व आहे. ह्या परतत्त्वाच्या सामर्थ्यानेच माणसाचे जीवन प्रेरित आणि प्रवाहित होते.

आभाळाच्या पल्याड स्पंदन
टिपरी त्याची ह्या मडक्यांवरि[०८]

असे येथले सारे चलन-वलन त्या परतत्त्वाने होते; ही माणसाची श्रद्धा राहिली आहे. "धर्मविचार ही तशी माणसाच्या ज्ञानकारक शक्तीला आलेली पहिली जाग आहे."[९] त्यातून माणूस आणि परतत्त्व यांच्या संबंधांचा वेध घेणारे निरनिराळे धर्म, त्यांना आधार देणाऱ्या तत्त्वप्रणाली, त्यांच्या अनुषंगाने उभे राहणारे तत्त्वज्ञान, माणसाला मार्गदर्शन करणारे नीतिशास्त्र यांचा उदय झाला.

ज्ञानशाखांचा हा गट म्हणजे नैतिक शास्त्रांचा (Moral Sciences) गट होय. ही शास्त्रे अमूर्त, आदर्श आणि मूल्यप्रधान शास्त्रे आहेत.

माणसाचा एक संबंध भोवतालच्या निसर्गाशी आहे. माणूस निसर्गाचा एक भाग म्हणून अस्तित्वात आला आणि प्रकृतीच्या पसाऱ्यातच वाढला. मानवी सृष्टी या प्राकृतिक सृष्टीवरच अवलंबून आहे. त्यामुळे प्रकृतीच्या विविध घटकांचा शोध घेणाऱ्या विविध शास्त्रांचा उदय झाला. त्यात भौतिक, रसायन, खगोल अशा प्राकृतिक विज्ञानांचा आणि प्राणिविज्ञान, सूक्ष्मजीवविज्ञान, परिसर-विज्ञान अशा जैविक विज्ञानांचा समावेश होतो.

माणूस हा सामाजिक प्राणी आहे. त्यामुळे माणूस आणि समाज यांच्या अंतःसंबंधांचा अभ्यास केला जातो. समाज ही व्यक्तींच्या हितसंबंधांनी बांधलेली व्यवस्था आहे. अधिकात अधिक लोकांना सुखावह ठरणारी - बहुजनहिताय, बहुजनसुखाय अशी व्यवस्था शोधण्याचा आणि निर्मिण्याचा माणूस सतत प्रयत्न करीत आला आहे. त्यासाठी आवश्यक असे समाजवास्तवाचे आकलन करण्याचा प्रयत्न सामाजिक शास्त्रे करतात. त्यात समाजशास्त्र, सामाजिक मानवविज्ञान (Social Anthropology), अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास, मानवी भूगोल यांचा समावेश होतो.

संस्कृतिविज्ञान (Cultural Anthropology), भाषाविज्ञान, तौलनिक धर्मविचार, तौलनिक विधिविचार, ज्ञानविज्ञानविचार, लोकसंस्कृतिविद्या, तंत्रविद्याविचार, शिक्षणशास्त्र, संस्कृतिसमीक्षा, साहित्यसमीक्षा, साहित्यमीमांसा अशा सांस्कृतिक शास्त्रांचाही समावेश वरील गटात करता येईल.

माणसाचा सगळ्यात महत्त्वाचा संबंध त्याच्या स्वतःशी असतो. दत्तवास्तव जगता-भोगता त्याचा अर्थ लावणारे आणि प्रतिक्रिया व्यक्त करणारे मन आणि दत्तवास्तवाचा परिणाम भोगणारे शरीर हे त्यातले दोन

अनुक्रमणिका

महत्त्वाचे घटक त्यांचा अभ्यास करणारी मनोविज्ञानादी शास्त्रे आणि शरीरविज्ञानादी वैद्यकशास्त्रे (Medical sciences) यांचा येथे उल्लेख करता येईल.

गणित आणि तर्कशास्त्र ही आकारिक शास्त्रे (Formal sciences) या विविध शास्त्रांच्या विकासात सहभागी असतात. त्याचप्रमाणे त्यांची व्यवस्था लावण्यासही सहायक ठरतात.

माणूस आणि विश्व यांच्या परस्परसंबंधांचा अभ्यास करणारी अशी अनेक शास्त्रे[१०] आहेत. विगमन-निगमन, विश्लेषण-संश्लेषण आणि तुलना ही या ज्ञानशास्त्रांची आयुधे आहेत. या ज्ञानशास्त्रांच्या पद्धती वेगवेगळ्या आहेत. त्यांची क्षेत्रे वेगवेगळी आहेत.

विश्वाची विविधता ओळखायची असेल, वेगळेपण जाणून घ्यायचे असेल तर ज्ञानाचे विशेषीकरण करावे लागते. शक्य तितके लहान अभ्यासक्षेत्र आखून त्याचा खोलवर वेध घ्यावा लागतो. विश्वाच्या विविधतेमागील समरूपता जाणून घ्यावयाची असेल तर संश्लेषण करावे लागते. निरनिराळ्या ज्ञानशास्त्रांच्या एकत्रित व्यूहातून अभ्यासविषयाकडे पहावे लागते. आजचे बह्वंश अभ्यासक वेगवेगळ्या विषयांचे विशेषज्ञ आहेत. पण त्यांचे अभ्यासविषय एकाच विश्वाशी जोडलेले आहेत. त्यामुळे आपआपल्या विषयांचा अभ्यास करताना इतर ज्ञानशाखांचे साहाय्य घेण्याची गरज जाणवते. त्यातून आंतरविद्याशाखीय ज्ञानसाधना सुरू होते. ज्ञानाच्या आरंभावस्थेत सगळ्याकडे एकजिनसीपणे पाहिले जाई. जसजसे ज्ञान प्रगत होत गेले तसतसे त्यात पृथकत्व येत गेले. आज ज्ञानाच्या प्रगत अवस्थेत पुन्हा एकदा आपण आंतरविद्याशाखीय ज्ञानसाधनेकडे वळत आहोत.

प्रत्येक ज्ञानशाखेला तीन अंगे असतात. प्रत्येक शास्त्राची स्वतःची अशी एक सैद्धांतिक भूमिका असते. प्रत्येक शास्त्रज्ञानाचे वर्तमान जीवनाच्या संदर्भात उपयोजन करावे लागते. या दोन अंगांमध्ये जे जे घडले, बदलत गेले त्यातून त्या त्या शास्त्राचा एक इतिहास आकाराला येतो. ही विविध अंगे लक्षात घेऊनच कोणत्याही शास्त्राचा विचार करावा लागतो. अशा विविध ज्ञानशाखांमधून माणूस व त्याच्या भोवतालचे विश्व यांचे आपले आकलन ग्रंथित झालेले आहे.

०४. ज्ञान आणि संशोधन

ज्ञानाची निर्मिती कशी होते आणि ज्ञान कसे आत्मसात केले जाते या विषयाच्या खोल पाण्यात शिरावयास येथे अवकाश नाही. ढोबळमानाने असे म्हणता येईल की,

यः पठति लिखति पश्यति परिपृच्छति पण्डितानुपाश्रयति।

तस्य दिवाकरकिरणैर्नलिनीदलमिव विकास्यते बुद्धिः।।

जो वाचतो, लिहितो, पहातो, प्रश्न उपस्थित करतो आणि व्यासंगी विद्वानांच्या सान्निध्यात राहतो त्याची बुद्धी सूर्यामुळे विकसित होणाऱ्या कमळासारखी प्रफुल्ल होते. अनुभव, निरीक्षण, प्रयोग, चिकित्सा–चर्चा–चिंतन, श्रवण–पठण, लेखन–वाचन, निदिध्यास या मार्गाने आपण ज्ञान मिळवीत असतो.[११] अशा ज्ञानसाधनेतून सर्वोच्च ज्ञानप्राप्तीचे दोन मार्ग दिसतात. पहिला मार्ग साक्षात्काराचा आणि दुसरा मार्ग संशोधनाचा. यापैकी साक्षात्कार हा अंतःप्रतीतीचा अ–लौकिक मार्ग आहे. दुसरा मार्ग संशोधनाचा. तो लौकिक आणि प्रयत्नसाध्य आहे. या संशोधनाचीच आपण येथे चर्चा करणार आहोत.

प्रत्येक माणूस किंबहुना प्रत्येक जीव आपल्या बरोबर काही ना काही ज्ञान घेऊन येतो. भोवतालच्या वस्तुजाताची व जीवसृष्टीची दखल घेणारी ग्रहण शक्ती त्याच्याजवळ असते. त्याचप्रमाणे त्याला प्रतिसाद देण्याचीही शक्ती त्याच्याजवळ असते. तिचा नंतर अधिकाधिक विकास होत जातो. ज्या ज्ञानासह आपला जन्म होतो त्यास उपजत ज्ञान असे म्हणतात.

उपजत ज्ञानाच्या या शिदोरीच्या आधारावर माणूस स्वतःच्या प्रयत्नाने जे ज्ञान मिळवितो त्यास अर्जित ज्ञान म्हणतात.

इतरांनी शिकविल्यामुळे उपजत व अर्जित ज्ञानात एकसारखी भर पडत राहते. त्यास उपार्जित ज्ञान म्हणतात.

उपजत, अर्जित आणि उपार्जित मिळून माणसाचे ज्ञानसंचित सिद्ध होते. भाषेच्या साहाय्याने माणूस आपले ज्ञान दुसऱ्या माणसापर्यंत पोहोचवू शकतो. भाषा लिपिबद्ध झाली की एका पिढीचे ज्ञान दुसऱ्या पिढीपर्यंत

पोहचविणे सुलभ होते. एका पिढीचे ज्ञान दुसऱ्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या यंत्रणेला शिक्षण म्हणतात.

अशा साऱ्या ज्ञानसंचिताच्या साहाय्याने आपण जीवन जगत असतो. येणाऱ्या अडचणी सोडवीत असतो. पण काही वेळा आपापल्या क्षेत्रात काम करीत असताना आपल्यासमोर असे काही प्रश्न उभे राहतात की आपल्याजवळ असलेल्या ज्ञानसंचिताच्या आधाराने ते सोडविता येत नाहीत. आपल्या ज्ञानाच्या मर्यादा आपल्याला कळतात. अशा वेळी त्या त्या क्षेत्रात चिकित्सक वृत्तीने आणि विशिष्ट कार्यपद्धती वापरून आपल्याला नवे ज्ञान मिळवावे लागते. मागील पिढीच्या ज्ञानसंचितात नव्या पिढीकडून अशी जी मौलिक भर टाकली जाते तिला संशोधन असे म्हणतात. या संशोधनाने उपस्थित झालेल्या प्रश्नांची सोडवणूक करता येते. अडथळ्याविना जीवनप्रवाह पुढे वाहू लागतो.

त्यामुळे कोणत्याही प्रगत समाजात शिक्षण देणाऱ्या आणि संशोधन करणाऱ्या संस्था असाव्या लागतात. या संस्थांच्या कार्यक्षमतेवर त्या समाजाची प्रगती अवलंबून असते.

०५. संशोधन आणि शिक्षण : ऐतिहासिक परिदर्श

येथे आपल्या समाजाच्या संदर्भात थोडा विचार करता येईल. भारतीय परंपरेत ज्ञान हे स्वतंत्र मूल्याची प्रतिष्ठा असलेले तत्त्व आहे. ज्ञान या भूमीत नेहमीच पूजनीय राहिले आहे.

तथापि, वर्णाश्रमधर्माप्रमाणे पुरुषार्थसाधना करणाऱ्या येथल्या समाजव्यवस्थेत ज्ञान अनेक मर्यादांनी बांधले गेले. ज्ञान तत्त्वतः त्रैवर्णिकांना मुक्त होते. पण प्रत्यक्षात त्याचे अध्ययन-अध्यापन ब्राह्मणवर्णापुरतेच होत राहिले, जातिव्यवस्थेची पकड दहाव्या शतकानंतर क्रमाक्रमाने अधिक पोलादी होत गेली. त्यामुळे भारतीय ज्ञानसाधनेची जीवननिष्ठ परंपरा दुभंगली. परिणामतः मुळात सर्वांगीण ज्ञानाची साधना करणारा विद्वान ब्राह्मण कृषिसंस्कृतीत केवळ पंचांग पाहून पावसाची नक्षत्रे सांगणारा ज्योतिषी बनला. लौकिक व्यवहाराशी त्याच्या ज्ञानाचा संबंध उरला तो धार्मिक कर्मकांडापुरता. कोणत्या तिथीला किती लोकांना जेवायला बोलवावे, विशिष्ट विधीच्या वेळी द्रोण उलथा ठेवावा की पालथा ठेवावा, एवढ्यापुरतेच त्याचे ज्ञान मर्यादित झाले. धर्मसंबद्ध अमूर्त तत्त्वसंकल्पनांच्या चिंतनाच्या दिशेनेच त्याच्या ज्ञानाचा विकास झाला. बाकीच्या जीवनक्षेत्रांशी त्याच्या ज्ञानाचा संबंध येऊ शकला नाही.

याउलट जी माणसे शेतात नांगर हाकीत होती, वस्त्रे विणीत होती, भांडी घडवीत होती त्यांना या तऱ्हेच्या बौद्धिक शिक्षणाचा अधिकार नाकारला गेला. त्यांच्याजवळ प्रत्यक्ष जीवनाचा विराट अनुभव होता. पण त्या अनुभवाचा अर्थ लावणारी ज्ञानदृष्टी त्यांच्याजवळ नव्हती. याउलट जीवनाच्या प्रत्यक्ष अनुभवापासून दूर राहिल्याने आमच्या पंडितांचे ज्ञान वाहते राहिले नाही. ते साचेबंद बनले. अशा प्रकारे जातिनिष्ठ समाजव्यवस्थेचा परिणाम म्हणून जीवन आणि शिक्षण यांची फारकत झाली. आमचे ज्ञान खुरटले, कला पांगळ्या झाल्या आणि समाज दुभंगला.

आपल्या समाजाचा खूप मोठा भाग ज्ञानापासून वंचित राहिला. याचा दुसरा परिणाम असा झाला की ज्ञानच स्थितिशील बनले. व्यवसायनिष्ठ जातिव्यवस्थेमुळे व्यावसायिक ज्ञान आणि तंत्रकौशल्ये कौटुंबिक पातळीवर वंशपरंपरागत पद्धतीने संक्रांत होत गेली. जातीमुळे व्यवसाय स्पर्धामुक्त होते. त्याचा परिणाम म्हणून व्यावसायिक ज्ञानामध्ये प्रयोगशीलतेपेक्षा परंपराप्रामाण्य अधिक होते. जे परंपरेने चालत आले, ते टिकवून धरणे एवढेच त्यांना शक्य झाले. त्यामुळे बहुजनांचे ज्ञानही साचलेल्या डबक्यासारखे झाले. प्रत्यक्ष जीवनसंबद्ध अनुभवांपासून तुटल्यामुळे अभिजनांचे ज्ञानही वाहते राहिले नाही. ज्ञान आणि जीवनानुभव यांची फारकत झाल्यामुळे एकूण ज्ञानच मर्यादित झाले. एका जातीचे ज्ञान दुसऱ्या जातीला नव्हते. त्यामुळे ती ती विद्या, कला आणि ज्ञान त्या त्या जातीच्या कोंडाळ्यात बद्ध झाले.

गोपाळ हरी देशमुख तथा लोकहितवादी लिहितात, "सर्व कसबी लोक लोहार, सुतार, तांबट हे बापाच्या विद्येच्या पलीकडे जातच नाहीत. त्यामुळे त्यांची कारागिरीसुद्धा तीन हजार वर्षांपूर्वी होती तशीच आज आहे. तीत अणुमात्र प्रगती झालेली दिसत नाही. नवीन कल्पना यांना सुचत नाहीत. तांबट पूर्वी जसा तांब्या करीत होते तसाच आजही करतात... काही अधिक कल्पना

कोणी चालविली नाही."[१२] "जे जाते व्यासाच्या वेळेस होते तेच आता आहे. जो नांगर पांडवांचे वेळी होता, तोच आता आहे."[१३] ज्याला वर ज्ञानाची स्थितीशीलता म्हटले आहे त्याचाच हा परिणाम होता.

व्यवसायनिष्ठ, विषमताप्रधान जातिव्यवस्था आणि तिचे जाचक निर्बंध यामध्ये ज्ञानाच्या या दुरवस्थेची बीजे आहेत; असे वर दाखविले आहे. लोकहितवादींनी या संबंधी एक महत्त्वाचे कारण समोर आणले आहे. ते म्हणतात, "पहिले ऋषी ज्यांनी हे ग्रंथ लिहिले ते सर्व देवावताराच होते व त्यांनी केले तसे मनुष्यजातीच्याने होणार नाही. आपला धर्म इतकाच की पूर्वीच्यांनी जे करून ठेविले तितके मात्र शिकावे. त्याजवर नवीन कल्पना काढू नये. काढली तर देवांचा अपमान होतो व जे काय आहे ते त्यात आहे अशी समजूत पडून लोक अगदी मूर्ख झाले."[१४] अशाप्रकारे आपले पूर्वज सर्वज्ञ होते. त्यांनी सांगितले तेवढे करावे. त्यातच भलाई आहे. असे मानले की नवे काही शोधण्याची उर्मी नाहीशी होते. त्यामुळे मध्ययुगात आपल्याकडे संशोधनाची आबाळ झाली.

एकोणिसाव्या शतकाने मध्ययुगाचे भरतवाक्य गायिले आणि नव्या युगाची नांदी आळविली. पण तसे करताना लंबकाचा झोका उलट्या दिशेला दुसरे टोक गाठणारा ठरला. पाश्चात्त्य विद्येच्या प्रभावाने आपली ज्ञान, कला आणि शास्त्रे झाकाळून गेली. पाश्चात्त्य विद्या विविधांगी, लौकिक व्यवहारास साहाय्यकारी आणि अनुभव व प्रयोग यावर आधारलेली होती. तुलनेने भारतीय विद्या ऐहिक जीवनात प्रत्यक्ष मार्गदर्शन न करणारी, एकारलेली आणि पारंपरिक होती. लॉर्ड मेकॉलेसारख्यांच्या मते भारतीय ग्रंथ ज्या कागदावर छापले जातात त्या कागदाच्या किंमतीचेही ते नसतात. या ग्रंथात जे आहे ते सारे त्याज्य, टाकाऊ व हास्यास्पद आहे. हाच ठसा घेऊन आपण आपल्या ज्ञानपरंपरेकडे पाठ फिरविली. अजिंठा-वेरुळची लेणी कोरणारी, ताजमहाल आणि कोणार्क बांधणारी विद्या, वर्णनात्मक भाषाविज्ञान, अर्थनिर्णयमीमांसा, न्याय-तर्क-औषधिविज्ञान गणित, खगोलशास्त्र असं सारे सारे आपण निरुपयोगी ठरवून टाकले. वसाहतवादाच्या प्रभावाने आपण कोण आहोत हेच आपणास कळेनासे झाले. मागे काहीच नव्हते आणि आता आपल्यालाच सारे काही केले पाहिजे; असे वाटू लागले. त्याचा परिणाम म्हणून शिक्षणाची आबाळ झाली. मागील विद्याधन पुढील पिढीपर्यंत पोहोचते करण्याची गरजच वाटेनाशी झाली. त्यामुळे आपल्या पारंपरिक विद्या-कला व शास्त्रे यांचा लोप होऊ लागला.

अशा प्रकारे आपल्या संशोधनाची आबाळ झाली आणि शिक्षणाच्या वाटा तर खुंटलेल्याच होत्या. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आपल्याला ज्ञानाच्या सामर्थ्याचा साक्षात्कार झाला. शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचे प्रयत्न ध्येयवादी वृत्तीने आणि समर्पित भावनेने केले गेले. महात्मा फुले, राजर्षी शाहू, महर्षी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील, पंजाबराव देशमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या लोकधुरीणांनी ज्ञानाचे लोकशाहीकरण केले. त्यातून एक नवा सुशिक्षित भारत वाढू-घडू लागला. त्याचा आपण एक भाग आहोत.

स्वातंत्र्यानंतर शिक्षणाच्या विस्ताराबरोबर त्याचा कसही वाढला पाहिजे; ही जाणीव तीव्र झाली. संशोधन-शिक्षणासाठी सुसज्ज यंत्रणा आकाराला आल्या. आज शिक्षण आणि संशोधन यांना उधाण आलेले आहे. पण हा वरवरचा देखावा आहे. त्यातला पोकळपणा आपल्याला जाणवतो. तुकोबांच्या शब्दात सांगायचे तर "माप आणि गोणी दोन्ही रिती" असा हा प्रकार आहे. गोणीतून मापाने दिले जात आहे; पण गोणीतही काही नाही आणि मापातही काही नाही. केवळ देण्या-घेण्याचा अभिनय तेवढा चाललेला आहे. आपल्या शिक्षणाची आणि संशोधनाची स्थिती अशीच काहीशी आहे.

मराठीमध्ये दरवर्षी शंभर प्रबंधांना पी. एच. डी. दिली जाते. पण त्यातील दोन प्रबंधही प्रकाशित होत नाहीत. भारतामध्ये तीनशेहून अधिक विद्यापीठे आहेत. पंधराशेहून अधिक प्रयोगशाळा आहेत. त्यावर अब्जावधी रुपयांचा खर्च होते. आणि तरीही तंत्रज्ञान-विज्ञान या क्षेत्रात आंतरराष्ट्रीय पातळीवर भारत नगण्य आहे. जागतिक पातळीवरील संशोधनात चीनचा वाटा सहा टक्के आहे तर भारताचा वाटा अवघा दोन टक्के आहे. एका बाजूने ढिगाने संशोधन होत आहे. दुसऱ्या बाजूने समस्या कायमच आहेत.

अशा वेळी संशोधन आणि शिक्षण कसदार कसे होईल यासाठी ज्ञानसंस्थांनी वेगवेगळे उपक्रम हाती

घेतले पाहिजेत. संकल्पनांची स्पष्टता हा त्यातला एक आवश्यक टप्पा आहे.

कोणत्याही संकल्पनेचा विचार दोन पातळ्यांवर केला जातो. विशिष्ट क्षेत्रात त्या संकल्पनेच्या अनुरोधाने प्रत्यक्षात काय घडत आहे, ही एक पातळी होय. या प्रत्यक्षाच्या पातळीला ऐतिहासिक अक्ष म्हणता येईल. दुसऱ्या पातळीवर त्या संकल्पनेची तात्त्विक मांडणी करण्याचा प्रयत्न केला जातो. या पातळीला रूपात्मक अक्ष म्हणता येईल.

या दोन्ही पातळ्यांवरील विचार परस्परविरोधी नसतो. तो परस्परांना पूरक असाच असतो. पहिल्या पातळीवर काही मौलिक तथ्यांपर्यंत पोहोचावयाचे असेल तर दुसऱ्या पातळीवर आधी काही विचार करणे आवश्यक ठरते.

येथे आपण 'संशोधन' ही संकल्पना विषयनिरपेक्ष पद्धतीने समजून घेण्याचा प्रयत्न करणार आहोत.

०६. शोधवृत्तीचे शास्त्रीय वळण

शोधवृत्ती मानवी संस्कृतीच्या आरंभकाळापासून दाखविता येते. तथापि तिचे शास्त्र तयार झाले ते अर्वाचीन कालखंडात.

प्राचीन आणि मध्ययुगीन जीवनजाणीव ही अलौकिक, चैतन्यवादी आणि ईश्वरकेंद्रित होती. त्यामुळे मानवी जीवन आणि सृष्टी ईश्वरी योजनेने नियंत्रित होते असे मानले जाई. प्रत्येक घटित हे दैवी आहे; असे मानून त्याचा श्रद्धापूर्वक स्वीकार केला जाई.

आधुनिक जीवनजाणीव ही इहवादी, जडवादी आणि मानवकेंद्रित आहे. त्यामुळे पुनरुज्जीवनाच्या कालखंडापासून घटितांकडे भौतिक म्हणून पाहिले जाऊ लागले. त्याची चिकित्सा होऊ लागली. शोध घेतला जाऊ लागला. ॲडम हा जगातला पहिला पुरुष. त्याला एकाकी अवस्थेत करमेना म्हणून देवाने ॲडमच्या डाव्या बरगडीपासून जगातली पहिली स्त्री निर्माण केली. हीच इव्ह असे बायबलचे प्रतिपादन होते. त्यामुळे पुरुषांना स्त्रियांपेक्षा एक बरगडी कमी असते; अशी समजूत प्रचलित होती. पुनरुज्जीवनाच्या काळात प्रत्यक्ष बरगड्या मोजून स्त्री-पुरुषांना सारख्याच बरगड्या असतात; असे दाखवून देण्यात आले.

अशा प्रत्यक्ष प्रमाणाने सत्यता पटविण्याची पद्धत हळूहळू रूढ होऊ लागली. निरीक्षण, प्रयोग, गणिती सिद्धांतन अशी शास्त्रीय अध्ययनाची तर्कशुद्ध पद्धती रुजविणारा पहिला मोठा शास्त्रज्ञ म्हणून गॅलिलिओ गॅलिलीचे (इ. स. १५६४ ते १६४२) नाव घेतले जाते. हा इटालियन शास्त्रज्ञ गणिती, खगोलज्ञ आणि भौतिकविद् होता. बायबलप्रणीत भू-केंद्रित विश्वाची कल्पना किंवा ॲरिस्टॉटलसारख्या (इ.स.पू. ३८४-३२२) महापंडिताचे शेकडो वर्षे प्रमाण मानले गेलेले सिद्धांत त्याने पुराव्याने खोडून काढण्याचे धैर्य दाखविले. आयुष्यभर ज्ञानसाधना करून त्याने अनेक मौलिक शोध लावले. त्याच्या संशोधनाने आयझॅक न्यूटनला गुरुत्वाकर्षणाच्या शोधाला प्रवृत्त केले. आपल्या क्रांतिकारी सिद्धांतांची किंमत प्रसंगी कारावास भोगूनही त्याने चुकती केली.

सतरा वर्षांचा गॅलिलिओ चर्चमध्ये बसलेला होता. चर्चच्या छताला टांगलेला दिवा वाऱ्याने हलता होता. त्याच्या सावलीचे त्याने काळजीपूर्वक निरीक्षण केले. नाडीचे ठोके मोजून त्याने झोक्याचा आंदोलनकाल नियमित असतो हे जाणले. यात दोरीची उंची, दोरीला टांगलेले वजन आणि आंदोलनाचा पल्ला असे तीन चल घटक होते त्यापैकी दोन घटक तसेच ठेवून प्रत्येक वेळी त्याने एकेका घटकामध्ये बदल करून पाहिला. त्यावरून दोरीच्या उंचीच्या वर्गमुळाच्या प्रमाणात झोक्याचा आंदोलनकाल बदलतो; असे त्याने दाखविले. लंबकाच्या समकालैक्यतेचा सिद्धांत त्याने मांडला (इ. स. १५८१) तेव्हा तो अवघ्या सतरा वर्षांचा होता. त्यातून घड्याळामध्ये लंबकाचा वापर करण्याची कल्पना सुचली. त्यासाठी आवश्यक असे गणित मात्र त्याने थेट वयाच्या एक्काहत्तराव्या वर्षी (इ.स. १६३४) शोधून काढले. त्यावेळी तो कारावासातून मुक्त होऊन एकांतवासाची शिक्षा भोगत होता. तो डोळ्यांनी आंधळा आणि कानांनी बहिरा झालेला होता. तशाही स्थितीत त्याची ज्ञाननिष्ठा आणि शोधवृत्ती कायम होती. वैज्ञानिक संशोधनाची प्रायोगिक पद्धती अशा संशोधकांनी निर्माण केली.

सत्यशोधनासाठी अतिशय सजग असे मन असावे लागते. कोणत्याही गोष्टीच्या मुळाशी जाण्याचे कुतूहल, पाठपुरावा करण्याची चिकाटी, त्यासाठी परिश्रम

करण्याची तयारी, उपलब्ध तथ्यांचा अर्थ लावण्याची प्रज्ञा, अकल्पनीय जे आहे त्याचा वेध घेणारी कल्पक प्रतिभा आणि अनाग्रही सत्यनिष्ठा असावी लागते. झाडावरून फळ खाली पडताना कित्येकांनी पाहिले असेल आणि 'पडत्या फळाची आज्ञा' समजून ते गट्टही केले असेल. पण एखादाच आयझॅक न्यूटन त्या पडणाऱ्या फळाचा मागोवा घेत गुरुत्वाकर्षणाच्या महासिद्धांतापर्यंत पोहोचतो. उकळलेल्या दुधाच्या वाफेने पातेल्यावरील झाकण थडथडते हे रोज दिसणारे दृश्य आहे. पण त्यातून वाफेच्या शक्तीचा शोध घेणारा आणि तिचा उपयोग करणारा जेम्स वॅट एखादाच असतो. या प्रतिभावंत संशोधकांनी रोज दिसणाऱ्या साध्यासुध्या घटनांचा नवा अर्थ लावला आणि जगावर परिणाम करणारी महासत्ये शोधू काढली.

गणित, भूमिती, यामिकी (प्रेरणांची वस्तूवर होणारी क्रिया व त्यामुळे निर्माण होणारी गती यांचा अभ्यास करणारे शास्त्र) आणि अभियांत्रिकी या चार क्षेत्रांमध्ये आर्किमिडीजने (इ.स.पू. २८७ ते २१२) मौलिक संशोधन केले. त्याचे काही लेख दोन हजार वर्षे प्रमाण मानले गेले. सेरेक्यूजचा राजा दुसरा हीरो आणि त्याचा मुलगा गेलो यांच्याशी त्याची चांगली मैत्री होती. सोनाराने तयार केलेल्या सोन्याच्या मुकुटात चांदी मिसळलेली आहे; असा राजाला संशय आला मुकुट न मोडता भेसळ शोधून काढण्याचे काम राजाने आर्किमिडीजवर सोपविले. आर्किमिडीजने त्यावर पुष्कळ विचार केला पण हा प्रश्न कसा सोडवावा ते त्याला कळेना. त्या तंद्रीतच स्नानासाठी तो टबमध्ये बसला. त्याबरोबर भरलेल्या टबमधील पाणी बाहेर ओसंडले. त्यासरशी कोडे सुटल्याचा आर्किमिडीज-ला साक्षात्कारी आनंद झाला. त्या आनंदाने बेभान होऊन, तशाच अर्धनग्न अवस्थेत 'युरेका', 'युरेका' असे ओरडत तो सिरॅक्युजच्या राजमार्गावर धावत सुटला. संशोधन-क्रियेत होणारी उकल अशी कधी अकस्मात होते. अर्थात त्यामागे दीर्घकाळाचे चिंतन असावे लागते तरच असा साक्षात्काराचा क्षण अनुभविता येतो. वस्तूचे वस्तुमान आणि त्यामुळे बाहेर पडणारे पाणी यांचा एक संबंध आर्किमिडीजने शोधून काढला. त्यामुळे मुकुटाच्या सोन्यातील भेसळही ठरविता आली. यानिमित्ताने वस्तुमुळे होणारे पाण्याचे अपसरण आणि जलाची उद्धरणशक्ती यामागील तत्त्व त्याला सापडले.

आता आपल्याकडचे उदाहरण पहा. श्रीविठ्ठल ज्याच्यासाठी आले त्या पुंडलिकाचे मंदिर पंढरपुरात चंद्रभागेच्या काठी आहे. मंदिराच्या समोर एक छोटे जलकुंड नदीपात्रातच आहे. दगड पाण्यात तरंगत नाही हे आपल्याला माहीत आहे. पण या जलकुंडात चक्क एक लहानशी दगडी नाव रंगताना दिसते. ही नाव चंद्रभागेत सोडीत नाहीत तर विशिष्ट आकारमानाच्या जलकुंडातच सोडतात, हे लक्षात घेण्यासारखे आहे. याचा अर्थ असा की ज्याने ही नाव आणि कुंड तयार केले त्याला दगडी नावेचे वस्तुमान आणि विशिष्ट आकाराच्या जलकुंडातील पाण्याची उद्धरणशक्ती यांचा संबंध निश्चितच कळलेला होता. तो आर्किमिडीजसारखाच प्रतिभावंत शास्त्रवेत्ता असणार. पण त्याने आपल्या ज्ञानाचा उपयोग दैवी चमत्काराचा भास निर्माण करून अधिक दक्षिणा मिळविण्यासाठीच केला. याउलट ग्रीकांनी त्याच ज्ञानाचा वापर करून मोठ्या जहाजांची बांधणी केली. त्यामुळे नवे भू-प्रदेश परिचित झाले, व्यापारात वाढ झाली आणि साम्राज्याचा विस्तार झाला. मुद्दा असा की संशोधनाचा उपयोग तुम्ही कसा करता यावर तुमच्या संस्कृतीची प्रगती किंवा परागती ठरत असते.

०७. संशोधनाची समस्यामूलकता :

संशोधन हा काही कृत्रिम असा लादलेला उद्योग नाही. ती जीवनाशी संबद्ध अशी अभिक्रिया आहे.

आपल्या भोवतालच्या जगाशी माणसाचे नाते गुंतागुंतीचे आणि अनेकपदरी असते. ते जाणून घेण्याच्या मूलभूत जिज्ञासेतून शोधवृत्तीचा उगम होतो. माणूस हा मुळात विचार करणारा प्राणी आहे. आहे त्या स्थितीत त्याला समाधान वाटत नाही. जे अज्ञात आहे ते ज्ञात करून घेण्याची त्याला ओढ असते. जीवन जगत असताना त्याला काही अडचणी जाणवतात. त्या सोडविण्याच्या गरजेतून शोध जन्माला येतात. संशोधन असे समस्यामूलक (Problem - oriented) असते. कोणत्याही संशोधनाच्या मुळाशी जीवनप्रवाहाला अडथळा आणणाऱ्या प्रश्नाचा उलगडा करण्याची असोशी असते.

पंधराव्या शतकापासून युरोपीय देशांना भारताकडे जाणारा जलमार्ग शोधावयाचा होता. कोलंबस, फर्दिनांद द मॅगेलिन, सर फ्रान्सिस ड्रेक, वास्को द गामा

अशा धाडसी दर्यावर्द्यांच्या चित्त थरारक साहसी सफरी आपल्याला माहीत आहेत. मृत्यूचा प्रदेश म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अज्ञात अशा पॅसिफिक महासागरात त्यांनी जिद्दीने आपल्या नौका हाकारल्या. २० मे १४९८ रोजी त्यांना अखेरीस भारताचा शोध लागला. भारताकडे जाणारा जलमार्ग शोधण्याची एवढी तातडी का होती? भारत आणि युरोप यांना जोडणारा रस्ता फार प्राचीन काळापासून युरोपियनांना माहीत होता. तथापि अरब आणि ख्रिश्चन यांच्यातील संघर्षामुळे हा भू-मार्ग बंद झाला होता. भारताशी स्वतंत्रपणे व्यापारी संबंध निर्माण करण्यासाठी युरोपियनांना जलमार्गाची गरज होती. हा व्यापार मुख्यत: मसाल्याच्या पदार्थांचा होता. खरे तर त्यांच्या आहारात मसाल्यांचा वापर फार कमी असतो. मग हे मसाल्याचे पदार्थ त्यांना कशासाठी हवे होते? युरोपात हिवाळा दीर्घकाळ असतो. नवे अन्न मिळविणे अवघड असते. अशा वेळी शिकारीचे मांस टिकवून ठेवायचे तर मसाल्यांचा वापर आवश्यक होता. हा त्यांच्या रोजच्या जगण्याचा प्रश्न होता. त्यामुळे त्यांना भारताच्या शोधाची तातडी होती. अशा प्रकारे कोणत्याही शोधाच्या मुळाशी कोणता ना कोणता प्रश्न असतो. कोणती ना कोणती गरज असते.

त्यामुळेच गरज ही शोधाची जननी आहे; असे म्हटले जाते. कोळशाच्या खाणीत निसर्गत: मिथेन व इतर हायड्रोकार्बने असतात. त्यांच्या मिश्रणामुळे अचानक स्फोट होत असत. अनेक खाणकामगार अशा वेळी मृत्युमुखी पडत. या प्रश्नावर तोडगा म्हणून या वायूंचे असितत्व दाखविणारा दीप सर हंफ्रे डेव्ही (इ.स. १७७८ ते १८२९) या इंग्लिश रसायनशास्त्रज्ञाने शोधून काढला. या जीवनदायी संशोधनाने अनेकांचे प्राण वाचले.

व्यवस्थापन हे आजचे वाजतेगाजते ज्ञानक्षेत्र आहे. या ज्ञानक्षेत्रात संशोधन कसे सुरू झाले? 'सॅटर्डे इव्हिनिंग पोस्ट' हे लंडनमधील एक साप्ताहिक. विशेषत: नोकरी करणाऱ्या मध्यमवर्गीय स्त्रीपुरुषांमध्ये खप असणारे लोकप्रिय साप्ताहिक. 'कँपबेल' कंपनीच्या तयार सूपच्या जाहिराती त्यात हमखास येत. साप्ताहिकाचा पंचाहत्तर टक्के खर्च त्यातून भागत असे. त्यामुळे 'सॅटर्डे...' च्या दृष्टीने 'कॅम्पबेल' ही खूपच महत्त्वाची कंपनी होती. पुढे असे झाले की कंपनीचे व्यवस्थापन बदलले. नव्या व्यवस्थापनाने असा विचार केला की आपले सूप हे श्रीमंतांनाच परवडणारे आहे. तर मग मध्यमवर्गासाठी असणाऱ्या साप्ताहिकात जाहिरात देऊन काय उपयोग? त्यामुळे त्यांनी 'सॅटर्डे...' बरोबरचा जाहिरातीचा करार रद्द केला. इकडे 'सॅटर्डे...'चे संचालक--संपादक अडचणीत आले. कंपनीची केवळ विनवणी करून भागणार नव्हते. आपल्या विनवणीला भक्कम आधार देण्याची गरज होती. त्यामुळे त्यांनी सूपचे ग्राहक नेमक्या कोणत्या आर्थिक स्तरातील आहेत; याचा शोध घ्यायला सुरुवात केली. त्यासाठी त्यांनी शहराच्या श्रीमंत आणि मध्यम वस्तीत एकेक गोडावून घेतले. घरोघर जाऊन सूपचे रिकामे डबे गोळा केले. दोन्ही गोडावूनमधील डब्यांची मोजदाद केली. तेव्हा असे आढळून आले की श्रीमंत वस्तीतील गोडावूनमधील डब्यांपेक्षा मध्यमवर्गीय वस्तीतील गोडावूनमधील डब्यांची संख्या आठ पटीने जास्त आहे! हा निष्कर्ष 'सॅटर्डे.....'ला दिलासा देणारा तर 'कँपबेल' ला धक्का देणारा होता. कॉमनसेन्सने जी गोष्ट पटते ती संशोधनाने एकदम चुकीची ठरविली. त्यामुळे हे सूप महाग असूनही मध्यमवर्गीय माणसे का घेतात आणि श्रीमंत का घेत नाहीत; असा कंपनीला प्रश्न पडला. त्यांनी या प्रश्नाचा शोध घेण्यास 'सॅटर्डे...' लाच सांगितले. 'सॅटर्डे...' ने सूपच्या ग्राहकांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेतल्या. आमच्याकडे पुरेसा वेळ आहे. कामासाठी नोकर-चाकर आहेत. तेव्हा आम्ही ताजे अन्न खाणेच पसंत करतो. क्वचितच तयार सूप घेतो; असे श्रीमंत ग्राहकांनी सांगितले. याउलट आमच्याकडे वेळ नाही आणि मदतीला माणसेही नाहीत. यासाठी आम्ही तयार सूप घेणे अधिक पसंत करतो; असे मध्यमवर्गीय ग्राहकांचे म्हणणे पडले. कँपबेल सूपचा ग्राहक हा मुख्यत: नोकरदार मध्यमवर्ग आहे; हे तथ्य या संशोधनातून उजेडात आले. त्यामुळे कंपनीने 'सॅटर्डे ...' शी पुन्हा पाच वर्षांसाठी जाहिरातीचा करार केला. 'सॅटर्डे...' चे अस्तित्वच धोक्यात आले होते पण या संशोधनाने त्यांना तारून नेले.

संशोधन हे अशाप्रकारे समस्यामूलक असते. जीवनाच्या विविध क्षेत्रात निर्माण होणारे विविध प्रश्न सोडविण्याचा तो एक मार्ग आहे. त्यातून मार्गदर्शक उपाययोजना हाती येते. संशोधनाने स्वत:च्या विषयक्षेत्राची आणि त्यातील नवनवीन बदलांची अधिक चांगली ओळख

होते.

०८. संशोधन–प्रक्रिया

आपल्या समोरचा प्रश्न चिकित्सक बुद्धीने आणि एखादी कार्यपद्धती वापरून सोडविणे हेच संशोधनाचे स्वरूप असते. त्यासाठी एखाद्या जीवनक्षेत्राची, काळजीपूर्वक, चिकित्सापूर्वक आणि पद्धतशीर तपासणी करावी लागते. अशा तपासणीची सुव्यवस्थित संरचना (Systematic structure of investigation) असते. निश्चित स्वरूपाची कार्यपद्धती वापरावी लागते.

आरंभ (प्रस्थान), प्रस्ताव (उपगम), आराखडा (रूपरेषा), पारख (परीक्षण) आणि मांडणी (निबंधन) अशा पाच अवस्थांमधून शोधक्रिया घडत जाते.

या सर्व प्रक्रिया एकमेकींपासून भिन्न किंवा स्वतंत्र असतात, असे नाही. तसेच त्या एकमेकींचा पर्याय किंवा एकमेकींमध्ये मिसळणाऱ्या आहेत, असेही नाही. दिलेल्या निश्चित क्रमाने या क्रिया होतात असे नाही. संशोधनाच्या प्रक्रियेत त्या एकमेकींमध्ये मिसळत सातत्याने चालू असतात. तरीही त्यांचा पुढील क्रम संशोधनाला उपयुक्त अशी दिशा देतो.

०८.१ आरंभ

उपलब्ध ज्ञानसंचिताची मर्यादा कळणे, हा संशोधनाचा आरंभ होय. यासाठी तो प्रश्न कसा निर्माण झाला हे जाणून घेणे आणि तो सखोलपणे समजून घेणे आवश्यक असते. त्या प्रश्नाशी संबंधित संकल्पना आणि सिद्धांत यांची संशोधकाला पक्की ओळख असावी लागते. त्यासाठी सैद्धांतिक लेखनाचे चिकित्सक वाचन करावे लागते. त्याचप्रमाणे अशा प्रश्नावर किंवा त्यासारख्या प्रश्नावर यापूर्वी झालेले अभ्यासही काळजीपूर्वक पहावे लागतात. अशा वाचनात एका संदर्भातून दुसऱ्या संदर्भाची माहिती मिळत राहते. उपयुक्त सामग्री कोणती, कोणकोणत्या घटकांचा विचार करावा लागेल याचा अंदाज येतो. त्याच्या आधाराने उपलब्ध सामग्री व स्रोत याविषयीची वस्तुस्थिती लक्षात घेऊन प्रश्न निश्चित करता येतो. विश्लेषणात्मक दृष्टीने, निःसंदिग्ध स्वरूपात आणि अर्थपूर्ण परिभाषेत प्रश्नाची नेमकी मांडणी करावी लागते. प्रश्न जितका निःसंदिग्ध मांडला जाईल तितका शोधमार्ग स्पष्ट होत जाईल. या पहिल्या पायरीवर संशोधनाची अंतिम पायरी अवलंबून असते. त्यामुळे प्रारंभिक टप्प्यावर अधिक काळजी घ्यावी लागते.

०८.२ प्रस्ताव

"जिज्ञासा व पूर्वज्ञान यांना कल्पनाशक्तीची जोड दिली म्हणजे संशोधकाला संभाव्य उत्तर सुचते."[१५] त्यास प्रस्ताव, सिद्धांतकल्पना, परिकल्पना, उपगम किंवा अभ्युपगम (Hypothesis) असे म्हणतात. संशोध्य प्रश्नाविषयीचे पूर्वचिंतन, सदृश अभ्यासांचे अवलोकन, उपलब्ध सामग्रीचे परीक्षण आणि तज्ज्ञांशी केलेली चर्चा यातून अभ्युपगम सुचू लागतो. अभ्युपगमाचे तार्किक व अनुभवजन्य परिणाम लक्षात घ्यावे लागतात. त्यातून संशोधन करताना कशावर भर द्यावयाचा, कशाला केंद्र करावयाचे हे ठरते. त्याचा परिणाम सामग्रीचे विश्लेषण व गुणवत्ता यावर होतो. अभ्युपगम अगदी विशिष्ट आणि हाती घेतलेल्या प्रश्नांपुरताच मर्यादित असला पाहिजे. तरच त्याची योग्य तपासणी करणे शक्य होते.

सर्व प्रकारच्या संशोधनात अभ्युपगम आवश्यक असतोच असे नाही. तथापि सर्वसाधारणतः त्याची आवश्यकता दिसते. आपल्याला प्रश्नाप्रमाणेच अभ्युपगमही नेमक्या शब्दात सुस्पष्टपणे मांडता आला पाहिजे. शोधक्रिया योग्य मार्गाने व्हावी यासाठी अभ्युपगमाचे मार्गदर्शन होते. कोणत्या प्रकारची सामग्री हवी आणि कोणत्या पद्धतीने तिचे विश्लेषण केले पाहिजे; याची जाणीव होते. विचारांना तीक्ष्णता येते आणि प्रश्नाच्या महत्त्वपूर्ण पैलूंवर मन केंद्रित होते. यादृष्टीने अभ्युपगमाला महत्त्व असते. अभ्युपगम हा शोधक्रियेचा जसा प्रस्थानबिंदू असतो तसा भावी वाटा जेथे एकत्र येऊन मिळतात असा केंद्रबिंदूही असतो.

०८.३ आराखडा

पहिल्या टप्प्यावर आपल्यासमोर कोणती समस्या आहे ते कळते. दुसऱ्या टप्प्यावर त्या समस्येचे संभाव्य उत्तर काय असू शकेल याचा अंदाज येतो. आता या तिसऱ्या टप्प्यावर प्रश्नापासून उत्तरापर्यंत कसे जायचे याचा एक सांकल्पनिक नकाशा आपल्यासमोर असावा लागतो. त्याला रूपरेषा, आराखडा (Research design) असे म्हणतात. सामग्रीचे स्वरूप, तिची माहिती मिळविण्याची साधने, त्यांचा वापर करावयाची पद्धती,

सामग्रीचे संकलन, तिचे विश्लेषण अशा अनेक बाबींचा खुलासा करावा लागतो. त्यातून विश्वसनीयतेचा प्रत्यय यावा आणि पूर्वग्रहमुक्त असल्याची खात्री पटावी. संशोधनविषयाच्या निवडीची कारणे, स्वरूप, महत्त्व, भूमिका, उद्दिष्ट, व्याप्ती, मर्यादा आणि अभ्यासाची पद्धती यांचे सुस्पष्ट कथन करावे लागते. संशोधकाची पात्रता, संशोधनासाठी येणारा खर्च आणि लागणारा वेळ यांचाही त्यात खुलासा असावा लागतो. संशोधन प्रश्नाची अनेक अंगोपांगे आणि अलक्षित पैलू उजेडात येतील असाच हा आराखडा लवचिक असावा. थोडक्यात, आपल्या समोरच्या प्रश्नाचे उत्तर आपण कोणत्या सामग्रीच्या साहाय्याने, कोणत्या पद्धतीने आणि पायऱ्यांनी सोडविणार आहोत याचा हा आराखडा असतो.

०८.४ परीक्षण

प्रस्तावाचे परीक्षण हा प्रत्यक्ष कार्यवाहीतला मुख्य टप्पा असून त्यासाठी वेगवेगळ्या क्रिया कराव्या लागतात.

प्रत्यक्षात एखाद्या जीवनसंबद्ध प्रश्नाचा शोध घेताना हाती असलेली सामग्री अपूर्ण असल्याचे लक्षात येते. त्यामुळे सुयोग्य व उचित सामग्री गोळा करण्याची गरज जाणवते. संशोधनाचे स्वरूप, उद्देश, व्याप्ती, वेळ, खर्च आणि माहितीची अपेक्षित अचूकता लक्षात घेऊन सामग्रीचे संकलन करावे लागते. त्यात संशोधकाची क्षमता, त्याचा अनुभव आणि कॉमन सेन्स यांनाही महत्त्वाचे स्थान असते. ही सामग्री त्या त्या क्षेत्राप्रमाणे प्रयोग, निरीक्षण, सर्वेक्षण, प्रश्नावली, मुलाखती, किंवा ग्रंथालयीन साधने यांच्या द्वारे मिळवावी लागते. विश्वासपात्र आणि पुरेशी सामग्री मिळाल्यावर शोधकार्य योग्य पद्धतीने करता येते. काही वेळा एकूण संशोध्य घटकांपैकी काहीच घटकांची निवड करून सामग्री जमा केली जाते. हे नमुने (Samples) कसे निवडावेत याची पुष्कळ तंत्रे आहेत.

जमा झालेली अवाढव्य सामग्री सहजपणे हाताळता यावी म्हणून तिच्यावर काही संस्कार करावे लागतात. सामग्रीची हेतूपूर्ण वर्गवारी करावी लागते. निरनिराळ्या गटांमध्ये तिचे वर्गीकरण करावे लागते. या गटांना संकेताक्षरे देता येतात. सामग्रीची कोष्टके, सारणीमध्ये मांडणी करण्यात येते. त्यासाठी संगणकाचे साहाय्य घेता येते. एकाच वेळी परिणाम करणाऱ्या अनेक चल घटकांचा अभ्यास संगणकामुळे करता येतो.

संकलित आणि वर्गीकृत अशा सामग्रीचे विश्लेषण पुढे विविध संख्याशास्त्रीय प्रमाणकांनी करता येते.

प्राकृतिक आणि सामाजिक शास्त्रांमध्ये सामग्रीचे संकलन, वर्गीकरण, गणन आणि कोष्टकामध्ये केलेले रूपांतर यासाठी वेगवेगळ्या प्रकारची तंत्रे कौशल्याने वापरावी लागतात. तसेच त्यासाठी परिश्रमही पुष्कळच घ्यावे लागतात. साहित्यसंशोधनात संहितेची उपलब्धी एवढ्यावरच भागते. प्राकृतिक व सामाजिक शास्त्रांमध्ये सामग्रीच्या विश्लेषणासाठी संख्याशास्त्रीय प्रमाणाचा वापर करणे योग्य ठरते. साहित्यसंशोधनात त्यास कमी अवसर असतो. तेथे संहितेचे घटकांमध्ये विश्लेषण करावे लागते. त्याचप्रमाणे घटक-घटक आणि घटक-पूर्ण यांचे संबंध जाणून घेण्यासाठी संश्लेषणही करावे लागते.

अशा प्रकारे सामग्रीच्या विश्लेषण-संश्लेषणातून हाती काही निश्चित तथ्ये लागतात. या तथ्यांच्या आधारे अभ्युपगमाचा पडताळा पाहता येतो. निश्चित केलेली तथ्ये अभ्युपगमाला पूरक, पोषक व अनुकूल असतील तर अभ्युपगम स्वीकारला जातो. निश्चित केलेली तथ्ये अभ्युपगमाला मारक, बाधक, आणि प्रतिकूल असतील तर अभ्युपगम नाकारावा लागतो. हे ठरविण्याच्या टी-टेस्ट, एफ-टेस्ट, ची स्क्वेअर अशा अनेक तपासण्या आहेत. साहित्यसंशोधनात संहितेची अर्थपूर्ण संगती यासारखा निकष वापरता येतो. एकूण संशोधनाचे स्वरूप आणि उद्दिष्ट यावर तपासणीचे स्वरूप ठरते.

या शोधक्रियेत अभ्युपगम नाकारला गेला तर वेगळा अभ्युपगम स्वीकारून पुनर्शोध घ्यावा लागतो.

या शोधक्रियेत अभ्युपगम स्वीकारला गेला की त्याचे सामान्यीकरण (generalisation) करून उपपत्तीचे किंवा सिद्धांताचे प्रतिपादन करता येते. संशोधनाचे खरे मूल्य अशा सुरचित सिद्धांतनामध्ये असते.

या शोधप्रक्रियेत आरंभी अभ्युपगम घेतलेला नसेल तर आपल्या शोधाचे फलित मान्य उपपत्तीच्या आधारे विशद करावे लागते. अशा अर्थानुवादात

(interpretation) पुढील संशोधनाला चालना देण्याचे सामर्थ्य असू शकते.

०८.५ निबंधन

प्रश्नापासून त्याच्या सोडवणुकीपर्यंतचा शोधक्रियेचा हा जो प्रवास आहे त्याचे निबंधन ही अखेरची अवस्था आहे. तीत मांडणी, तळटीपा, संदर्भसूची, परिशिष्टे, निर्देशसूची इत्यादी देण्याचे विशिष्ट तंत्र आहे. त्यातून अभ्यासाचा व्यवस्थितपणा दिसतो. याविषयीचा चोखपणा बौद्धिक शिस्तीचा भाग आहे. त्यासाठी प्रकल्प अहवालाची किंवा प्रबंधलेखनाची रीती संशोधकाने आत्मसात केलेली असावी. परिभाषेची निश्चिती, सामग्रीची जुळणी, साधकबाधक पुरावे व प्रमाणे यांचा परामर्श, मुद्यांची क्रमसंगती लक्षात घेऊन सिद्धांताची मांडणी व प्रतिपादन करावे लागते. भाषा वस्तुनिष्ठ, सारगर्भ आणि साधी असावी. तिच्यात संदिग्ध वाक्प्रयोग टाळलेले असावेत. आपले प्रतिपादन अधिक स्पष्ट व प्रभावी होऊ शकत असेल तरच उदाहरणे व कोष्टके यांचा वापर करावा.

०८.६ एक उदाहरण

आपण उदाहरणाने संशोधन प्रक्रिया थोडक्यात समजून घेऊ.

हे उदाहरण खगोलविज्ञानातील आहे. युरेनस (हर्षल) या ग्रहाचा शोध विल्यम हर्शेल या खगोलशास्त्रज्ञाने इ. स. १७८१ मध्ये लावला. त्याची गती व भ्रमणकक्षा न्यूटनच्या नियमानुसार ठरविण्यात आली. पण हळूहळू खगोलनिरीक्षकांच्या असे लक्षात आले की या ग्रहाच्या गतीत मध्येच विचलन होत आहे. इ. स. १८४० मध्ये हे विचलन ठळकपणे दृष्टोत्पत्तीस आले. असे का होते; असा प्रश्न शास्त्रज्ञांच्या समोर उभा राहिला. (आरंभ)

फ्रेंच शास्त्रज्ञ लप्लास यांचा 'मेकॅनिक सेलेस्ट' (आकारास्थ वस्तूंचे गतिशास्त्र) हा पाच खंडांचा ग्रंथ याच काळात प्रसिद्ध झालेला होता. या ग्रंथाने न्यूटनच्या गतीच्या व गुरुत्वाकर्षणाच्या नियमांची अचूकता सिद्ध केली होती. अशा गणिताला आता तडा जात होता.

या गणिताप्रमाणे युरेनसमधील सूक्ष्म बदलाला जवळच्या वस्तूचे गुरुत्वाकर्षण कारणीभूत असण्याची शक्यता होती. (प्रस्ताव)

या संभाव्य उत्तराचा पडताळा पाहण्यासाठी शास्त्रज्ञांनी युरेनसचे विचलन कोठे व किती होते; त्याच्या नोंदी घेतल्या. त्यावरून त्याच्या पलीकडे असणारा अज्ञात ग्रह किती अंतरावर असू शकेल; याचे त्यांनी गणित केले.

त्या अंदाजाने अंतराळातील संभाव्य ठिकाणी त्यांनी वेध घेतला आणि एका नव्या ग्रहाचा शोध लागला. त्याचे नाव नेप्च्यून. (पडताळा)

हा शोध ज्या पद्धतीने लागला ती संशोधनाची शास्त्रीय विचारविमर्श पद्धती होय. केंब्रिज युनिव्हर्सिटीचे विद्यार्थी जे. सी. ॲडम्स आणि फ्रान्सचे शास्त्रज्ञ यू. जे. जे. लेव्हेरिये यांनी स्वतंत्रपणे पण जवळजवळ एकाच वेळी हा शोध लावला. (ॲडम्स १८४५ ऑक्टोबर लेव्हेरिये १८४६ सप्टेंबर) एवढी वस्तुनिष्ठा संशोधनात असावी लागते.

सिद्धांताने भाकीत करावे आणि निरीक्षणांनी ते पडताळून पहावे; अशी वैज्ञानिक कार्यप्रणाली असते. नेप्च्यूनच्या शोधात गुरुत्वाकर्षणाचा सिद्धांत बरोबर होता पण निरीक्षणे अपूर्ण होती. त्यामुळे युरेनसच्या विचलनाचा प्रश्न निर्माण झाला होता. सुयोग्य निरीक्षणाने त्याचा उलगडा झाला. पण बुध ग्रहाच्या बदलत्या कक्षेचा खुलासा लेव्हेरियेला या पद्धतीने करता आला नाही. येथे निरीक्षणे बरोबर होती पण गुरुत्वाकर्षणाच्या सुप्रतिष्ठित सिद्धांतात उणीव होती; असे उत्तरकाळात अल्बर्ट आइन्स्टाइनने व्यापक सापेक्षतेचा सिद्धांत मांडून दाखवून दिले. (इ. स. १९१५). सूर्यापासून लांबचे म्हणजे पृथ्वी व इतर बाहेरचे ग्रह यांच्या गतीचे वर्णन न्यूटनच्या सिद्धांताच्या आधाराने बरोबर करता येते. ह्या त्याच्या अचूकतेमुळेच नेप्च्यूनचा शोध लागला. परंतु जसजसे आपण सूर्याच्या जवळ जातो तसतसे सूर्याचे गुरुत्वाकर्षण प्रबळ होत जाते. वाढत्या गुरुत्वाकर्षणामुळे न्यूटन आणि आइन्स्टाईन यांच्या सिद्धांतातील तफावत वाढत जाते. त्यामुळे बुध ग्रहाची कक्षा ठरविताना शंभर वर्षात पडणारा त्रेचाळीस सेकंदाइतका सूक्ष्म बदलही त्या दोन सिद्धांतात तरतमभाव करू शकतो.

०९. संशोधनाची गुणवत्ता

संशोधनाची गुणवत्ता जोखण्यासाठी काही तत्त्वे किंवा कसोट्या सांगता येतील.

संशोधनाचा हेतू (किंवा उद्दिष्ट) सुस्पष्टपणे

निश्चित केलेला असला पाहिजे. त्याची मांडणी साधारण संकल्पनांच्या आधारे केलेली असावी.

संशोधनाची कार्यपद्धती काळजीपूर्वक तयार केलेली असावी. त्यामुळे जास्तीत जास्त वस्तुनिष्ठ निर्णय मिळणे शक्य व्हावे.

संशोधनासाठी संकलीत केलेल्या सामग्रीची विश्वसनीयता आणि प्रामाण्य काळजीपूर्वक तपासलेले असावे. सामग्रीचे महत्त्व विश्लेषणातून स्पष्ट व्हावे. सामग्रीच्या विश्लेषणासाठी वापरलेल्या पद्धती अनुरूप आणि उचित असल्या पाहिजेत.

निष्कर्ष काढण्यासाठी आवश्यक तेवढी सामग्री असली पाहिजे. सामग्रीच्या विश्लेषणावरच सिद्ध होणारे निष्कर्ष असले पाहिजेत.

संशोधनाचे शब्दांकन किंवा कथन पूर्ण मोकळेपणाने करावे. संशोधनातील त्रुटी आणि त्याचा संशोधनावर झालेला परिणाम यांची त्यात नोंद असावी. संशोधनाची प्रक्रिया पुरेशा तपशीलासह वर्णन करावी. त्यामुळे संशोधनाच्या पुढील टप्प्यावर साहाय्य होईल. त्याचप्रमाणे संशोधनात सातत्यही ठेवता येईल.

चांगले संशोधन हे पद्धतशीर असते म्हणजे ते विशिष्ट क्रमाने, विशिष्ट टप्प्यांनी नियमानुसारी केलेले असते. असे पद्धतशीर संशोधन निर्मितीशील चिंतनाला प्रतिबंध करीत नाही पण अंदाज व अंतःस्फूर्ती यांना मात्र दूर ठेवते. असे संशोधन तर्कशुद्ध असते म्हणजे विगमन–निगमन यांसारख्या तर्कप्रक्रियांनी त्याची सिद्धता करता येते. ते बाह्य प्रत्यक्ष वास्तवाशी संबद्ध असते. भक्कम साधनसामग्रीने त्याचे प्रामाण्य ठरते. त्यामुळे त्याची पुनरावृत्ती करून कोणालाही त्याची सत्यता पडताळून पाहणे शक्य होते.

संशोधक अनुभवी, सुप्रतिष्ठित आणि एकाग्रतेने काम करणारा असेल तर तो अधिक आत्मविश्वासाने काम करू शकतो. त्यामुळे त्याच्या संशोधनाची गुणवत्ता वाढू शकते.

१०. संशोधनाचे फलित

संशोधनाने काय साध्य होते? कोणत्याही संशोधनाच्या शेवटी संशोधक काही एका निर्णयाला येतो. त्याला जे सापडलेले असते ते नवीन असते, महत्त्वाचे असते. त्यामुळे उपलब्ध ज्ञानामध्ये नवी भर पडते. अशा भरीचे स्वरूप वेगवेगळे असते.

संशोधन हे समस्यामूलक असते. त्यामुळे संशोधनाच्या अखेरी त्या समस्येचा उलगडा करता येतो. जसे, यूटेरेनस या ग्रहाचे विचलन का होते; या प्रश्नाची सोडवणूक नेप्च्यून या नव्या ग्रहाच्या शोधाने झाली.

संशोधनाने जुनी तथ्ये, जुनी तत्त्वे यांचा पुनर्शोध घेता येतो. नवी तथ्ये, नवी तत्त्वे यांचा वेध घेता येतो. या प्रक्रियेतून तथ्ये निश्चित करता येतात. वैद्यकशास्त्रामध्ये याची अनेक उदाहरणे सापडतात. एकेकाळी, कुष्ठरोग होणे हे त्या माणसाच्या पापाचे फळ समजले जात होते. पण कुष्ठरोगही जंतूंमुळे होतो; असे नव्या संशोधनाने दाखवून दिले. एड्स हा स्पर्शाने होतो; असा समज होता. पण एड्स हा संसर्गजन्य असला तरी केवळ स्पर्शाने तो होत नाही; असे सिद्ध करण्यात आले. त्यामुळे कुष्ठरोगी किंवा एड्सग्रस्त यांना अधिक मानवी वागणूक मिळणे शक्य झाले.

कधी संशोधनातून एखाद्या नव्या वस्तूची निर्मिती होते. कधी एखाद्या वस्तूची पूर्वकल्पना करून तशी घडविण्याचा संशोधकांचा प्रयत्न असतो. राइट बंधूंनी लावलेला विमानाचा शोध या प्रकारचा आहे. कधी एखादा प्रश्न सोडविण्यासाठी वस्तूची निर्मिती केली जाते. कोळशाच्या खाणीतील संभाव्य स्फोटाची पूर्व कल्पना देणारा रक्षकदीप सर हंफ्रे डेव्ही यांनी निर्माण केला. हे या प्रकारचे संशोधन आहे.

कधी संशोधनाने विशिष्ट घटितामागील कार्यकारणभावाचे विशदीकरण केले जाते. अशा कार्यकारणभावाचे आकलन झाल्यामुळेच पाऊस कोठे, कधी व किती पडेल याचा अधिक चांगला अंदाज व्यक्तविणे शक्य झाले आहे.

कधी पूर्वपरिचित घटकांची वेगळ्या पद्धतीने जुळणी केली जाते. कवि आणि कविता यांचा संबंध तोडून टी. एस. एलियटने तो काव्यपरंपरा आणि कविता यांच्याशी जोडला. त्यामुळे आपले आकलन अधिक वैशिष्ट्यपूर्ण बनले.

कधी जुन्या गोष्टींचे नव्या संकेतांनी

स्पष्टीकरण करता येते. ज्ञानेश्वरीत ज्ञानदेवांनी गीता–प्रासादावर 'महामेरू'चे रूपक कल्पिले आहे. येथे 'महामेरू' या शब्दाचा 'प्रचंड मोठा पर्वत' असा नेहमीचा अर्थ घेऊन या रूपकाचा समाधानकारक उलगडा करता येत नाही. त्यामुळे रा. चिं. ढेरे यांनी 'महामेरू' म्हणजे 'पर्वतात कोरलेले मंदिर' असा या संज्ञेचा वास्तुशिल्पशास्त्रातील अर्थ स्वीकारला आणि ज्ञानेश्वरीतील त्या रूपकाचा समाधानकारक अर्थ लावला.

संशोधनाने एखाद्या सिद्धांताचे समर्थन करता येते. यूरेनसच्या विचलनाचे स्पष्टीकरण न्यूटनच्या गुरुत्वाकर्षण सिद्धांताच्या आधाराने करता येते; हे दाखवून लेव्हेरिये यांनी त्या सिद्धांताचे समर्थन केले. पण बुध ग्रहाच्या विचलनाचा प्रश्न या पद्धतीने सोडविता येत नाही; असे दाखवून आइन्स्टाइनने न्यूटनच्या सिद्धांताचे अपुरेपण दाखविले. व्यापक सापेक्षतेचा नवा सिद्धांत मांडून आइन्स्टाइनने बुध ग्रहाच्या विचलनाचा प्रश्न सोडविला. अशा प्रकारे जुन्या सिद्धांताचे समर्थन करणे किंवा त्याचे खंडन करून नवा सिद्धांत मांडणे हे संशोधनाचे फलित असते.

पुष्कळदा संशोधन एखाद्या प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी केले जाते. संशोधनाने तो प्रश्न सुटतोही तथापि काही वेळा त्यातून आणखी नवे प्रश्न निर्माण होतात. गर्भाचे लिंगनिदान करण्याचा शोध हा एक उपयुक्त शोध आहे. तथापि विशिष्ट प्रकारच्या मानसिकतेमुळे भारतात त्यामुळे मुलांचा जन्मदर वाढला आणि मुलींचा कमी झाला. लोकसंख्येतील या असमतोलामुळे आपल्या सामाजिक जीवनात अनेक प्रश्न निर्माण झाले. या प्रश्नाचे निराकरण करण्यासाठी कायदा आणि लोकमानसाचे उद्‌बोधन करण्याची गरज आहे. संशोधनातून संशोधन असे जन्म घेत असते.

अशा प्रकारचे संशोधनाचे फलित असते. सामग्रीचा शोध, संचयन, संकलन, विवरण अशा दिशांनी कार्यप्रवण झाले तरच त्या शोधाला संशोधनाची पातळी प्राप्त होते. संशोधन ही ज्ञाताकडून अज्ञाताकडे जाणारी शोधयात्रा असते. निरीक्षण, प्रयोग, तुलना, चिंतन–मनन यांच्या साहाय्याने केलेला सत्याचा अविरत शोध हेच त्याचे स्वरूप असते. संशोधन हा नव्या ज्ञानाचा अक्षय झरा असतो. संशोधनामुळे शास्त्रीय आणि विगमनात्मक विचारांना चालना मिळते. सुव्यवस्थित संघटना आणि विचार याविषयीच्या तार्किक सवयी वाढीला लागतात. निर्मितिशील असा उच्च दर्जाचा बौद्धिक आनंद संशोधनातून मिळतो आणि समाजाची सेवाही घडते. ज्ञानाची क्षितिजे विशाल होतात. मानवी जीवन उन्नत, समृद्ध आणि प्रगत होते.

आज ज्ञान आत्मजागृत झाले आहे. कोणत्याही कृतीचे सांगोपांग ज्ञान, निरीक्षण, तिचे तंत्र व त्यासाठीचे कौशल्य आत्मसात करण्याची निकड पदोपदी जाणवते. कर्माचा डोळा जे ज्ञान ते निर्दोष असावे; असे ज्ञानदेवांचे सांगणे होते. आपली प्रत्येक कृती ज्ञानचक्षू उघडे ठेवून झाली पाहिजे; अशी ही जाणीव आहे. ही या शतकाची जाणीव आहे. ही जाणीव जागती ठेवून आपण संशोधन–साधना करू तर वैश्विक ज्ञानसंचितात भर घालणारा प्रगत समाज आपल्याला घडविता येईल.

संशोधनाच्या या प्रक्रियेमागे माणूस आणि त्याच्या भोवतीचे वास्तव जाणून घेण्याची धडपड असते. जग आणि जीवन योग्य रीतीने बदलण्याची प्रेरणा त्यामागे असते. त्यामुळेच अन्न गोळा करीत भटकणारा माणूस नवनवे शोध लावून प्रगत आणि संपन्न जीवन जगू लागला. माणसाची जिज्ञासा, कुतूहल आणि शोधबुद्धी यामुळेच स्वरांचे संगीत झाले. अक्षरांचे मंत्र झाले आणि मर्कटांची माणसे झाली.

संशोधन ही अशी मानवी जीवनाला संपन्न करणारी अभिक्रिया आहे.

१०. संदर्भ आणि टिपा :

१. प्रस्तुत लेख संशोधनासारख्या शास्त्रीय संकल्पनेचे स्पष्टीकरण करणारा आहे. अशा लेखात कवितांची अवतरणे पाहून कोणाकोणाच्या भुवया उंचावण्याची शक्यता आहे. तथापि साहित्याच्या ज्ञानद सामर्थ्यावर माझा विश्वास आहे आणि कवी द्रष्टे असतात असे मी मानतो. प्रस्तुत विवेचन संमिश्र लोकसमूहासमोर व्याख्यानाच्या रूपाने सादर करावयाचे असल्याने मोजक्या शब्दात नेमकी सूत्रे हाती ठेवणाऱ्या कवितेच्या ओळी मी लोकसंवादासाठी वापरल्या आहेत. मर्ढेकरांच्या ओळींचा संदर्भ असा -

१. बा. सी. मर्ढेकर, 'मर्ढेकरांची कविता', मौज प्रकाशन गृह, मुंबई, पुनर्मुद्रण १९७७ (प. आ. १९५९),

कविता क्र. ३४ पृ. १०४.

२. बा. सी. मर्ढेकर, 'मर्ढेकरांची कविता', तत्रैव, कविता क्र/३२ पृ. १०२.

३. केशवसुत (कृष्णाजी केशव दामले), 'केशवसुतांची कविता', सीताराम केशव दामले (संपा.), परशराम चिंतामण दामले (पाचव्या आवृत्तीचे संपा. व प्रका.) राहुरी-पुणे १९४९ क्र. ९५ स्फुट विचार पृ. ११५.

४. बहिणाबाई चौधरी, 'बहिणाईची गाणी', सौ. सुचित्रा, राजीव व मधुसूदन चौधरी, मुंबई, आवृत्ती बारावी, २००६, 'मन' पृ. १२९.

५. बालकवी (त्र्यंबक बापूजी ठोमरे), 'समग्र बालकवी', पार्वतीबाई ठोमरे (संपा.), स. कृ. पाध्ये, व्हीनस प्रकाशन, पुणे १९६६ 'बालविहग' पृ. ९३.

६. तुकाराम 'श्री तुकारामबावांच्या अभंगाची गाथा', शासकीय प्रत, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई, पुनर्मुद्रण १९७३ (प. आ. १९५०) पृ. ६६८.

७. बा. भ. बोरकर, 'बोरकरांची कविता' मंगेश पाडगावकर, (संपा.), काँटिनेंटल, पुणे 'यौवनाचे झाड', पृ. ३०५.

८. बा. सी. मर्ढेकर, 'मर्ढेकरांची कविता', उनि, क्र ३२ पृ. १०२.

९. दु. का. संत, 'मनुष्याची ज्ञानसाधना', प. भ. कुलकर्णी, पुणे विद्यार्थी गृह, पुणे १९८९ पृ. ५३-५४.

१०. आपल्या परंपरेत शास्त्रज्ञानाची महती सांगितली आहे, ती अशी -

अनेकसंशयोच्छेदि परोक्षार्थस्यदर्शकम्।
सर्वस्य लोचनं शास्त्रं यस्य नास्त्यंन्ध एव सः।।

अनेक प्रकारच्या शंका, संशय यांचे निराकरण करणारे, अज्ञात गोष्टींचे दर्शन घडविणारे आणि सर्वांचा डोळा असणारे जे शास्त्र ते ज्याच्यापाशी नाही तो अंधळाच होय.

११. या ज्ञानाची प्रवृत्ती कशी होते याविषयीची काही वचने पहा —

१. किमिदं वा कथं जातं, को वा कर्तास्य विद्यते।
उपादानं किमस्तीति विचार सोऽयमीदृशः।।

हे काय आहे; हे कसे झाले; याचा कर्ता कोण आहे; हे कोणत्या सामग्रीने सिद्ध झाले आहे; त्याचे स्वरूप काय; अशा प्रकारची विचाराची अंगे असतात.

२. I keep six honest serving men. They taught me all I know. Their names are what and why and when and how and where and who. Rudyard kipling

माझे सहा प्रामाणिक सेवक आहेत. मला जे माहीत आहे ते सगळे त्यांनी शिकविलेले आहे. त्यांची नावे अशी - काय, का, केव्हा, कसे, कोठे आणि कोण!

३. ज्ञानसंपादनाच्या आठ पायऱ्या प्रथम कौटिल्याने 'अर्थशास्त्रां'त (अधिकरण : १, अध्याय ५) सांगितल्या आहेत. त्यांचा अनुवाद कामंदकाने आपल्या 'नीतिसारा'त पुढील श्लोकात केला आहे.

शुश्रूषा श्रवणं चैव ग्रहणं धारणं तथा।
ऊहोऽ पोहोऽ र्थविज्ञानं तत्त्वज्ञानं च धीगुणाः।।
नीतिसार ४।२२.

ज्ञानलालसा, श्रवण, ग्रहण, धारण, त्याचप्रमाणे ऊह (तर्क करणे, विचार करणे) आणि अपोह (त्या विचारातील अयोग्य बाबी दूर करणे), अर्थविज्ञान आणि तत्त्वज्ञान हे बुद्धीचे आठ गुण आहेत.

१२. लोकहितवादी (गोपाळ हरी देशमुख), 'लोकहितवादीकृत निबंधसंग्रह', अ. का. प्रियोळकर (संपा.), पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, दु. आ. १९६७ पत्र क्र. ८२.

१३. लोकहितवादी, तत्रैव, पत्र क्र. १०१.

१४. लोकहितवादी, तत्रैव, पत्र क्र. ८२.

१५. अशोक केळकर, 'संशोधन', समाविष्ट मराठी वाङ्मयकोश खंड चौथा : समीक्षा संज्ञा विजया राजाध्यक्ष (संपा.) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई-वाई, २००२ पृ. ३७४.

✧✧✧

कादंबरीचे रूपघटक आणि नवोदित कादंबरीकार

उषा हस्तक

अलीकडे कादंबरी लेखनाच्या संदर्भात निर्माण झालेल्या काही जाणिवांमुळे कादंबरीलेखनाची अवघड प्रक्रिया काहीशी सोपी–म्हणजे अ–कलात्म–होऊन गेलेली आहे. त्याचे कारण वाङ्‌मयीन सर्जनाच्या प्रक्रियेत कलेचे स्तोम मान्य नसणाऱ्या आणि कलावादी भूमिका नाकारणाऱ्या लेखकांचा एक गट आता तयार झालेला आहे. त्याचा प्रभाव नवोदित कादंबरीकारांवर देखील पडत असल्याचे जाणवू लागलेले आहे. कमलेश वालावलकर ह्या लेखकाची "... बाकी शून्य" (२००५) ही पहिलीच कादंबरी, या कादंबरीचा नायक - जयराज सरदेसाई - एके ठिकाणी पुढील विचार व्यक्त करतो - "साहित्यामध्ये कलावादी भूमिका" आणि "कलेसाठी कला" असा दृष्टिकोण मांडणारी व्यक्ती ही अगदीच निःसत्त्व, पोकळ असली पाहिजे. ।"तुका म्हणे ऐशा नरा। मोजूनी माराव्या पैजारा।" हे तुकारामानं अशाच लोकांसाठी म्हणून ठेवलं असावं." (पृ. ३८४) हे विचार जयराजचे असले तरी त्याला घडविणाऱ्या निर्मात्याची भूमिकादेखील यापेक्षा फारशी वेगळी नसावी असे त्याच्या या कादंबरीच्या एकूण घडणीवरून म्हणता येईल. वाङ्‌मयाच्या क्षेत्रात एकेकाळी, 'कलेसाठी कला' हे सूत्र इतके ताणले गेले की त्यामुळे जीवनातल्या वास्तवाशी असणारे कादंबरीचे नाते नाममात्रच उरले. आता तिची नाळ वास्तवाशी अशा प्रकारे जोडली जाऊ लागलेली आहे की कलातत्त्वांशी तिचा काही संबंधच प्रस्थापित होऊ नये. एक वाङ्‌मयीन कलाकृती म्हणून कादंबरीचा विचार करायचा असेल तर या दोन्ही अतिरेकी भूमिका, प्रथमतः सोडून द्याव्या लागतील.

सर्वसामान्यपणे कलावादी भूमिका नाकारण्यामागे जी कारणे दिसतात ती अशी. वाङ्‌मयीन कलाकृतीमध्ये प्रखर वास्तवाची रूपे चित्रित करण्यासाठी कोणत्याही कलातत्त्वांची गुलामी स्वीकारण्याची गरज नाही. प्रखर वास्तवाचे आशयद्रव्य मुळातच इतके सकस आणि अस्सल असते की ते आपल्या अंगभूत सामर्थ्यानेच वाचकांना प्रभावित करते. समाजातल्या शोषित, पीडित, रंजलेल्या गांजलेल्या व्यक्तींच्या जगण्यातील अनुभव हेच अस्सल आणि म्हणून सकस अनुभव ठरतात. अशा सकस अनुभवांच्या आधारे होणारी निर्मिती ही स्वाभाविकपणेच सकस वाङ्‌मयीन निर्मिती ठरते. ही भूमिका अधिक ताणली जाते तेव्हा कलातत्वांची जाणीव असणे आणि वाङ्‌मयीन निर्मितीसाठी त्यांचा अवलंब करणे हा जणू वाङ्‌मयीन अपराध आहे असे मानले जाते, एवढेच नव्हे, तर अशा वाङ्‌मयीन निर्मितीची तुच्छतापूर्वक हेटाळणी केली जाते, तिची अप्रतिष्ठा करणेही न्याय्य ठरवले जाते. अशा कलाविरोधी विचारांचा विपरीत परिणाम तरुण पिढीतील लेखकांच्या वाङ्‌मयीन निर्मितीवर होत असल्याचे जाणवू लागलेले आहे. म्हणूनच वाङ्‌मयीन कलाकृतीच्या सर्जनाची प्रक्रिया कलातत्त्वांना डावलून करता येणे शक्य आहे का, याचाच गंभीरपणे विचार व्हायला हवा.

कोणत्याही वास्तवाच्या रूपाशी निगडित असणारे सामाजिक संदर्भ, कालौघात बदलत जातात. म्हणूनच केवळ सामाजिक संदर्भांचे भान ठेवून अस्तित्वात येणारी वाङ्‌मयीन कृती कालांतराने आपला प्रभाव हरवून बसते. वाङ्‌मयीन कृती मात्र, कालौघात टिकून राहण्याचे उद्दिष्ट समोर ठेवून जन्माला येते. त्यात येणाऱ्या यशापयशामुळे काही कृती काळावर मात करतात, तर काही काळाच्या उदरात गडप होतात. वाङ्‌मयाभ्यासकांच्या अभ्यासातून एक गोष्ट सिद्ध झालेली आहे, ती ही की कलातत्त्वे ही काही वाङ्‌मयीन कलाकृतीच्या साजशृंगाराची तत्त्वे नाहीत. तिला कलातत्त्वांचा आधार लागतो, अधिष्ठान लागते ते मूलतः वाङ्‌मयविश्वामध्ये

अनुक्रमणिका

निर्मातानिरपेक्ष स्वरूपात स्वतःच्या बळावर उभे राहण्यासाठी, टिकून राहण्यासाठी. ती अस्तित्वात आल्यानंतर आपल्या निर्मात्या-लेखकापासून विभक्त होते. नंतर तिचे स्वतःचे गुणावगुणच तिचे भवितव्य निर्धारित करीत असतात.

कोणत्याही विशिष्ट वाङ्मयीन कलाकृतीचे गुणावगुण तिच्या निर्मात्यामुळेच तिला प्राप्त होत असतात. त्याच्या विशिष्ट संवेदनशीलतेमुळे आकारित होणारे त्याचे अनुभवविश्व, त्याचा जीवनविषयक दृष्टिकोण, केवळ वैयक्तिक नव्हे तर व्यापक अशा मानवी मनाच्या आणि जीवनाच्या व्यवहारांचे त्याला झालेले आकलन आणि त्यांचा अर्थ लावण्याची त्याची क्षमता, आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे कलाकृतीच्या घडणीसाठी आवश्यक असणारी कलातत्त्वांची जाण ह्यांच्यावरच त्याच्या वाङ्मयीन कलाकृतीचे गुणावगुण अवलंबून असतात. तिच्या निर्मितीसाठी प्रत्यक्षातील वास्तवाचे अनुभव प्रेरक ठरत असले तरी कलावंताची खरी आस असते ती ह्या अनुभवांतील मर्म हेरून आपल्या कल्पनाशक्तीच्या साह्याने तिचे तिच्या अंतःस्थ घटकांच्या साह्याने आकाराला येणारे एक स्वतंत्र, स्वयंपूर्ण, अर्थसंपन्न विश्व वस्तुनिष्ठपणे निर्माण करण्याची, अशा सर्जनाच्या प्रक्रियेतील त्याचे यशापयश हेच त्याच्या वाङ्मयीन कलाकृतीच्या यशापयशाचेही कारण ठरते.

कादंबरीवाङ्मयाच्या परंपरेमुळे कादंबरीकाराला चांगल्या-बऱ्या-वाईट कादंबऱ्यांची जडणघडण कशा स्वरूपाची असते याची जाण यायला मदत होते. ही जाण मार्गदर्शक स्वरूपाची असते, परंतु विशिष्ट कादंबरीची निर्मिती करण्यासाठी त्याला त्याच्या कल्पनाशक्तीवरच विसंबून राहावे लागते. विशिष्ट कादंबरीद्वारा अभिव्यक्त होऊ पाहणारा आशय, तो मूर्त करण्यासाठी आवश्यक त्या घटकांची आणि त्यांच्या तपशिलाची निवड, त्यांच्या परस्परसंबंधातून विणला जाणारा आणि गतिमान होणारा तिचा एकात्म, अर्थपूर्ण पट हे सगळे कादंबरीकाराच्या कल्पनाशक्तीमुळे नव्यानेच अस्तित्वात येत असते. कादंबरीच्या निर्मितीकडे गंभीरपणे पाहणाऱ्या कादंबरीकाराची कल्पनाशक्ती अवास्तव अशा कल्पनाविलासात दंग होत नाही, कारण कलाकृतीच्या निर्मितीकडे कल्पनाविलासाचे एक माध्यम म्हणून तो पाहत नाही.

कादंबरीकारांनी विशिष्ट कादंबरी म्हणजे त्याला त्याच्या व्यापक अशा मानवी जीवनाच्या अनुभवातून, आकलनातून, चिंतनातून गवसलेला एक अर्थपूर्ण कलात्म आकृतिबंध असे म्हणता येईल. हा आकृतिबंध निर्माण करण्यासाठी त्याला मूलतः, प्रत्यक्षात मानवी जीवनाची जाणीव ज्यांच्यामुळे निर्माण होते अशा घटकांची गरज असते. त्याचप्रमाणे कादंबरी ही एक वाङ्मयीन कलाकृती असल्यामुळे भाषा ह्या माध्यमाचीही, मानवी जीवनाचा केंद्रबिंदू म्हणजे माणूस, त्यामुळे स्वाभाविकपणेच कादंबरीचे मूळदेखील माणसाच्या मनाशी आणि जीवनाशी निगडित असणाऱ्या व्यवहारांमध्येच दडलेले आहे. माणसाच्या आंतर्बाह्य जीवनाशी संलग्न असणारे कोणतेही अनुभव, कोणतीही क्षेत्रे कादंबरीचे रूप घडविण्याच्या संदर्भात निषिद्ध ठरत नाहीत. वास्तवाचे विशिष्ट रूप अभिव्यक्त करणारी कादंबरी हीच तेवढी अस्सल असे मानणे म्हणजे अमर्याद, असंख्य रूपांनी फुलू शकणाऱ्या कादंबरीला एका संकुचित परिघात बंदिस्त करण्यासारखे आहे.

कादंबरीची घडण करताना वास्तवाचा अनुभव, त्याचे निरीक्षण-आकलन-चिंतन जसे आवश्यक असते, तसेच तिच्या घडणीचे तंत्रदेखील आत्मसात करण्याची नितांत आवश्यकता असते. ह्या तंत्रामुळे तिचे रूप कृत्रिम, बनावटी न होता अधिक परिणामक्षम बनते. कादंबरी ही मुळातच वाङ्मयीन कलाकृती असल्यामुळे तिला निश्चित असा कलातत्त्वांचा अवलंब करून आकाराला आणलेला आकृतिबंध असतो. आत्मचरित्राप्रमाणे तिची सरळसोट, एकपदरी घडण करण्यासाठी कलातत्त्वांची गरज भासणार नाही, परंतु तिच्याद्वारा व्यापक, अनेकपदरी, व्यामिश्र, अर्थपूर्ण अशा मानवी जीवनाचा प्रत्यय आणून द्यायचा असेल तर कलातत्त्वांची कास धरावीच लागते. कादंबरीला साकार करणाऱ्या घटकांमध्ये, एकाच वेळी अनेक अर्थ सूचित करण्याची जी क्षमता असते ती

कादंबरीकाराच्या कलाविषयक जाणिवेमुळेच येत असते. त्याचप्रमाणे कादंबरीचा आशय साकार करण्यासाठी स्थलकालाचा विस्तृत पट उपलब्ध असला तरी त्याचा यथायोग्य प्रमाणबद्ध उपयोग करण्याचे कौशल्य कलाविषयक जाणिवेमुळेच त्याला प्राप्त होत असते.

कादंबरीच्या एकूण घडणीचे बाह्य घटक सहजपणे नमूद करता येतात. उदा. व्यक्ती-घटना-प्रसंग, वातावरण, भाषा इत्यादी. असे असले तरी तिची घडण करण्यासाठी एकच एक तंत्र वापरले जात नाही. तसे ते वापरले तर तंत्राचा साचा तयार होऊन सगळ्या कादंबऱ्या एकाच तोंडवळ्याच्या दिसू लागतात. एखाद्या कादंबरीकाराने त्याच्या एखाद्या कादंबरीसाठी योजलेले तंत्र दुसऱ्या एखाद्या कादंबरीकाराला कितीही आकर्षक, प्रभावी जाणवले तरी त्याला त्याच्या कादंबरीच्या घडणीसाठी त्या तंत्राचा अवलंब करता येत नाही. बळेच तो केला तर उसनवारीच्या तंत्रामुळे तिला साकार करणारे घटक संघटित न होता विघटित होतात आणि स्वत:च्या प्रकृतिधर्मानुसार आकारित होण्याच्या त्यांच्या प्रक्रियेत अडथळा निर्माण होतो. कोणत्याही विशिष्ट कादंबरीचे जे काही साध्य असते, ते प्राप्त करण्यासाठी साधनांचा उपयोग करावा लागतो. कादंबरीच्या अंतिम परिणामात मात्र, साध्य-साधनांची वेगवेगळी जाणीव शिल्लक उरत नाही. साध्य-साधनांची अशी एकरूपता साध्य करण्यासाठी, कादंबरीकाराने अवलंबिलेली प्रक्रिया म्हणजेच त्याच्या विशिष्ट कादंबरीचे तंत्र म्हणता येईल. म्हणूनच प्रत्येक कादंबरीच्या घडणीसाठी अनुरूप तंत्र शोधणे हे कादंबरीच्या नवनिर्मितीच्या संदर्भातलेच एक आव्हान ठरते. बनावटी कादंबऱ्यांच्या निर्मितीचे तंत्र म्हणजे खऱ्या अर्थाने कादंबरीच्या घडणीचे तंत्र नव्हे.

एखादी कादंबरी ही जेव्हा विशिष्ट तपशिलाच्या साह्याने भरीव रूप धारण करून शब्दमाध्यमातून आविष्कृत होते, तेव्हाच तिला आकारबद्ध प्रतीतोक्षम रूप प्राप्त होते. त्यानंतरच कादंबरीकाराने ते रूप का आणि कशाप्रकारे घडविलेले आहे आणि त्या रूपाद्वारा अंतिमत: कोणता परिणाम साधलेला आहे ह्याचे आकलन वाचकांना होते. साकल्याने अभिव्यक्त होणाऱ्या कादंबरीच्या रूपावरून तिला साकार करणाऱ्या घटकांची, त्यांच्या परस्परसंबंधांची, तिला गोचर करणाऱ्या तपशिलाची, तिच्या कथनपद्धतीची आणि भाषाशैलीची अर्थपूर्णता त्यांना पडताळून पाहता येते. जाणत्या वाचकांकडून केले जाणारे अशा स्वरूपाचे आकलन वाङ्मयविषयक जाण आणि अभिरूची समृद्ध करण्यास साह्यभूत ठरते.

कन्नड कादंबरीकार डॉ. एस्. एल्. भैरप्पा ह्यांचे नाव आता मराठी वाचकांच्याही परिचयाचे झालेले आहे, कारण त्यांच्या अनेक अनुवादित कादंबऱ्यांचा आस्वाद ते घेत आहेत. कादंबरीलेखनाकडे गंभीर वृत्तीने पाहणाऱ्या ह्या अनुभवी कादंबरीकाराचा दृष्टिकोण, नवोदित कादंबरीकारांना मार्गदर्शक ठरण्यासारखा आहे. ह्याच भूमिकेतून त्यांनी त्यांच्या आत्मचरित्रात खालील मार्गदर्शनपर विचार व्यक्त केले आहेत, आपण का लिहायचं?

माझ्या या आत्मचरित्राचा सुरुवातीचा भाग वाचल्यानंतर "गृहभंग" कादंबरीत त्यातला बराच भाग आल्याचं लक्षात येईल. या विषयावर लिहावं, असं मला इंटरमिजिएटमध्ये असतानाच वाटलं होतं. तसा त्यावेळी प्रयत्नही केला होता. महादेवस्यापासून सुरुवात करून पंधरा एक पानं लिहूनही काढली; पण पुढं कसा मार्ग काढायचा ते सुचलं नाही. "का लिहायचं?" या प्रश्नानंही ग्रासून टाकलं आणि मनात निरुत्साह दाटला होता. ऑनर्समध्ये असतानाही एकदा प्रयत्न करून पाहिला; पण कलाकृती स्वानुभवाच्या पातळीवरून सृजनात्मक पातळीवर जाऊ शकली नाही. खरी ती कादंबरी अडुसष्ट साली लिहिली गेली. त्या आधी सात कादंबऱ्या लिहून झाल्यामुळे एक प्रकारची लिखाणाची सहजता आली होती. साहित्यामध्ये नेमकं काय आलं पाहिजे, वास्तव जीवनाशी त्याचं नातं काय, कोणत्या निष्ठा पाळणं आवश्यक आहे, याची जाणीवही साहित्याचा अभ्यास, साहित्यमीमांसेचे वास्तव आणि प्रत्यक्ष कादंबरी लेखनाचा अनुभव यामुळे आली होती. या खेपेला मात्र कादंबरी लिहिताना तपशिलामधले सावयव संबंध सहजच वाढू लागले.

अनुक्रमणिका

वास्तव जीवनातील देश-काळाशी असलेला संबंध तोडून यातली पात्रं कादंबरीतील देश-काळाशी निगडित होऊन कादंबरीची जडणघडण करू लागली. त्याच वेळी हे लिहिताना माझा संबंध फक्त कादंबरीरचनेशी आहे, वास्तव जीवनाशी नाही याचंही मला भान आलं. संपूर्ण कादंबरी याच प्रज्ञेची अभिव्यक्ती होऊन राहिली.

आपल्या जीवनातील काही घटनांवर आधारलेली कादंबरी लिहिण्याची ओढ फार लेखकांच्या मनात असते. बऱ्याच जणांची पहिली कलाकृती अशीच लिहिलेली असते. अशी हस्तलिखित काहीजणांनी मला दाखविलेली आहेत. मी त्यांना एकच गोष्ट सांगतो, "ही कलाकृती लगोलग प्रकाशित करायची घाई करू नका. स्वतःच्या कल्पनेतून आणखी दोनतीन कलाकृती निर्माण होऊ द्या. पाचसहा वर्षं जाऊ द्या. नंतर हीच कलाकृती तुमच्या कल्पनेच्या आधारानं निर्माण करा. वास्तवच लिहिलं पाहिजे या कल्पनेतून स्वतःची संपूर्ण सुटका झाल्यानंतरच लेखन करा, वास्तवात असलेले प्रेम आणि द्वेष बाजूला सारणं शक्य झाल्यानंतरच पुन्हा त्या पात्रांकडे पाहा."

पण बहुतेकांमध्ये एवढा संयम किंवा लेखनाविषयीची निष्ठा नसते. आपण लिहिलं ते प्रकाशित झालचं पाहिजे. या हट्टालाही ते बळी पडतात." ("माझं नाव भैरप्पा", मराठी अनुवाद, प्र. आवृ. २००४, पृ. ३९०)

कादंबरीलेखनाविषयी निष्ठा नसताना, साहित्याच्या अभ्यासाचा आणि साहित्य-मीमांसेच्या वाचनाचा अभाव असताना, केवळ वास्तवाची यथातथ्य रूपे कादंबरीद्वारा साकार करू पाहणाऱ्या किंवा व्यक्तिगत जीवनातील घटनांच्या आधारे कादंबरी लिहू पाहणाऱ्या नवोदित कादंबरीकारांना संयमाचा जो सल्ला भैरप्पांनी दिलेला आहे, त्यात निश्चितच तथ्य आहे. थोडक्यात, जोवर कादंबरीलेखनासाठी प्रत्यक्षातील वास्तवाला आधार हाच तिचा अस्सल कणा आहे, हा भ्रम दूर होत नाही, तोवर मराठी कादंबरीच्या समृद्धीचा मार्गदेखील खुंटलेलाच राहण्याची शक्यता आहे. मराठी कादंबरीचे भवितव्य ज्या नव्या दमाच्या प्रतिभासंपन्न कादंबरीकारांच्या हातात आहे त्यांनी निष्ठेने आणि कलाविषयक जाणिवांना गौण न लेखता कादंबरी लेखन केल्यास, मराठी कादंबरीपासून दुरावलेला वाचक पुन्हा तिच्याकडे आकृष्ट होऊ शकेल.

✧✧✧

उच्च शिक्षणाची वाटचाल आणि आव्हाने

प्रा. डॉ. श्री. मा. भावे

प्राचार्य भालचंद्र शंकर भणगे यांच्याशी माझा थोडा परिचय होता. मी जून १९७० मध्ये नौरोसजी वाडिया महाविद्यालयात गणिताचा शिक्षक म्हणून दाखल झालो. त्याच वर्षी नौ. वा. महाविद्यालयाची वाणिज्य शाखा नेस वाडिया वाणिज्य महाविद्यालय या नावाने स्वतंत्र झाली व भणगे यांची त्या महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून नेमणूक झाली. माझी पत्नी त्याच वर्षी नेस वाडिया महाविद्यालयात गणिताची शिक्षक म्हणून नोकरी करू लागली. तिच्यामुळे व दोन्ही महाविद्यालयांच्या सान्निध्यामुळे माझा प्राचार्य भणगे यांच्याशी परिचय झाला. त्या शैक्षणिक वर्षाच्या शेवटी (मार्च-एप्रिल १९७१) प्राचार्य भणगे यांनी काही उनाड विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या परीक्षेस बसू न देण्याचा धाडसी निर्णय घेतला व अनेक धमक्या-दडपणांना बळी न पडता तो लावून धरला. त्यामुळे त्यांची खूपच वाहवा झाली.

१९७२ च्या जून पासून भणगे मुंबईस गेले. मी पुढे शिक्षक चळवळीत भाग घेतला. त्यामुळे त्यांची माझी मधून-मधून गाठ पडे. त्यानंतर प्राचार्य भणगे कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू झाले. त्यावेळी शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघटनेतील आमच्या सहकाऱ्यांकडून त्यांच्या कामाची माहिती मिळत असे. प्राचार्य भणगे तरुण वयात कुलगुरू झाले व त्या पदावरून निवृत्त झाल्यावर उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात त्यांच्याकडून अधिक भरघोस कामगिरी होईल अशी अपेक्षा होती. दुर्दैवाने त्यांचे अकाली निधन होऊन आशा-अपेक्षांच्या पूर्तीला वावच उरला नाही.

त्यांच्या विषयीच्या स्मृतिग्रंथात लेख लिहून त्यांच्या विषयीचा आदर व्यक्त करण्याची संधी मला मिळाली ह्याची मला धन्यता वाटते.

१.

'उच्च शिक्षण' कशाला म्हणावयाचे, अमुक एक अभ्यासक्रम उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात बसतो की नाही हे कसे ठरवायचे, हा वादाचा विषय होऊ शकतो. 'इंटरनॅशनल स्टँडर्ड क्लासिफिकेशन ऑफ एज्युकेशन' या पुस्तकात म्हटले आहे की, 'जवळ जवळ ११ वर्षे उत्तम पायाभूत शिक्षण घेतल्यानंतर विद्यार्थी जे विशेष शिक्षण घेतो, त्याला उच्च शिक्षण असे म्हणतात.' या पुस्तकात उच्च शिक्षणाच्या तीन पातळ्या कल्पिल्या आहेत. काही विशिष्ट व्यवसायांना अनुलक्षून रचलेले अभ्यासक्रम, उदा. परिचारक-व्यवसाय (नर्सिंग) किंवा माध्यमिक शिक्षक होण्यासाठीची अर्हता देणारा अभ्यासक्रम (बी. एड्.), हे पहिल्या पातळीवर येतात. त्याच्या वरच्या पातळीवरील अभ्यासक्रमात ज्यामुळे पदवी मिळते असे अभ्यासक्रम येतात. तिसरी पातळी ही पदव्युत्तर व संशोधनपर अभ्यासक्रमांची पातळी.[१]

उच्च शिक्षण हे विविध प्रकारच्या संस्थांकडून मिळू शकते व त्या संस्थांपैकी काहींना 'विद्यापीठ' म्हणून ओळखले जाते. कोणत्या प्रकारच्या संस्थांना उच्च शिक्षणाच्या संस्था म्हणावयाचे व त्यापैकी कोणत्या संस्थांना 'विद्यापीठ' म्हणून ओळखायचे हे त्या त्या देशाच्या परंपरेवर अवलंबून असते. उदा. 'राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी' (एन्.डी.ए.) या संस्थेत मिळणारे शिक्षण हे उच्च शिक्षण आहे; पण प्रबोधिनीला आपण विद्यापीठ म्हणून ओळखत नाही.

आपण ज्या 'उच्च शिक्षणा'चा विचार करीत आहोत, ते पाश्चात्त्य परंपरेतून आलेले उच्च शिक्षण आहे. भारतीय परंपरेत उच्च शिक्षण म्हणून काही नव्हतेच असे नाही. खगोलशास्त्र, न्यायशास्त्र, काव्य, व्याकरण इ. विषयांचे फार वरच्या दर्जाचे शिक्षण देणाऱ्या शाळा आपल्याकडे होत्या व अजूनही आहेत. प्राचीन काळच्या विद्यापीठांची, उदा. नालंदा, तक्षशिला इ., माहितीदेखील उपलब्ध आहे. पण आपल्या पुढील विषयाशी त्या परंपरेचा संबंध नाही. आपण येथे युरोपीय व मुख्यतः ब्रिटिश

अनुक्रमणिका

परंपरेतून आलेल्या उच्च शिक्षणाचा विचार करीत आहोत. तेव्हा त्या परंपरेचा पुरेसा आढावा घेणे प्राप्त आहे.

पाश्चात्त्य विचारवंत आपल्या परंपरेची सुरुवात ग्रीकांपासून करतात. प्लेटोची 'ॲकॅडेमी' किंवा ॲरिस्टॉटलने स्थापिलेली 'लायसेयम्' ही संस्था ही युरोपीय उच्च शिक्षणाची उगमस्थाने होत. या दोन्ही संस्थातून मिळणारे शिक्षण हे संकल्पनांची छाननी किंवा विश्लेषण करणारे म्हणजेच चिंतनपर शिक्षण होते. उपयोजनपर (ॲप्लाईड) विद्यांचे शिक्षण या संस्थातून दिले जात नव्हतेच, पण त्या शिक्षणाविषयी एक तुच्छता बुद्धी या संस्थातून जोपासली जाई. यामुळेच आजदेखील काही सनातनी विचारवंत विद्यापीठातून केवळ चिंतनपर शिक्षण दिले जावे असा आग्रह धरतात.[१] ही ग्रीक परंपरा व तिला अनुसरून मिळणारे शिक्षण युरोपच्या इतिहासात ज्याला तमोयुग म्हणून म्हणतात ते सुरू होईपर्यंत कमी अधिक प्रमाणात चालत राहिले.

तमोयुगात नाना कारणांनी युरोपातील विद्येची उपासना ऱ्हास पावत गेली. पण ख्रिस्ती धर्मपीठाच्या आश्रयाने धार्मिक व पारलौकिक चिंतनाची परंपरा चालत राहिली. बाराव्या शतकाच्या मध्याला धार्मिक पोथ्यांचा संग्रह करणाऱ्या, त्या पोथ्यांवर भाष्ये लिहिणाऱ्या व पोथ्यांचे संपादन करणाऱ्या विद्वान धर्मगुरुंच्या मंडळ्या स्थापन झाल्या. अशा केंद्रात ख्रिस्ती जातीतील होतकरू विद्यार्थी त्या केंद्रांची ख्याती ऐकून जमा होतील आणि धर्मपर विचारांचे संकलन आणि परिष्करण करण्याचे काम चालू ठेवतील अशी अटकळ होती. पॅरिस व बोलोन्या या दोन केंद्रांच्या बाबतीत हे खरे ठरले व येथील केंद्रांचे विद्यापीठात विकसन झाले.[२] या विद्यापीठातून ख्रिश्चन धर्मतत्त्वांची चर्वणा करण्याच्या अनुषंगाने तत्त्वज्ञान, तर्कशास्त्र, इतिहास यांचा अभ्यास चाले. या विद्यापीठांचा खर्च चर्चकडून होई व विद्यापीठातील विद्यार्थीच पुढे धर्मगुरू होऊन चर्चेच्या पुरोहित श्रेणीत सामील होत. उपयोजनपर अशा ज्या विद्या त्यांचा अभ्यास विद्यापीठातून व्हावा हे कोणाच्या मनातही येत नव्हते.

१५ व्या शतकापासून युरोपातील तमोयुग संपुष्टात येऊन प्रबोधनयुगाचा उद्‌भव झाला. भौतिक गतिशास्त्र, ग्रहगतिशास्त्र, गणित इ. नवीन शास्त्रे उदयाला आली. पण या शास्त्रांचा अभ्यास करणारे विचारवंत क्वचितच विद्यापीठांशी संलग्न असे होते. विद्यापीठे चर्चच्या वर्चस्वाखालून बाहेर येण्यास तयार नव्हती. १६ व्या व १७ व्या शतकात धर्मसत्तेचे महत्त्व कमी झाले व राजसत्तेचे महत्त्व वाढले. पैसा व अधिकार यांच्या सहाय्याने लोकांना एकत्र आणून आपल्या लगामी ठेवण्याचे कसब राजसत्तेपाशी होते. राजांनी स्वतःच्या काबूत राहाणाऱ्या विद्वत् संस्था काढल्या. सुरुवातीला अशा संस्थांना 'ॲकॅडेमी', 'इन्स्टिट्यूट', 'पॉलिटेक्निक' अशी नावे मिळाली.[३]

१८ व्या शतकाच्या मध्याला इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती झाली. तिला सुरुवात वाफेवर चालणाऱ्या उत्पादक यंत्रांपासून झाली. या यंत्रांचे शोधही वर सांगितलेल्या संस्थांतील विद्यार्थ्यांनी वा शिक्षकांनी लावले नाहीत तर सुतारकाम, लोहारकाम करणाऱ्या कारुनारुंपैकी हुशार व्यक्तींनीच लावले. ही यंत्रे उत्पादनाच्या कामासाठी वापरणे, नवीन उत्पादनाला लागणारा कच्चा माल तयार करणे, पक्क्या मालासाठी बाजारपेठ शोधणे इत्यादी कामे करणारा व (बहुशः) जमिनीपासून दूर गेलेला भांडवलदारवर्ग उदयाला आला. आता भूमी हे मनुष्याच्या गरजा पुरविणारे एकमेव साधन राहिले नाही. यंत्रे आणि ऊर्जा यांना महत्त्व आले. अभियांत्रिकी व तंत्रज्ञान यांच्या पद्धतशीर शिक्षणाची गरज नंतरच्या पन्नास वर्षात भासू लागली. इंग्लंडमध्ये जरी नाही तरी फ्रान्स व जर्मनी यांनी असे शिक्षण देणाऱ्या सरकारी संस्था स्थापन केल्या. भांडवलदारी उत्पादन व्यवस्थेच्या अनुषंगाने अर्थव्यवहार वाढला. जमाखर्च, दळण-वळण, खरेदी-विक्री, सरकारी पेढ्या, हुंड्या, विमा असे नानाविध नवीन व्यवहार सुरू झाले. त्या व्यवहारांचे शिक्षण देणाऱ्या नव्या संस्था किंवा नवीन विद्यापीठेदेखील सरकारने किंवा खाजगी उद्योगांनी सुरू केली. आपण या विभागाच्या सुरुवातीला उच्च शिक्षणाचे जे रूप वर्णिले आहे ते रूप उच्च शिक्षणाला १९ व्या शतकाच्या पूर्वार्धात प्राप्त झाले.

२.

पाश्चात्त्य शिक्षण परंपरेचा व त्या परंपरेत

झालेला 'उच्च शिक्षण' ह्या संकल्पनेचा व शिक्षण-व्यवस्थेचा विकास यांचा धावता तरीही काहीसा विस्तृत आढावा घेण्याचा हेतू हा होता की त्यातून प्राप्त होणाऱ्या दोन निष्कर्षांकडे प्रकर्षाने लक्ष वेधावे. पहिला व अगदी सहज लक्षात येणारा निष्कर्ष असा की, शिक्षण हे त्या त्या कालखंडातील सत्ताधारी गटांना अनुकूल असे राहिले. चर्च, राजसत्ता आणि भांडवलदारी अर्थव्यवस्था यांच्या त्या त्या काळातील गरजा पुरविण्यासाठी शिक्षण वापरले गेले. हे खरे की, चर्चची सद्दी संपून राजसत्ता वरचढ झाली तेव्हा अस्तित्वात असणाऱ्या शिक्षणसंस्थांनी बदलाला नकार दिला व नव्या शिक्षणसंस्था सुरू कराव्या लागल्या. तीच कथा राजसत्तेकडून भांडवलदार वर्गाकडे वर्चस्व गेले तेव्हा काही प्रमाणात झाली. मुद्दा हा आहे की, आर्थिक-सामाजिक-राजकीय खळबळींपासून शिक्षणव्यवहार सोवळा व अलिप्त राहू शकलेला नाही. हस्तीदंती मनोऱ्यात बसून चिंतनात गढलेले प्राध्यापक व विद्यार्थी हे शिक्षणव्यवस्थेचे 'आदर्श' रूप इतिहासात, कदाचित् ग्रीकांचा काळ वगळता, कधीच खरे ठरलेले नाही. दुसरे असे की, १९ व्या शतकात इंग्रजांनी जी शिक्षण-व्यवस्था आपल्याकडे आणली, ती मुळात तेथील उदयास आलेल्या व प्रौढावस्थेला पोचलेल्या भांडवलदार वर्गाला अपेक्षित असणारी शिक्षणव्यवस्था होती. आपल्याकडील विद्यापीठे स्थापन करताना त्यांनी ऑक्सफर्ड-केंब्रिज या परंपरापूत विद्यापीठांचे प्रारूप न स्वीकारता नव्याने स्थापन झालेल्या लंडन विद्यापीठाचे प्रारूप डोळ्यांपुढे ठेवले होते. तेव्हा इंग्रजांनी येथे आणलेले शिक्षण खऱ्या अर्थाने काळानुरूप होण्यासाठी इथे भांडवलदारी उत्पादनव्यवस्था निर्माण होऊन बहराला येणे आवश्यक होते. नेमकी हीच गोष्ट इंग्रजांच्या साम्राज्यवादात बसत नसल्याने 'गोल छिद्रात चौकोनी खुंटी' या न्यायाने हे शिक्षण व शिक्षण व्यवस्था मोठ्या असंतोषाला कारण होऊन राहिली. भारतात एकोणिसाव्या व विसाव्या शतकातही जो इतिहास घडला त्याचे आकलन होण्यासाठी 'खुरटलेला भांडवलदारी विकास' ही विजेरी सतत हाती ठेवणे गरजेचे आहे.

इंग्रजांनी आणलेल्या शिक्षण-व्यवस्थेवर हा कायमचा आक्षेप होता की, 'हे केवळ कारकून तयार करणारे शिक्षण होते.' पण हा दोष शिक्षण-व्यवस्थेचा नव्हता, तर अर्थव्यवस्थेचा होता. या शिक्षणातून संशोधक, अभियंते, रसायनशास्त्रवेत्ते निर्माण झाले असते, तरी त्यांना कोणता उद्योग हिंदुस्थानात करता आला असता? अर्थव्यवस्थेला जोवर अशा लोकांची गरजच भासत नव्हती, तोवर अशा तऱ्हेचे प्राविण्य मिळविणाऱ्या व्यक्ती शिक्षण-व्यवस्थेतून मिळणेही शक्य नव्हते. पुढे स्वदेशीच्या चळवळीत महाराष्ट्रात राष्ट्रीय शिक्षणाने जोम धरला. राष्ट्रीय शाळा स्थापन झाल्या. बंगालमध्ये तर राष्ट्रीय महाविद्यालये आणि जादवपूर विद्यापीठासारख्या तांत्रिक शिक्षण देणाऱ्या संस्था लोकांनी वर्गणीतून उभ्या केल्या. पण सरकारी शिक्षण-व्यवस्थेतून दिल्या जाणाऱ्या शिक्षणापेक्षा कोणत्याच अर्थाने निराळे असे शिक्षण या संस्था देत नव्हत्या. बरे, व्यावसायिक शिक्षणाकडे सरकारी शिक्षण-व्यवस्थेने पाठ फिरवली होती असेही नाही. विद्यापीठे ही महाविद्यालयांना संलग्न करून घेणारी, स्वतः शिक्षण देणारी नव्हे, अशा स्वरूपाची असल्यामुळे तत्त्वतः व व्यवहारातही कोणत्याही प्रकारचे व्यावसायिक शिक्षण देणारे महाविद्यालय काढणे व त्यास विद्यापीठाची मान्यता मिळविणे शक्य होते. कायदा, वाणिज्य, वैद्यक, अभियांत्रिकी, शेतकी अशा विविध प्रकारच्या व्यवसायांचे शिक्षण इंग्रजांच्या काळातच सुरू झाले होते. परिस्थिती अशी होती की, या संस्थातून शिकून बाहेर पडलेल्यांपैकी फारच थोड्यांचा समावेश त्या वेळच्या साखळलेल्या अर्थव्यवस्थेत होऊ शकत होता.

इंग्रजी राजवटीतील अर्थकारणाचा परिणाम असा झाला की, सरकारी नोकरी व शिक्षकी या दोन उद्योगात नवीन नवशिक्षितांना वाव राहिला. परंतु या दोन्ही उद्योगांच्या विस्तारावर सरकारचे कडक नियंत्रण असल्यामुळे नवीन पदवी-धारकांचा या क्षेत्रात पूर्णपणे समावेश होणे अशक्य होऊन पदवी प्राप्त बेकारांची संख्या वाढत चालली. लंडन टाइम्सचा वार्ताहर व्हॅलेंटाईन चिरोल याने विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात हिंदुस्थानाचा प्रवास करून एक लेखमाला लिहिली. तीत त्याने बेकार पदवीधारांच्या प्रचंड संख्येला अनुलक्षून लिहिले होते की, श्रीमंत सावकाराकडे आंघोळीचे पाणी द्यायला, आंघोळ घालायला व धोतर नेसवायला एक-एक पदवीधर नेमता येईल.

अनुक्रमणिका

देशातील अर्थव्यवस्था सरकारी धोरणांमुळे संकुचित राहिली असली तरी ती भांडवलदारीची आकांक्षा धरणारी अर्थव्यवस्था होती. इंग्रज सरकारदेखील त्यांना जेव्हा सोयीचे असे तेव्हा उद्योजकांना (देशी किंवा परदेशी) प्रोत्साहन देई. रेल्वे, पोस्ट, टेलिफोन, टेलीग्राफ, रस्ते इ. उद्योग सरकारने आपल्या अखत्यारीचा अंकुश ठेवून का होईना नव्याने सुरू केले. हवामान खाते, भूगर्भ संशोधन खाते, भूमिमापन खाते अशा तऱ्हेच्या खात्यांना नोकर लागत. त्यांच्या प्रशिक्षणाची व्यवस्था ती खातीच करत. खेरीज खाजगी क्षेत्रात कापड-गिरण्या, रसायने निर्माण करणारे कारखाने, लोखंडाचे कारखाने इ. सरकारच्या सोयीप्रमाणे निघाले. मुद्दा असा की, इंग्रज काळात अर्थव्यवस्थेचा विस्तार होतच नव्हता असे नाही; त्या विस्तारावर सरकारी धोरणाची जाचक नियंत्रणे होती. पण अशा या मुडदूस झालेल्या अर्थव्यवस्थेमुळे देखील शिक्षणव्यवस्थेला आधार व सामर्थ्य मिळत होते. 'शिक्षण घेतलेत तर तुम्ही या अर्थव्यवस्थेचे घटक होऊ शकता', अशा आशयाचे एक स्वप्न आपल्या विद्यार्थ्यांसमोर ही शिक्षणव्यवस्था उभे करू शकत होती. त्यामुळेच तरुण मनुष्ये शिक्षण घेण्याचा आटापिटा करीत होती.

सारांश, इंग्रजांच्या काळात येथील आधुनिक उच्च शिक्षणाला सुरुवात झाली. युरोपातील भांडवलदारी अर्थव्यवस्थेला अनुरूप अशा तऱ्हेची ही शिक्षणव्यवस्था होती. पण भांडवलदारी अर्थव्यवस्थेच्या विकासाला येथील इंग्रज सरकार त्याच्या साम्राज्यवादी हितसंबंधामुळे अनुकूल नव्हते. परिणाम असा झाला की, शिक्षण व्यवस्थेच्या घटनेत विकासाची बीजे असली तरी त्या बीजांपासून जे अंकुर फुटावयाचे ते मारून टाकले जात होते. भांडवली अर्थरचनेत मागणी निर्माण होणे हे प्राथमिक असते. मग ती खरोखरच्या गरजेमुळे निर्माण होवो की, जाहिरातीमुळे कृत्रिमरीत्या निर्माण केली जावो. पण अर्थव्यवस्थेत निरनिराळ्या व्यवसायात प्रशिक्षण घेतलेल्या तरुणांना कामच मिळणार नसेल, तर शिक्षणव्यवस्था तरी तसे अभ्यासक्रम काय म्हणून निर्माण करील?

३.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देखील जवळ जवळ चाळीस वर्षे उच्च-शिक्षणाची स्थिती बऱ्याच प्रमाणात इंग्रजी राज्यात जशी स्थिती होती त्या प्रमाणेच राहिली. इंग्रजांच्या काळात विद्यापीठांची स्थापना सरकार कायदे करून करीत असे व विद्यापीठाचा कुलपती प्रांताचा 'गव्हर्नर' असे. स्वातंत्र्यानंतर विद्यापीठांची रचना याप्रमाणेच राहिली; इतकेच नव्हे तर जादवपूर विद्यापीठ, विश्वभारत विद्यापीठ, श्री. ना. दा. ठा. विद्यापीठ अशी जी विद्यापीठे सरकारच्या नियंत्रणाच्या बाहेर राहून काम चालवीत होती त्या विद्यापीठांनीही सरकारी नियंत्रणाचा आश्रय केला.[६] आजवर या विद्यापीठांना स्वतःच्या खर्चाचे पैसे स्वतःच उभे करावे लागत; आता मोठ्या प्रमाणावर सरकारी अनुदान मिळू लागले. इंग्रजांच्या काळात ज्या प्रमाणे शिक्षणाचे धोरण सरकार वेगवेगळे आयोग नेमून ठरवीत असे, त्याचप्रमाणे स्वातंत्र्यानंतर सरकारने शैक्षणिक धोरण ठरविण्यासाठी आयोग नेमले. त्यातला पहिला आयोग डॉ. राधाकृष्णन् यांच्या नेतृत्वाखाली नेमला. या आयोगाने केलेल्या शिफारशी तेव्हा तर अंमलात आणल्या गेल्या नाहीतच; व आता तर त्या अगदीच अप्रस्तुत वाटतील. उदा. या आयोगाची एक शिफारस अशी होती की, दर ३० महाविद्यालयांमागे एक विद्यापीठ असावे! आज एकट्या पुणे विद्यापीठाच्या कक्षेत ४१३ महाविद्यालयें आहेत!

आपण पाहिलेच आहे की, शिक्षणव्यवस्था आणि अर्थव्यवस्था यांचा निकटचा संबंध आहे. या दोन्ही व्यवस्था परस्परांना अनुरूप असाव्या लागतात. पारतंत्र्याच्या काळात शिक्षण व्यवस्थेत भांडवलदारी अर्थव्यवस्थेला अनुरूप होऊ शकेल अशी बीजे होती पण साम्राज्यावादाच्या जोखडामुळे हिंदुस्थानाची अर्थव्यवस्था भांडवलदारी अर्थव्यवस्थेत परिणत होऊ शकली नाही. परिणामी शिक्षणव्यवस्था खुरटलेलीच राहिली. स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकारने नियोजनपूर्वक आर्थिक विकासाची कास धरली. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेचा भांडवलदारी विकास झाला नाही. त्याच वेळी भारत सरकारने शिक्षणव्यवस्थेत परिवर्तन घडवून आणण्याची इच्छाशक्तीही दाखविली नाही. त्यामुळे इंग्रजी राजवटीत शिक्षण व अर्थ या व्यवस्थात जसा ताळमेळ राहिला नाही; तीच स्थिती पुढे चालत राहिली.

श्री. जे. पी. नाईक यांनी १९४७ ते १९८१ पर्यंतच्या शिक्षणव्यवस्थेविषयी म्हटले आहे की, स्वातंत्र्यानंतर जो प्रस्थापितांचा वर्ग सत्तेवर आला त्याची अशी इच्छा होती की, उच्च शिक्षणाचा दर्जा वाढावाच, कारण त्यामुळे आपण आंतर-राष्ट्रीय दर्जाला पोचू, पण उच्च शिक्षण हे अशा प्रस्थापितांपुरतेच मर्यादित राहावे.[७] मला वाटते की, प्रस्थापितांची तशी इच्छा कदाचित् नसली तरी, नियोजन व त्याच्या अनुषंगाने उभारलेली आर्थिक नियंत्रणासाठीची यंत्रणा यांचा उपयोगही आर्थिक विकास प्रस्थापितांपुरताच व त्यांच्या नियंत्रणाखाली राहावा या साठी झाला. आज जर आपण १९४७ पासून पुढच्या चाळीस वर्षात जे अर्थकारण झाले व त्याच्या अनुरोधाने जे शैक्षणिक धोरण राहिले त्यांचा विचार केला तर हे स्पष्ट होते.

तथापि, शिक्षण ही खालच्या वर्गातून वरच्या वर्गात जाण्याची शिडी आहे, ही कल्पना लोकांच्या मनात खोल रुजली होती. प्रस्थापित वर्ग या शिडीचा उपयोग कोणाला वरच्या वर्गात येऊ देण्यासाठी करायचा व कोणाला प्रवेश नाकारायचा यासाठी करू चाहत होता; तर आम जनतेची इच्छा अशी होती प्रत्येकाला त्या शिडीचा उपयोग करता आला पाहिजे. 'गलिव्हर्स ट्रॅव्हल्स' या पुस्तकात एका उडत्या बेटाची गोष्ट आहे. या बेटावरचे लोक गणित व संगीत यांच्या उपासनेत दंग असून चैनीत राहात. त्यांना अन्नपाणी जमिनीवरून पुरविले जाई. अन्नपाण्याचा साठा हमाल लोक बेटावरून खाली सोडलेल्या शिड्यांवरून चढून जाऊन करीत. समजा खालच्या जमिनीवरील लोकांनी उंच शिडी तयार करून बेटाला टेकविली असती, तर बेटावरच्या लोकांनी काय केले असते? उडते बेट आणखी उंचावर नेले असते. नेमकी हीच गोष्ट येथील प्रस्थापितांनी केली. नाईक यांनी म्हटले आहे, 'प्रस्थापितांनी शिक्षणाच्या बाबतीत दुटप्पी धोरण स्वीकारले. त्यांनी उत्तम दर्जाचे उच्च शिक्षण देणाऱ्या काही संस्था आपल्या मुलांसाठी राखून ठेवल्या. या संस्थांच्या भोवती सामान्य किंवा हलक्या दर्जाचे शिक्षण देणाऱ्या झोपडपट्ट्या वाढू दिल्या.'[८]

याचे उदाहरण द्यायचे झाल्यास असे देता येईल. त्या वेळच्या मुंबई राज्याने ५८ साली आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना फुकट शिक्षण देण्याचे ठरविले. त्याचा फायदा घेऊन जी मुले माध्यमिक शाळेत आली ती ६५ साली शालांत परीक्षा उत्तीर्ण होऊन महाविद्यालयीन शिक्षणाला तयार झाली. १९६५ या एका वर्षी महाराष्ट्रात १५९ महाविद्यालये नव्याने सुरू झाली. या महाविद्यालयांना शिक्षक मिळेनात, प्राचार्य मिळेनात, ग्रंथालयांसाठी तरतूद नव्हती. साहजिकच यातली बहुतेक महाविद्यालये 'झोपडपट्टी' सदरात बसतील अशा स्वरूपाची होती. इतक्यावर भागले नाही. ही अर्धी कच्ची शिक्षक मंडळी विद्यापीठांच्या अधिकार मंडळांवर आली. त्यांनी अभ्यासक्रम, परीक्षा, उत्तरपत्रिका तपासणी या महत्त्वाच्या बाबतीत विद्यापीठाने 'सैलपणा' स्वीकारावा असा आग्रह धरला. परिणामतः संपूर्ण विद्यापीठाचा दर्जा घसरत गेला. या उलट, याच सुमाराला, मुख्यतः सामाजिक शास्त्रांचा वरच्या दर्जाचा अभ्यास जिथे चालेल असे जवाहरलाल नेहरू विद्यापीठ सुरू केले. (आता तेथे विज्ञानाचे शिक्षणही मिळते.) इथे प्रवेश परीक्षा घेऊन प्रवेश दिला जाई. थोडक्यात म्हणजे झोपडपट्टी महाविद्यालये, प्रादेशिक महाविद्यालये, केंद्रीय विद्यापीठे, राष्ट्रीय प्रौद्योगिक संस्थाने (आय्. आय्. टी.), राष्ट्रीय व्यवस्थापन संस्था (आय्. आय्. एस्.) अशी शिक्षण-संस्थांची एक उतरंडच उभी करण्यात आली. या उतरंडीचा हेतूच असा होता की, अभिजन वर्गातील मुलांना वरच्या दर्जाचे शिक्षण मिळावे व नव्याने शिक्षण घेणाऱ्या, आर्थिक दृष्टीने असमर्थ असणाऱ्या अशा वर्गातील माणसांना उच्चस्थानी पोचण्यास उपयोगी असे शिक्षण मिळण्यास जास्तीत जास्त अडथळे असावेत.

४.

इंग्रजांच्या काळात शिक्षण हे पूर्णपणे सरकारच्या अधीन होते व स्वातंत्र्योत्तर काळातही ४० वर्षेपर्यंत शिक्षणावर सरकारचा पूर्ण ताबा होता. इंग्रजांच्या काळापेक्षा फरक असा पडला की, नाना उपक्रमातून उच्च शिक्षणाच्या खर्चाचा अधिकाधिक बोजा मुख्यतः राज्यशासनावर पडला. शिक्षकांचे पगार वाढले, आर्थिक दृष्ट्या मागास, दलित व स्त्रिया यांचे शिक्षण शुल्क यांचा भार सरकारवरच पडला. परिणाम असा झाला की ज्याला

अनुक्रमणिका

सामान्य शिक्षण (जनरल एज्युकेशन) म्हणतात त्याचा होत चाललेला विस्तार सरकारला परवडेनासा झाला. खरे तर लोकसंख्येच्या मानाने हा पसारा अगदीच किरकोळ होता. १९६६ साली सुद्धा १८-२२ या वयोगटातील फक्त ४.८% मुलेच उच्च शिक्षण घेत होती.[९] हे खरे की यापैकी ८५% मुले सामान्य शिक्षणाच्या अभ्यासक्रमांकडे जात होती.[१०] अगदी २००६ साली देखील संबंधित वयोगटातील फक्त ६% मुले उच्च शिक्षणाकडे वळत होती.[११]

१९६८, १९७९, १९८६, १९८९ व १९९२ अशा पाच वेळेला सरकारने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण ठरविले.[१२] प्रत्येक वेळी हाकाटी एकच आहे की, सामान्य शिक्षण घेऊन पदवीधर होणाऱ्या तरुणांची संख्या (शेकडेवारी नव्हे) अव्वाच्या सव्वा वाढते आहे. व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू करावेत व शालांत परीक्षेनंतर किंवा उच्च माध्यमिक शिक्षण पुरे झाल्यावर विद्यार्थ्यांनी मुख्यतः रोजगार देणाऱ्या अभ्यासक्रमांकडे वळले पाहिजे. १९८६ साली ठरविलेले शैक्षणिक धोरण याबाबत फार परखडपणे बोलते. 'या (सामान्य) शिक्षणावर होणारा खर्च वाया जातो आहे. यातून निर्माण झालेले पदवीधर बेकार राहाताताच पण ते बेकार राहण्याच्या लायकीचे असतात.'[१३] ज्यांना उच्च विद्येच्या साधनेत खराखुरा रस आहे अशांनाच उच्च शिक्षण दिले पाहिजे. 'या बाबतीत उच्च शिक्षण मिळण्याची समान संधी हा मुद्दाच उद्‌भवत नाही; व्यर्थ जाणारा पैसा हा त्याहून महत्त्वाचा प्रश्न आहे.'[१४]

'सामान्य शिक्षण' (जनरल एज्युकेशन) मर्यादित ठेवायचे तर रोजगार मिळवून देणारे अभ्यासक्रम वाढले पाहिजेत व ते शिकविण्याची व्यवस्था झाली पाहिजे. असे अभ्यासक्रम म्हणजे केवळ अभियांत्रिकी व तंत्रज्ञान (टेक्नॉलॉजी) यांच्या शिक्षणाचेच अभ्यासक्रम असे नव्हे. त्यामध्ये शेतकी, वाणिज्य, व्यवस्थापन, आरोग्य व औषधयोजना, गृहशास्त्र अशा नाना विषयांचा समावेश होतो.[१५] धोरणकर्त्यांनी असे सुचविले होते की, इथून पुढे पारंपरिक महाविद्यालये व विद्यापीठे यांची वाढ करूच नये. नवीन विद्यापीठे व महाविद्यालये यांनी फक्त रोजगार देणारे आणि समाजोपयोगी असे अभ्यासक्रमच शिकवावेत.

सरकारी खर्चाने जरी शिक्षण चालू होते व समता-समाजवाद-विषमता निर्मूलन यांची हाकाठी करणारे जरी सरकार होते, तरी त्याने चालविलेल्या शिक्षण संस्थांच्या दर्जात कमालीची तफावत होती. 'राष्ट्रीय प्रौद्योगिकी संस्थाने (आय्. आय्. टी.) व प्रादेशिक अभियांत्रिकी महाविद्यालये यांचा गट व राज्य सरकारांनी चालविलेली अभियांत्रिकी महाविद्यालये यांचा गट या दोघात दर्जाच्या दृष्टीने फार फरक आहे. कित्येक राज्यांकडून तांत्रिक शिक्षणावर खर्च होणारी एकूण रक्कम एका रा. प्रौ. संस्थानावर खर्च होणाऱ्या रकमेपेक्षाही कमी आहे.'[१६]

स्थिती अशी होती की, जोपर्यंत आर्थिक विकासाचा दर फक्त २.५% होता, समाजात खेळता पैसाच नव्हता तोपर्यंत अभियांत्रिकी व तंत्रज्ञानविषयक अभ्यासक्रम वगळता इतर अभ्यासक्रम घेऊन पात्र होणाऱ्या विद्यार्थ्यांना रोजगार उपलब्ध होण्याची शक्यताच नव्हती. लोणची, मसाले, पापड इ. तयार केल्यास त्यांना केवढी बाजारपेठ ८० च्या दशकात उपलब्ध होती? अगदीच किरकोळ. समाजात पर्यटन करणाऱ्यांची संख्या किती होती? अशा स्थितीत पर्यटन-परिचारक निर्माण झाले तरी त्यांना कितीसा रोजगार मिळणार होता? आर्थिक धोरण आणि शैक्षणिक धोरण यांची सांगड घडावयाची तर त्यासाठी शासनाने भांडवलदारी अर्थकारणाचा आश्रय घ्यायला हवा होता; आणि शिक्षणासाठी होणाऱ्या खर्चाचा आर्थिक भार पेलवत नव्हता तर शिक्षणातही खाजगी भांडवल गुंतवणुकीला परवानगी द्यायला हवी होती. भांडवली अर्थकारण चांगले की वाईट, शिक्षणाचे खाजगीकरण योग्य की अयोग्य हे प्रश्न वेगळे आहेत. ज्या प्रकारे भारताचे अर्थकारण व शिक्षण स्वातंत्र्यापासून सुमारे ४५ वर्षे भरकटत होते ते पाहता १९९२ साली सरकारला भांडवली अर्थकारणाचा व शिक्षणाच्या खाजगीकरणाचा स्वीकार करणे अपरिहार्य झाले होते. 'चांगले-वाईट' या वर्गीकरणाच्या पलीकडची अपरिहार्यतेची कोटी आहे.

१९९२ च्या शैक्षणिक धोरणाच्या दस्तऐवजात स्पष्ट म्हटले आहे की, तांत्रिक-शिक्षण व व्यवस्थापन शिक्षण देणाऱ्या संस्था पूर्णपणे स्व-अर्थ-स्वयंपूर्ण (सेल्फ

फायनान्सिंग) असल्या पाहिजेत. इथे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी कर्जे काढून शुल्क भरावे; उच्च शिक्षण संस्थांनी शुल्कवाढ करावी; विद्यापीठातील संशोधन कार्यासाठी तसेच इमारत बांधणीसाठी बँका किंवा अर्थसंघटना यांच्याकडून पैसे मिळावेत, (म्हणजे त्यांनी कर्ज काढावे); ज्या समाजासाठी शैक्षणिक संस्था उभी केली आहे त्या समाजाने शिक्षणसंस्थेसाठी पैसे द्यावेत; अखरेची सूचना अशी की, उच्च शिक्षणसंस्था, तंत्रशिक्षण संस्था आणि व्यवस्थापन शिक्षण संस्था यांनी खाजगी किंवा सरकारी उद्योगांना सल्ला-मसलत पुरवून पैसा उभा करावा.[१७]

शासनाचा हा शिक्षणक्षेत्रातील खासगीकरणाला असलेला पाठिंबा सरकारच्या आर्थिक अडचणीतून जन्माला आला आहे. याचा अर्थ असा नाही की, शिक्षणावरील नियंत्रण सोडायला सरकार उत्सुक आहे. उलट शिक्षणसंस्थांवर नियंत्रण ठेवण्यासाठी नियंत्रक मंडळांची चळतच्या चळत उभी आहे. कोणत्याही अभियांत्रिकी महाविद्यालयाकडे पाहिले तरी असे दिसते की, (अ) त्याने शुल्क किती घ्यायचे हे ठरवण्यासाठी सरकारने नेमलेली संस्था आहे; (आ) त्याने विद्यार्थी कोणत्या शाखेला किती घ्यायचे हे ठरविण्यासाठी विद्यापीठ व राज्याचे तंत्रशिक्षण खाते यांचे नियम आहेत; (ड) या महाविद्यालयाला 'अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण मंडळ' (ए. आय्. सी. टी. ई.) याची मान्यता मान्यता लागते. अभिमत विद्यापीठाना विद्यापीठ अनुदान मंडळाच्या शिफारशींवरून केंद्र सरकार मान्यता देते. विद्यापीठ अनुदान मंडळाचा प्रतिनिधी अशा विद्यापीठांवर असतोच. यातली बहुतेक नियंत्रक मंडळे शिथिलपणाने कारभार करीत असल्याने या खासगी व्यवस्थापनांच्या मनमानी कारभारास फारसा अटकाव होत नाही, हा भाग अलाहिदा.

शिक्षणाच्या खासगीकरणास सर्वोच्च न्यायालयाच्या ऑक्टोबर २००२ च्या निकालाने फार मोठे प्रोत्साहन मिळाले. त्या निकालात न्यायालयाने म्हटले होते की शिक्षणसंस्था काढणे ही एक वृत्ती (प्रोफेशन) आहे. त्यामुळे कोणीही नागरिक शिक्षणसंस्था काढू शकतो. अडचण ही येते की, शिक्षण संस्थेला सरकारी नियंत्रण मंडळाची मान्यता नसेल त्या संस्थेच्या स्नातकांना नोकरी मिळणे अवघड जाते. ही मान्यता देताना ही नियंत्रण मंडळे (ज्यात विद्यापीठही येते.) संस्थाचालकांची गळचेपी करणाऱ्या अटी घालतात. तेव्हा न्यायालयाने असा निर्णय दिला की संस्थालकांच्या संस्थेचे व्यवस्थापन करण्याच्या अधिकारावरच ज्यामुळे गदा येईल अशा अटी नियंत्रण मंडळाला घालता येणार नाहीत. सर्वोच्च न्यायालयाच्या या निकालाचा आपल्या दृष्टीने फारच व्यापक अर्थ लावून काही संस्था चालकांनी अनेक अन्याय्य निर्णय घेतलेले आहेत.

५.

आज एकट्या महाराष्ट्राची अशी स्थिती आहे की, विना-अनुदानित खासगी शिक्षणसंस्थांची संख्या, त्यात झालेली पैशाची गुंतवणूक, त्यांनी सुरू केलेले विविध उपयोजनपर अभ्यासक्रम यांनी शिक्षणक्षेत्र गजबजून गेले आहे. जवळ जवळ १ लाख कोटी रुपयांची भांडवली गुंतवणूक या संस्थांनी केली आहे. जेव्हा या शिक्षणसंस्थांची सुरुवात झाली (१९८८ साली) त्यावेळी या संस्थांची पाहाणी करण्यासाठी पुणे विद्यापीठाने (आपल्या क्षेत्रापुरती) एक समिती नेमली होती. मी तिचा सभासद होतो. त्यावेळी यातील बहुतेक संस्थातल्या सोयी, शिक्षक व पायाभूत सुविधा यांची स्थिती अगदी दयनीय होती. असे वाटत होते की, या संस्था बंद पडतील. ७०० खाटांच्या, वैद्यकीय महाविद्यालयाशी संलग्न असणाऱ्या, रुग्णालयात ५० देखील रुग्ण नव्हते. परंतु आता २० वर्षांनंतर परिस्थिती पुष्कळच सुधारली आहे, असे दिसते. अशाच शिक्षणसंस्थातून शिकलेले स्नातक आता परदेशात जाऊन उत्तम कामगिरी करताना आढळतात.

याचा अर्थ असा नाही की, सर्व काही समाधानकारक आहे. या शिक्षणसंस्थातून उत्तम शिक्षक नेमले जातात की नाहीत, साधनसामग्री पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहे की नाही, विद्यार्थ्यांकडून पैसे उकळले जातात काय, अभ्यासक्रमांचे वारंवार परिष्करण होते का यावर लक्ष ठेवणारे गट ठिकठिकाणी तयार झाले पाहिजेत व त्यांनी या संस्थांना दक्ष राहाण्यास भाग पाडले पाहिजे. या बाबतीत सरकारकडून काही होईल अशी अपेक्षा बाळगणे व्यर्थ आहे. मी व माझे काही सहकारी यांनी उच्च

अनुक्रमणिका

न्यायालयात जनहितयाचिका सादर करून अनेक गैरकारभार उघडकीस आणले. परंतु उच्चन्यायालयाचा दृष्टिकोण 'चालत्या गाड्याला खीळ नको' असा दिसला. असे असले तरी राज्यभर 'स्वच्छ शिक्षण चळवळ' उभी केली पाहिजे.

दुसरे असे की या खासगी, विना-अनुदानीत संस्थांना सर्व पैसे विद्यार्थ्यांकडून शुल्क रूपाने मिळवावयाचे असल्याने, व शिक्षणाचा दर्जा उच्च ठेवायचा असेल तर, भरपूर शुल्क आकारणे गरजेचे आहे. थोडक्यात म्हणजे या शिक्षणासाठी येणारा खर्च युरोप-अमेरिकेत येणाऱ्या खर्चाशी तुलना करण्याइतका आहे. असा खर्च ज्यांना झेपू शकेल अशा कुटुंबांची संख्या एकूण कुटुंबांच्या संख्येच्या २०% च असवी असा अंदाज आहे.[१८] तेव्हा उरलेल्या कुटुंबातील तरुणांचे काय होणार? ह्या तरुणांना सरकारी किंवा अनुदानित संस्थांकडून मिळणाऱ्या नियंत्रित शिक्षणावर संतुष्ट राहावे लागणार काय? स्वस्त-धान्य-दुकानातून मिळणारे धान्य व रिलायन्सच्या खाते-दुकानातून मिळणारे धान्य यात जो फरक आहे, तसाच फरक या शिक्षणात राहाणार काय? असे प्रश्न निर्माण होतात. अजून तरी अशी उदाहरणे क्वचितच आढळतात की, कोण्या खासगी शिक्षण संस्थेने सरकारी/अनुदानित शिक्षण संस्थेतील हुशार विद्यार्थ्यांची आपल्या संख्येत शिष्यवृत्ती किंवा सवलती देऊन शिक्षणाची व्यवस्था केली आहे. यासाठी देखील काही तरी सार्वजनिक व संघटित चळवळ उभी करावी लागेल.

या खासगी संस्था प्रायः उपयोजित (ॲप्लाईड) व बाजारू (मार्केटेबल) अभ्यासक्रमांचे शिक्षण देतात. परंतु जे पारंपरिक विषय आहेत; उदा. तत्त्वज्ञान, संस्कृत, इंग्रजी वाङ्मय, प्राकृत भाषा इ., त्यांचे गुणवत्तापूर्ण शिक्षण चालत असे, त्याचे काय होणार? अजूनही आपल्या समाजात समृद्धीची पातळी इतक्या उंचीवर गेलेली नाही की, कोणी उदारबुद्धी श्रीमंत माणूस भरपूर निधी उभा करून अशा विषयांच्या शिक्षणासाठी संस्था निर्माण करील. तथापि, आणखी १०–१५ वर्षात आर्थिक संपन्नतेची ही उंची आपण गाठू असे वाटते.

एक गोष्ट नक्की आहे की भांडवली अर्थव्यवस्था व तिच्या सावलीत चालणारी शिक्षण व्यवस्था यांच्या योगाने समाजात फार मोठी घुसळण होऊन राहिली आहे. त्यातून कदाचित् अतिशय अस्वस्थता व उद्रेक घडून येतील किंवा आपल्या समाजात जी स्थितीस्थापकता आहे तिच्यामुळे ही घुसळण पचवून आपण समृद्धीची व शैक्षणिक उन्नतीची वाट चालत राहू.

आधारग्रंथ :–

१) वाय्. के. शर्मा – कंपॅरेटिव्ह एज्युकेशन, कनिष्क पब्लिशर्स, नवी दिल्ली, २००४.

२) केनेथ मिनॉग – द कॉन्सेप्ट ऑफ ए युनिव्हर्सिटी. ट्रॅन्झॅक्शन पब्लिशर्स लंडन १९७३.

३) ॲटनी स्टेल्ला व ए. ग्यानम् – ॲश्युअरिंग क्वालिटी ॲण्ड स्टॅण्डर्डस् इन हायर एज्युकेशन, द कॉन्टेम्पोररी कॉन्टेक्स्ट ॲण्ड कन्सर्न्स. ॲलाइड पब्लिशर्स दिल्ली, २००२.

४) जे. पी. नाईक – दी एज्युकेशन कमिशन ॲण्ड आफ्टर, ॲलाईड पब्लिशर्स दिल्ली १९८२.

५) दिगुमार्ती भास्कर राव (संपा.) – नॅशनल पॉलिसी ऑन एज्युकेशन - अनमोल पब्लिशर्स नवी दिल्ली १९९६.

तळटीपा :-

१. (१) पान २३०	२. (२) प्रस्तावना
३. (२) पान १२	४.(२) पान२६
५.(३) पान १६	६. तेथेच
७. (४) पान १५९-६०,	८. (४) पान ६०
९. (५) पान ४५	१०. (३) पान २०
११. तेथेच	१२. पहा (३) व (५)
१३. (५) पान ८४	१४. तेथेच
१५. (५) पान ५०	१६. (५) पान ५०
१७. (५) पान ३६६	१८. (३) पान २९

('सामाजिक परिवर्तन : चिकित्सा व भवितव्य' (भा. शं. भणगे गौरवग्रंथ) या ग्रंथातून.)

❖❖❖

पिवळा जर्द

देवीदास बागुल

रूपरंग ह्या द्वंद्वामध्ये परंपरेने रूपाला दशावतारीपण बहाल केले असले आणि रंगाला सप्तरंगी ठेवून संख्येत कमीपणा आणला असला तरी रंगांच्या दुनियेत एकेका रंगाचे दशावतारी खेळ दृष्टीला भोवळ आणल्याशिवाय राहत नाही. आणि हे रंगही ऋतूऋतूंमध्ये अनेकरंगी रंगतरंगत स्वतःची ठेवण दलबदल करीत फिरत राहतात.

पावसाळ्यात हिरवा माहेराला येतो, आणि हिवाळ्यात निळा आभाळात अवतरतो. आणि उन्हाळ्यात? उन्हाळ्यात तर सगळेच रंग सरमिसळपणे मिरवत राहतात. तांबडाभडक गुलमोहर, गर्दजांभळा जभारोडा, पांढराशुभ्र मोगरा ही उन्हाळी मंडळी मिरवत असताना भर उन्हाळ्यात आणखी एक रंग झळाळत दृष्टीला आरपार घेरून टाकतो.

उन्हाळ्यातले बहाव्याचे पिवळे जर्दपण कडक उन्हाला मवाळपण बहाल करते. उन्हाळ्यातला पिवळा बहावा दृष्टीस पडल्यावर आधीची पितांबरी मंडळी – पिवळा चाफा, सोनचाफा, पिवळी शेवंती, झेंडू, शंकासुराचे तुरे – किरकोळपणात जातात, निर्माल्य होतात. आणि हा बहावा सबंध झाडभर द्राक्षघोससम बहाराने एक स्वयंपूर्ण झुंबर होऊन दिवसाढवळ्या ग्रीष्मसूर्याच्या तप्त उन्हावर किमया करून त्या उन्हाचे सोने करतो.

श्रावणातले ऊन कोवळे असते, पिवळे असते. 'पिवळे पिवळे ऊन कोवळे पसरे चौफेर' असे बालकवी म्हणतात. पण श्रावण वेगळा आणि वैशाख वेगळा वैशाखातले ऊन कोवळे नसते, तर कडक असते. हिवाळा, पावसाळा रंगात आले असे आपण म्हणतो. पण उन्हाळा रंगात आला असे म्हणण्यापुरताही आपला प्राण उरत नाही. त्या उन्हाळी तापाने कासावीस झालेला आपला प्राण हवेत उडून जातो. त्वचा नकोशी वाटते. कृ. ब. निकुंबांच्या कवितेतील सखी म्हणते, 'बैस सख्या रे दूरच फुलली कणाकणात दुपार'. अशा रणरणत्या उन्हात दुपारी गुरेसुद्धा झाडाची सावली धरून गपगार बसून राहतात. कुठेही बघवत नाही. बघितले तर डोळ्यांना भोवळ येते.

अशा निरंगी आणि आरपार उन्हात कुठेतरी तो अचानक दिसतो. दिसतो कसला, थेट नजरेतच घुसतो. थोडा-थोडका नव्हे, तर आख्खाच्या आख्खा. सगळा प्राण डोळ्यात गोळा होतो. नजरेसमोर तोच एकटा नाचत राहतो. झुळझुळत राहतो. बहावा. पिवळा बहावा. आजूबाजूचे सगळे जग विरून जाते. आणि हे पिवळे रूपडे रूपवान होऊन 'टिप फुले टिप' म्हणून आपल्या खुणवीत राहते. सुंदर ते ध्यान, उभे विटेवरी, कर कटेवरी ठेवूनिया हा बहावा 'कासे पितांबर' नेसून खदखदा हासत असतो. म्हणतो, कुठे जाता पंढरपुरा, आता इथेच पितांबरपुरा मुक्काम ठोका.

पितांबरपुरच नाहीतर काय! त्याच्या कमरेला तर पितांबर असतोच, पण लल्लाटीसुद्धा पितांबरच असते. 'मकरकुंडले तळपती श्रवणी' म्हणून याच्या कानाकानातसुद्धा पितांबराचीच मकरकुंडले तळपत असतात. याच्या डाव्याउजव्या हातात पितांबर, आणि गळ्यात कौस्तुभमणी म्हणून पितांबर. याच्या पोटातसुद्धा पितांबरी माया. जेथे पहावे तेथे अंग भरून पिवळेपण उरलेले दिसते.

पलीकडच्या द्राक्षबागेतून कोणीतरी द्राक्षांचे घोसच्या घोस आणून ह्या बहाव्यावर अडकवून ठेवले आहेत. अडकवताना त्या अडाण्याने त्या द्राक्षांची फुले केली आहेत. टोकाला कळ्या, आणि वरवरच्या अंगाला उमलूउमलू करणारी, मग अर्धस्फुट, मग पूर्णस्फुट, आणि अगदी वर पाकळी पाकळी वेगळी करून तो घोस फांदीफांदीला दिला चिकटवून. आता बघा कसा दिसतो हा नटवर!

मनात म्हटले, ह्याचे कोणते नाटक मनात साठवावे? जसेच्या तसे साठवणे काही कठीण नाही. ते काम कोणताही वास्तववादी चित्रकार डाव्या हातानेसुद्धा

करील. त्याला नाही जमले तर आजचा हरहुन्नरी कॅमेरा एका पायावर करायला तयार होईल. पण ते चित्र म्हणजे नुसते चित्र झाले असते. त्या चित्राचे गाणे व्हायचे असेल तर मग वेगळा मांड हवा. वेगळा मेळ हवा. गाण्याची ओळ म्हटली जात असताना मागे व्हायोलिनची धून धूसरधूसर होत जावी. मधेच दोनक्षणी संतूर हवी. कि मग पुन्हा फुलांची मांड. ती मोड घट्ट हवी.

अशा अवघड वेळी कॅमेरा हळूच गुणगुणला, 'मैं हूं ना.' असहायता लयाला गेली आणि बहाव्याचा एक झुबका गेस्ट आर्टिस्ट म्हणून घरी आणला. घरातल्या अंधारावर तो झुबका तोलून धरला आणि डोळा कॅमेऱ्याला जुळवला. 'अय्योयो, सुकूसुकू.' (सुकूसुकू) वास्तव पळाले आणि अवास्तव अवतरले. प्रत्यक्षात नसणारे, पण कल्पनेच्या तीरावरले ते श्रेय पाहून 'मन रामरंगी रंगले' आणि शूट केले.

आतून कोठून तरी कोणीतरी गाऊ लागले,

तुज सगुण म्हणू की निर्गुण रे।
सगुण निर्गुण एकू गोविंदु रे।।

ता.क. म्हणून म्हणतो, ह्या उन्हाळ्यात कोकिळेचा स्वर (मला माहीत आहे की कोकिळा गात नसून कोकीळ गातो, तरीसुद्धा ललितलेखात कोकिळाच म्हणणार. कलेसाठी म्हणणार. डॉक्युमेंटरीच्या वेळी तुम्ही म्हणत बसा कोकीळ.) नाही ऐकला तरी चालेल, पण ध्यानात ध्यान हवे असेल तर हा पितांबरी बहावा नयनांतरी धारण करावा ही आदिअंती प्रार्थना!

✧✧✧

अनुक्रमणिका

काल, आज आणि उद्या

मुख्तरन माईची कहाणी

साक्षी

आधुनिकता, विवेकवाद, परिवर्तनवाद इ. शब्द गेली सत्तर पंच्याहत्तर वर्षे आपण ऐकत आलो आहोत. नैसर्गिक घडामोडी जशा काही नियमांनी घडतात व त्या नियमांचा अभ्यास करून आपण जर योग्य ते तंत्र बसवले तर निसर्गाचा उपयोग आपण मनुष्याच्या सुखासाठी करून घेऊ शकतो, असा अनुभव पाश्चात्त्य समाजाला औद्योगिक क्रांतीच्या रूपाने मिळाला. त्यानंतर असा विचार सहजच उद्‌भवला की, सामाजिक घडामोडी या देखील अशाच काही नियमांनी घडत असतील व असे नियम सामाजिक घडामोडींच्या अभ्यासातून आपण बांधू शकलो तर आपणास समाजाची अशी घडी बसवता येणे शक्य होईल की जीमुळे समाजातील प्रत्येक व्यक्तीस सुख लागेल. एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात युरोपात समाजशास्त्र (सोशियॉलॉजी) या विषयाच्या अभ्यासाला सुरुवात झाली त्याची पृष्ठभूमी, स्थूलमानाने, अशी आहे.

समजा सामाजिक बदलाचे नियम आपणास कळले, तरी अखेर बदल घडून यायचा तो समाजातील लोकांकरवीच घडून आला पाहिजे. म्हणजे लोकांच्यात आपणास कशा प्रकारचा बदल हवा याची नेमकी जाणीव निर्माण करून दिली पाहिजे. ही जाणीव निर्माण करण्याचा उपाय म्हणजे लोकांचे शिक्षण किंवा प्रबोधन केले पाहिजे. तसे कायदे केले पाहिजेत. चळवळी करून सरकारला तसे कायदे करण्यास भाग पाडले पाहिजे. 'प्रबोधनातून परिवर्तन' ही परवलीची संकल्पना युरोपातील विचारवंतांनी निर्माण केली, तिला निरनिराळ्या प्रासंगिक चळवळींनी रंग-रूप दिले. हीच संकल्पना इंग्रजी राज्य व इंग्रजी शिक्षण यांच्याद्वारे हिंदुस्थानात आली. निरनिराळ्या सामाजिक चळवळींनी प्रबोधनाचा वसा उचलला. गेली दीडशे वर्षे प्रबोधन व परिवर्तन यांनी विचारवंतांच्या मनावर अंमल चालविला आहे.

प्रबोधनातून परिवर्तन ही कल्पना त्या काळातील युरोपात विद्वानांना आकर्षक वाटली, कारण परिवर्तनाचा दुसरा मार्ग जो क्रांती, तो किती संकटाचा आहे याची कल्पना फ्रेंच राज्यक्रांतीवरून त्यांना आली होती. मनुष्यहत्या, अस्वस्थता, दीर्घकालीन अराजक, संशयपूर्ण वातावरण, दहशत, बेबंद व अर्बुज जमावाने घातलेले गोंधळ, कुचंबून राहिलेला अर्थव्यवहार, परंपरेला बसलेले हादरे या सर्वांचा धसका घेऊन युरोपीय विचारवंतांनी समाजात बदल घडवून आणण्याचा हा सुलभ व सोयिस्कर पर्याय शोधून काढला होता. परंतु, युरोपात व विशेषतः इंग्लंडमध्ये जे परिवर्तन १९ व्या शतकाच्या पूर्वार्धात घडून आले ते शांततापूर्ण किंवा हिंसाशून्य होते, असे मुळीच म्हणता येणार नाही. समाजाच्या परिघावर असणारी अशिक्षित व दरिद्री माणसे, बायका व मुले, ज्यू धर्माचे लोक, अल्पभूधारक शेतकरी, फिरस्ते जिप्सी आणि ख्रिस्ती धर्म न मानणारे पाखंडी यांना प्रचंड हाल-अपेष्टा या परिवर्तनाच्या काळात सोसाव्या लागल्या. त्यांची उपासमार झाली, ते देशोधडीला लागले, त्यांची कुटुंबे उद्‌ध्वस्त झाली, कित्येक फासावर चढले तर अनेकांना गोळ्या घालून मारण्यात आले. पुष्कळांचा अतोनात छळ झाला. युरोपीय राष्ट्रांची उभारणी झाली; त्यांची प्रशासने सुगठित होत गेली; बाजारपेठा भरभराटीला आल्या, उद्योगधंदे वाढले; पण यासाठी गरीब व दलित लोकांचे बळी गेले. इंग्लंडमधील मताधिकाराचा विस्तार झाला, ही गोष्ट आपण शांततामय परिवर्तनाचे एक उत्कृष्ट उदाहरण समजतो; परंतु परिघावरील प्रजेचे, मताधिकार मिळाल्याने, सबलीकरण होताना त्या प्रजेपैकी फार मोठ्या समूहांना नष्ट केले गेले, हे विसरून चालणार नाही. सारांश, प्रबोधनातून परिवर्तन ही कल्पना कागदावर जरी निरपवाद आणि निर्दोष वाटली तरी परिवर्तन व्यवहारात उतरताना त्या परिवर्तनाला निकराचा विरोध होतोच व त्यासाठी काही लोकांचे बलिदान घडून येते, हा इतिहास

आहे.

जिथे वैज्ञानिक शोध लागले, औद्योगिक क्रांती घडून आली, आर्थिक भरभराट ज्या समाजांनी अनुभविली, ज्यांनी वसाहती करण्यासाठी मोठमोठे भूप्रदेश हस्तगत केले अशा समाजात परिवर्तन होताना जर इतक्या मोठ्या खळबळींना तोंड द्यावे लागले तर जिथे आधुनिक विज्ञानाचे वारे पोचलेले नाही, जिथे औद्योगिक उत्पादन नुसते ऐकून माहीत आहे, जेथील गुजराण कोरडवाहू जमिनीत पिकणाऱ्या अपुऱ्या धान्यावर चालते, जिथे एकाची सुबत्ता दुसऱ्याचा निर्वाह ओरबाडून घेतल्यानेच शक्य होते अशा, टोळ्याटोळ्यात विभागलेल्या, रानटी समाजात प्रबोधन व परिवर्तन यांना अवकाश तरी कोठून मिळणार ? इथे जी काही खुडबूड होईल तिला परिवर्तनाचे प्रसादचिन्ह मानून तिचा गौरव करण्यात परिवर्तनवादी धन्यता मानणार हे स्वाभाविक आहे. मुख्तरन माईची कहाणी अशा पैकीच आहे व तिने शादी केल्यानंतर स्त्रीवादी चळवळीला तोंडघशी पडल्यासारखे वाटते आहे, तेही साहजिकच म्हटले पाहिजे.



१.

पाकिस्तानातील पंजाब हा प्रांत फार समृद्ध आहे आणि तेथील उंच हाडा पेराचे दांडगे लोक पाकिस्तानी लष्करात मोठ्या प्रमाणावर भरती होतात. पाकिस्तानावर पंजाबीच राज्य करतात असे सांगितले जाते. पंजाबातील रईस घराण्यातील पुरुष पाश्चात्त्य देशात शिकायला जातात, पाश्चात्त्य पद्धतीने राहातात, राजकारण व समाजकारण यात नेतृत्व गाजवितात. काही लोक आखाती देशात डॉक्टर्स, एंजिनियर्स म्हणून जातात व खूप पैसा मिळवितात. हे सर्व असले तरी त्यांच्यावरील जमिनदारी वृत्तीची पकड घट्ट असते. घरातील स्त्रियांना मिळणारी वागणूक अतिशय कठोर व सनातनी नियमांची जबरदस्ती करणारी असते.

या पंजाब प्रांतात जसजसे पश्चिमेकडे व दक्षिणेकडे जावे तसतशी समाजव्यवस्था बदललेली आढळून येते. पठाण व बलुची टोळ्यांनी या भागातील गावे वसवली आहेत. इथे पाकिस्तानातील आधुनिक कायदे-कानू, प्रशासन, पोलिस, वाहतूकव्यवस्था, टेलिफोन-तारायंत्र यांचा स्पर्शही झालेला नाही. दर टोळीवर त्या टोळीच्या पंचायतीचा अंमल चालतो. हे पंच त्यांच्या परंपरेने चालत आलेल्या समजुतींशी घट्ट बांधलेले असतात. व्यक्तिस्वातंत्र्य, विचारस्वातंत्र्य, भाषणस्वातंत्र्य इत्यादी आधुनिक समाजांनी स्वीकारलेली मूल्ये या टोळीतील माणसांना माहीत नसतात व माहीत नसल्याने त्यांची जरुरी त्यांना वाटत नाही. येथील लोकांना शिक्षण ठावकी नाही व स्त्रिया तर शिक्षणापासून शंभर कोस दूर आहेत.

अशा ह्या कोंदलेल्या भागात मुलतान हे इतिहास-प्रसिद्ध शहर आहे. शहराच्या दक्षिणेला मुझफ्फरगढ नावाचा जिल्हा आहे. त्या जिल्ह्यात जातोई नावाच्या तालुक्यात मीरवाला नावाची लहानशी वस्ती आहे. या वस्तीचा बाजूच्या जगाशी असणारा संपर्क अगदीच तुटपुंजा आहे. गावात टेलिफोन नाही, दवाखाना नाही, बस-सेवा नाही. अठरा किलोमीटर अंतरावर जातोई हे तालुक्याचे गाव आहे. मीरवालामध्ये मास्तोई या बलुच टोळीची बहुसंख्या आहे. ही जमात तुलनेने श्रीमंत आहे. बरीच जमीन त्यांच्या मालकीची आहे. मीरवाला या

काल, आज आणि उद्या

मुख्तरन माईची कहाणी

साक्षी

आधुनिकता, विवेकवाद, परिवर्तनवाद इ. शब्द गेली सत्तर पंच्याहत्तर वर्षे आपण ऐकत आलो आहोत. नैसर्गिक घडामोडी जशा काही नियमांनी घडतात व त्या नियमांचा अभ्यास करून आपण जर योग्य ते तंत्र बसवले तर निसर्गाचा उपयोग आपण मनुष्याच्या सुखासाठी करून घेऊ शकतो, असा अनुभव पाश्चात्त्य समाजाला औद्योगिक क्रांतीच्या रूपाने मिळाला. त्यानंतर असा विचार सहजच उद्‌भवला की, सामाजिक घडामोडी या देखील अशाच काही नियमांनी घडत असतील व असे नियम सामाजिक घडामोडींच्या अभ्यासातून आपण बांधू शकलो तर आपणास समाजाची अशी घडी बसवता येणे शक्य होईल की जीमुळे समाजातील प्रत्येक व्यक्तीस सुख लागेल. एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात युरोपात समाजशास्त्र (सोशियॉलॉजी) या विषयाच्या अभ्यासाला सुरुवात झाली त्याची पृष्ठभूमी, स्थूलमानाने, अशी आहे.

समजा सामाजिक बदलाचे नियम आपणास कळले, तरी अखेर बदल घडून यायचा तो समाजातील लोकांकरवीच घडून आला पाहिजे. म्हणजे लोकांच्यात आपणास कशा प्रकारचा बदल हवा याची नेमकी जाणीव निर्माण करून दिली पाहिजे. ही जाणीव निर्माण करण्याचा उपाय म्हणजे लोकांचे शिक्षण किंवा प्रबोधन केले पाहिजे. तसे कायदे केले पाहिजेत. चळवळी करून सरकारला तसे कायदे करण्यास भाग पाडले पाहिजे. 'प्रबोधनातून परिवर्तन' ही परवलीची संकल्पना युरोपातील विचारवंतांनी निर्माण केली, तिला निरनिराळ्या प्रासंगिक चळवळींनी रंग-रूप दिले. हीच संकल्पना इंग्रजी राज्य व इंग्रजी शिक्षण यांच्याद्वारे हिंदुस्थानात आली. निरनिराळ्या सामाजिक चळवळींनी प्रबोधनाचा वसा उचलला. गेली दीडशे वर्षे प्रबोधन व परिवर्तन यांनी विचारवंतांच्या मनावर अंमल चालविला आहे.

प्रबोधनातून परिवर्तन ही कल्पना त्या काळातील युरोपात विद्वानांना आकर्षक वाटली, कारण परिवर्तनाचा दुसरा मार्ग जो क्रांती, तो किती संकटाचा आहे याची कल्पना फ्रेंच राज्यक्रांतीवरून त्यांना आली होती. मनुष्यहत्या, अस्वस्थता, दीर्घकालीन अराजक, संशयपूर्ण वातावरण, दहशत, बेबंद व अर्बुज जमावाने घातलेले गोंधळ, कुचंबून राहिलेला अर्थव्यवहार, परंपरेला बसलेले हादरे या सर्वांचा धसका घेऊन युरोपीय विचारवंतांनी समाजात बदल घडवून आणण्याचा हा सुलभ व सोयिस्कर पर्याय शोधून काढला होता. परंतु, युरोपात व विशेषतः इंग्लंडमध्ये जे परिवर्तन १९ व्या शतकाच्या पूर्वार्धात घडून आले ते शांततापूर्ण किंवा हिंसाशून्य होते, असे मुळीच म्हणता येणार नाही. समाजाच्या परिघावर असणारी अशिक्षित व दरिद्री माणसे, बायका व मुले, ज्यू धर्माचे लोक, अल्पभूधारक शेतकरी, फिरस्ते जिप्सी आणि ख्रिस्ती धर्म न मानणारे पाखंडी यांना प्रचंड हाल-अपेष्टा या परिवर्तनाच्या काळात सोसाव्या लागल्या. त्यांची उपासमार झाली, ते देशोधडीला लागले, त्यांची कुटुंबे उद्ध्वस्त झाली, कित्येक फासावर चढले तर अनेकांना गोळ्या घालून मारण्यात आले. पुष्कळांचा अतोनात छळ झाला. युरोपीय राष्ट्रांची उभारणी झाली; त्यांची प्रशासने सुगठित होत गेली; बाजारपेठा भरभराटीला आल्या, उद्योगधंदे वाढले; पण यासाठी गरीब व दलित लोकांचे बळी गेले. इंग्लंडमधील मताधिकाराचा विस्तार झाला, ही गोष्ट आपण शांततामय परिवर्तनाचे एक उत्कृष्ट उदाहरण समजतो; परंतु परिघावरील प्रजेचे, मताधिकार मिळाल्याने, सबलीकरण होताना त्या प्रजेपैकी फार मोठ्या समूहांना नष्ट केले गेले, हे विसरून चालणार नाही. सारांश, प्रबोधनातून परिवर्तन ही कल्पना कागदावर जरी निरपवाद आणि निर्दोष वाटली तरी परिवर्तन व्यवहारात उतरताना त्या परिवर्तनाला निकराचा विरोध होतोच व त्यासाठी काही लोकांचे बलिदान घडून येते, हा इतिहास

आहे.

जिथे वैज्ञानिक शोध लागले, औद्योगिक क्रांती घडून आली, आर्थिक भरभराट ज्या समाजांनी अनुभविली, ज्यांनी वसाहती करण्यासाठी मोठमोठे भूप्रदेश हस्तगत केले अशा समाजात परिवर्तन होताना जर इतक्या मोठ्या खळबळींना तोंड द्यावे लागले तर जिथे आधुनिक विज्ञानाचे वारे पोचलेले नाही, जिथे औद्योगिक उत्पादन नुसते ऐकून माहीत आहे, जेथील गुजराण कोरडवाहू जमिनीत पिकणाऱ्या अपुऱ्या धान्यावर चालते, जिथे एकाची सुबत्ता दुसऱ्याचा निर्वाह ओरबाडून घेतल्यानेच शक्य होते अशा, टोळ्याटोळ्यात विभागलेल्या, रानटी समाजात प्रबोधन व परिवर्तन यांना अवकाश तरी कोठून मिळणार ? इथे जी काही खुडबूड होईल तिला परिवर्तनाचे प्रसादचिन्ह मानून तिचा गौरव करण्यात परिवर्तनवादी धन्यता मानणार हे स्वाभाविक आहे. मुख्तरन माईची कहाणी अशा पैकीच आहे व तिने शादी केल्यानंतर स्त्रीवादी चळवळीला तोंडघशी पडल्यासारखे वाटते आहे, तेही साहजिकच म्हटले पाहिजे.



१.

पाकिस्तानातील पंजाब हा प्रांत फार समृद्ध आहे आणि तेथील उंच हाडा पेराचे दांडगे लोक पाकिस्तानी लष्करात मोठ्या प्रमाणावर भरती होतात. पाकिस्तानावर पंजाबीच राज्य करतात असे सांगितले जाते. पंजाबातील रईस घराण्यातील पुरुष पाश्चात्त्य देशात शिकायला जातात, पाश्चात्त्य पद्धतीने राहातात, राजकारण व समाजकारण यात नेतृत्व गाजवितात. काही लोक आखाती देशात डॉक्टर्स, एंजिनियर्स म्हणून जातात व खूप पैसा मिळवितात. हे सर्व असले तरी त्यांच्यावरील जमिनदारी वृत्तीची पकड घट्ट असते. घरातील स्त्रियांना मिळणारी वागणूक अतिशय कठोर व सनातनी नियमांची जबरदस्ती करणारी असते.

या पंजाब प्रांतात जसजसे पश्चिमेकडे व दक्षिणेकडे जावे तसतशी समाजव्यवस्था बदललेली आढळून येते. पठाण व बलुची टोळ्यांनी या भागातील गावे वसवली आहेत. इथे पाकिस्तानातील आधुनिक कायदे-कानू, प्रशासन, पोलिस, वाहतूकव्यवस्था, टेलिफोन-तारायंत्र यांचा स्पर्शही झालेला नाही. दर टोळीवर त्या टोळीच्या पंचायतीचा अंमल चालतो. हे पंच त्यांच्या परंपरेने चालत आलेल्या समजुतींशी घट्ट बांधलेले असतात. व्यक्तिस्वातंत्र्य, विचारस्वातंत्र्य, भाषणस्वातंत्र्य इत्यादी आधुनिक समाजांनी स्वीकारलेली मूल्ये या टोळीतील माणसांना माहीत नसतात व माहीत नसल्याने त्यांची जरुरी त्यांना वाटत नाही. येथील लोकांना शिक्षण ठावकी नाही व स्त्रिया तर शिक्षणापासून शंभर कोस दूर आहेत.

अशा ह्या कोंदलेल्या भागात मुलतान हे इतिहास-प्रसिद्ध शहर आहे. शहराच्या दक्षिणेला मुझफ्फरगढ नावाचा जिल्हा आहे. त्या जिल्ह्यात जातोई नावाच्या तालुक्यात मीरवाला नावाची लहानशी वस्ती आहे. या वस्तीचा बाजूच्या जगाशी असणारा संपर्क अगदीच तुटपुंजा आहे. गावात टेलिफोन नाही, दवाखाना नाही, बस-सेवा नाही. अठरा किलोमीटर अंतरावर जातोई हे तालुक्याचे गाव आहे. मीरवालामध्ये मास्तोई या बलुच टोळीची बहुसंख्या आहे. ही जमात तुलनेने श्रीमंत आहे. बरीच जमीन त्यांच्या मालकीची आहे. मीरवाला या

वस्तीत इतर टोळ्यांचे लोकही आहेत; पण त्यांना मास्तोई टोळी पुढे दबून राहावे लागते.

गुज्जर टाट्ला ही अशीच एक मास्तोईच्या पुढे अगदीच दुर्बळ वाटणारी टोळी. या टोळीतील शकूर नावाच्या नवथर तरुणाने मास्तोई टोळीतल्या सलमा नावाच्या मुलीशी लफडे केले, असा मास्तोईच्या म्होरक्यांना संशय आला. मास्तोई टोळीतील तीन दाणगटांनी शकूरला ताब्यात घेतले. त्याच्यावर त्यांनी अनैसर्गिक लैंगिक अत्याचार केले व दुपारी त्याला सलमाचा भाऊ अब्दुल खालिक याच्या घरी डांबून ठेवले. शकूरला खालिकच्या घराकडे घालवले असताना शकूरने बोंबाबोंब केली. गुज्जर टाट्ला टोळीचे पुरुष तेव्हा गावात नसावेत. शेतावर गेले असतील. पण शकूरची बहीण मुख्तरन, शकूरची आई व इतर स्त्रिया खालिकच्या घराकडे धावल्या आणि त्यांनी शकूरला सोडविण्याची खटपट चालविली. पण खालिकने शकूरला सोडले नाही. त्या उपऱ्या पोराने आपल्या बहिणीशी अनैतिक संबंध ठेवले व घराण्याची इभ्रत डागाळली याची माफी खालिक कधीच करू धजला नसता. गोष्टी इतक्या थराला आल्यावर शकूरच्या आईने आपल्या भावाला तालुक्याच्या ठिकाणी पोलिसांकडे पाठवले.

आता उन्हे कलली होती. टाट्ला टोळीचे पुरुष शेतावरून परतून एकत्र बसून झाल्या गोष्टीचा खल करत होते. इकडे मास्तोई जातीचे दोन-अडीचशे पुरुषही गोळा झाले होते. खालिकच्या घराजवळ त्यांचीही बैठक चालू होती. मास्तोई जमातीची अब्रू पणाला लागली होती. या लोकांनी आपल्यातील तिघाजणांचे एक मंडळ तयार करून त्याला याबाबतीतील कोणताही निर्णय करण्याचे अधिकार दिले.

दिवस मावळता मावळता जातोईहून पोलिस आले. त्यांनी खालिकच्या घरातून शकूरला सोडवले. आणि आपल्या ताब्यात घेतले; आणि जातोईला नेऊन चौकीत बंद करून ठेवले. नंतर पोलिसांनी सलमाची इज्जत घेतल्याचा आरोप शकूरवर ठेवला. ही सर्व घटना २२ जून २००२ रोजी झाली. त्या दिवशी शनिवार होता.

आता शकूरच्या कुटुंबियांनी मास्तोईंशी तडजोड करण्याची भूमिका घेतली. ते म्हणाले की, आपण शकूरची सलमाशी शादी करू आणि मुख्तरनची शादी कोणत्याही मास्तोई मुलाशी करू. तसेच जर शकूरने सलमाची इज्जत घेतली असेल तर, तर भरपाई म्हणून सलमाच्या घरच्यांना काही जमीन देऊ. हा आपला प्रस्ताव त्यांनी मास्तोईतील वडिलधारा माणूस फैझान याच्या पुढे ठेवला. असे म्हणतात की, फैझानला ही तडजोड बरी वाटत होती.

पण सलमाच्या कुटुंबातील दोघा पुरुषांना वाटत होते की, लुटलेल्या अब्रूचा सूड अब्रू लुटूनच घेतला पाहिजे. म्हणून रमझान पाचार व गुलाम मास्तोई हे दोघे मुख्तरनच्या घरी गेले व त्यांनी सांगितले की, मुख्तरनने स्वतः मास्तोईची गोतसभा भरली आहे तिथे येऊन सलमाच्या कुटुंबाची माफी मागावी, म्हणजे तडजोड मान्य होईल. त्यामुळे मुख्तरन आपले वडील व मामा यांना घेऊन मास्तोईच्या गोतसभेपुढे गेली. तेव्हा तिथे सुमारे सत्तर इसम हजर होते. तिथे फैझानाने सांगितले की, तंटा मिटला आहे आणि शकूरच्या कुटुंबाला माफी दिली पाहिजे.

मुख्तरन तेथून परतत असताना सलमाचा भाऊ अब्दुल खालिक हातात पिस्तुल घेऊन या तिघांच्या पुढ्यात आला आणि त्याने मुख्तरनला जबरदस्तीने ताब्यात घेतले. त्याने तिला ओढून जवळच्या गोठ्यात नेले व बारा-चौदा जणांनी तिच्यावर बलात्कार केला. सुमारे तासभर ती त्या गोठ्यात होती. नंतर त्या गुंडांनी तिला नागड्या-उघड्या अवस्थेत बाहेर ढकलले व तिचे टरकावलेले कपडे तिच्या मागोमाग बाहेर फेकून दिले.

त्याच रात्री पोलिसांना निरोप गेला की, दोन टोळ्यातला तंटा मिटला आहे. सलमाच्या कुटुंबाने शकूरविरुद्धची तक्रार मागे घेतली आहे. दुसऱ्या दिवशी पहाटे शकूरच्या मामाने शकूरला चौकीतून सोडवून आणले. पोलिसांनी केलेला हस्तक्षेप वगळता घडलेल्या सर्व गोष्टी जमातदारी जीवनशैलीला धरून झाल्या होत्या, असे म्हटले पाहिजे.

२.

नंतरच्या आठवड्यातल्या शुक्रवारी गावचे इमाम अब्दुल रझ्झाक यांनी नमाजाच्या वेळी केलेल्या आपल्या भाषणात बलात्काराच्या घटनेचा धिक्कार केला. मागाहून त्यांनी जातोईहून मुरीद अब्बास नावाच्या

अनुक्रमणिका

पत्रकाराला बोलावून घेतले. दोघांनी मुख्तरनच्या वडिलांची भेट घेतली. बलात्कार झाल्यानंतर टोळीवाल्यांच्या रिवाजानुसार मुख्तरनने आत्महत्या करायला हवी होती. पण इमामांचा पाठिंबा मिळाल्यावर मुख्तरनच्या कुटुंबाने ठरविले की, टोळयांच्या रीतिरिवाजातून बाहेर पडून आधुनिक कायदेकानूंचा आश्रय घ्यायचा. ते लोक ३० जून २००२ ला जातोईतल्या पोलिस चौकीत गेले व तेथे त्यांनी फिर्याद दाखल केली. एक सांदी-कोपऱ्यात खितपत असलेली मुलगी साऱ्या आधुनिक जगाच्या कौतुकाचा आणि कुतूहलाचा विषय होऊन राहाणार होती.

नंतरच्या काही दिवसात मुख्तरनची दुर्दैवी कथा वर्तमानपत्रांच्या मार्फत पाकिस्तानातील घराघरात पोचली आणि अभिजन समाजात चर्चेचा विषय होऊन राहिली. पाकिस्तानच्या मुख्य न्यायाधिशांनी मुख्तरनवर झालेला अत्याचार ही एकविसाव्या शतकातील सर्वात घृणास्पद घटना होय, असे सांगून पोलिसांनी ज्या पद्धतीने हे प्रकरण हाताळले त्यावर कठोर टीका केली. पाकिस्तानी सरकारने मुख्तरनवरील अत्याचाराचे अंशतः परिमार्जन करण्यासाठी तिला पाच लाख रुपयांची भरपाई दिली. पाकिस्तानात महिला-खाते असून त्या खात्याची मंत्री अतिया इनामनुल्ला म्हणून होती. ती मुख्तरनला भेटली तेव्हा मुख्तरनने डोळयात पाणी आणून सांगितले, "बाईसाहेब, पाकिस्तान सरकार माझ्या मदतीला आले नसते तर मला आत्महत्येखेरीज दुसरा मार्ग नव्हता." पाकिस्तानी वृत्तपत्रांनी या बातम्या ठळक मथळयांखाली छापल्या.

परदेशी प्रसार-माध्यमांनीही मुख्तरनच्या प्रकरणाला भरपूर प्रसिद्धी दिली. ३ जुलै २००२ रोजी ब्रिटिश रेडिओ व टेलिव्हिजन यांनी मुख्तरनची बातमी सांगितली. जुलै महिन्यातच 'टाईम' या विख्यात अमेरिकन नियत-कालिकाने अत्याचारावर एक वार्तापत्र प्रसिद्ध केले. आंतरराष्ट्रीय वृत्तपत्रांनी व माध्यम-जालांनी (नेटवर्क्स) मुख्तरनची माहिती जगभर पसरविली.

मुख्तरन माईने सोसलेला अत्याचार व त्या अत्याचाराविरुद्ध पोलिसांकडे जाण्याचे दाखविलेले धैर्य, जमातींच्या जगात ठरून गेलेल्या रीतिरिवाजांच्या गुंत्यातून बाहेर पडून आधुनिक जगातील कायदेकानूंकडून संरक्षण मागण्याचा घेतलेला अपूर्व निर्णय, अत्याचार करणाऱ्यांनी दाखविलेला धाक व दडपणे यांना भीक न घालता त्या रानगटांना व दाणगटांना आव्हान देण्याचे दाखविलेले शौर्य यांचा गौरव करण्यासाठी नाना देशातील संस्थांनी तिला वेगवेगळे पुरस्कार, गौरवपत्रे व पारितोषिके दिली. पाकिस्तान सरकारने तिला 'फातिमा जिना सुर्वणपदक' २००५ साली दिले. अमेरिकन नियतकालिक 'ग्लॅमर'ने त्याच वर्षी तिला 'त्या वर्षीची श्रेष्ठ स्त्री' हा सन्मान दिला. मारी तेरेस क्यूनी या फ्रेंच महिलेच्या सहकार्याने तिने फ्रेंच भाषेत लिहिलेली कैफियत व त्या कैफियतीचे जर्मन भाषांतर ही दोन्ही २००६ च्या जानेवारीत प्रसिद्ध झाली. त्या निमित्ताने मुख्तरन युरोपात व अमेरिकेत जाऊन आली. तिचे ठिकठिकाणी सन्मान-समारंभ झाले व देशोदेशीच्या सरकारांच्या प्रतिनिधींनी तिचे स्वागत केले. साऱ्या जगात एक वीरस्त्री म्हणून मुख्तरनची ख्याती झाली.

या साऱ्या घडामोडीतून मुख्तरनपाशी पुष्कळ पैसे जमा झाले होते आणि बरेच अनुयायीही गोळा झाले होते. त्यांच्या सहाय्याने तिने 'मुख्तरन माई स्त्री-कल्याण संघटना' स्थापना केली. मीरवाला सारख्या मागास गावात तिने मुलींसाठी शाळा काढल्या आणि त्या टोळयांच्या समाजाला स्त्रियांचे हक्क व संस्कृतीतील स्त्रियांचा उच्च दर्जा यांची जाणीव करून देण्यासाठी प्रबोधनाच्या कार्याला सुरुवात केली. अत्याचाराच्या बळी झालेल्या महिलांसाठी एक आसरा-घर ही संघटना चालू लागली.

हे सर्व होत असताना मुख्तरनवर अत्याचार करणाऱ्या चौदा गुंडांवर निरनिराळ्या न्यायालयात खटले चालू होते. पहिल्यांदा खटला चालला तो डेरा गाझी खान येथील दहशत-विरोधी न्यायालयात. या न्यायालयात दहशत किंवा सामूहिक (मास इंटिमिडेशन) अशा स्वरूपाच्या गुन्ह्यांचे खटले चालतात. मुख्तरनच्या बाबतीत रूढार्थाने ज्याला दहशत म्हणावी तसे काही झाले नव्हते. पण अत्याचाराचा उद्देश मास्तोई टोळीच्या भेडसावणीखाली टाट्ला टोळीने दबून राहावे असे वातावरण निर्माण करण्याचा होता. या न्यायालयाने ३०

ऑगस्ट २००२ रोजी निकाल देऊन १४ आरोपींपैकी सहा जणांना देहान्ताची शिक्षा दिली. त्यानंतर या सहा जणांनी लाहोर उच्च न्यायालयाकडे दाद मागितली. त्या खटल्याचा निकाल ३ मार्च २००५ रोजी लागला आणि खालच्या न्यायालयात शिक्षा झालेल्या सहापैकी पाच आरोपींना निर्दोष ठरवून मुक्त करण्यात आले! त्या वेळी मुख्तारनच्या बाजूने न्यायालयाला विनंती करण्यात आली की, मुख्तारनच्या जिवाला धोका असल्यामुळे या पाच आरोपींना, निर्दोष ठरले असूनही, मोकळे करण्यात येऊ नये. याच काळात पाकिस्तान सरकारने सर्वोच्च न्यायालयाकडे धाव घेतली. सर्वोच्च न्यायालयाने सर्व चौदा आरोपींवरील खटला पुनः चालवायचा असा निर्णय घेतला. अद्याप हा खटला पाकिस्तानच्या सर्वोच्च न्यायालयापुढे आहे.

इकडे मुख्तारन माईला मुशर्रफ यांच्या अध्यक्षतेखालील सरकार नीट वागणूक देत नसल्याच्या बातम्या वारंवार येत असत. सुरक्षेच्या सबबीखाली तिला जवळ-जवळ नजरकैदेत ठेवले आहे, अशा तक्रारी वृत्तपत्रातून होत असत. जून २००५ मध्ये पाकिस्तान सरकारने तिच्या परदेश प्रवासाला बंदी घातली होती. नंतर तिचे पारपत्र (पासपोर्ट) जप्त करण्यात आले. पण लगेचच ते परतही करण्यात आले. या सर्व गोष्टीत तथ्य किती होते हे सांगता येणे कठीण असले तरी मुशर्रफच्या सरकारला मुख्तारन परदेशात गेल्यास पाकिस्तानची बदनामी होईल, असे वाटत असले पाहिजे. त्यानंतर मुशर्रफ यांचे सरकार गेले आणि 'लोकशाही' सरकार कारभार करू लागले. मुख्तारनचा सरकारशी होणारा बेबनाव थांबला.

३.

आता जवळ जवळ तीन-चार वर्षांनी मुख्तारन पुनः प्रसिद्धीच्या झोतात आली आहे, ती तिने शादी केल्यामुळे. या शादीमुळेच पाकिस्तानातील स्त्रीवादी चळवळीला काहीसा फटका बसला आहे आणि स्त्री-चळवळीची पुढारी ताहिरा अब्दुल्ला हिने 'मुख्तारनने स्त्री-मुक्तीच्या चळवळीला तोंडघशी पाडले आहे.' असा आरोप केला आहे. सध्या पाकिस्तानात मुस्लीम कट्टरवादी चळवळ तालिबान हिचे सामर्थ्य वाढते आहे. 'स्वात' या पाकिस्तानच्या पश्चिमेकडील टोळ्यांचे साम्राज्य असलेल्या, प्रदेशात सरकारला तालिबान्यांशी तडजोड करून मुस्लिम धर्मातील कर्मठ आणि स्त्रियांना जाचक अशा रूढींची काटेकोर अंमलबजावणी करावी लागते आहे. स्त्रियांनी बुरखा घातला पाहिजे, शिक्षण घेता कामा नये, परक्या पुरुषांशी बोलू नये असे स्त्री-स्वातंत्र्याला विपरीत स्वरूपाचे हे नियम आहेत. स्त्री-वादी चळवळींना साहजिकच असे वाटते आहे की, आभाळ सर्व दिशांनी झाकोळून गेले आहे आणि स्त्रियांना पिचून टाकणारे घोर वादळ केव्हाही सुरू होईल. अशा प्रतिकूल वातावरणात मुख्तारनने जेव्हा नासिल अब्बास गाबोल नावाच्या विवाहित पुरुषाशी, त्याची पहिली बायको हयात असताना, शादी केली तेव्हा पाकिस्तानातील स्त्रीवाद्यांची स्वाभाविकच तगमग झाली.

त्याचे असे झाले. गाबोल हा मनुष्य पोलिस-जमादार असून मुख्तारनला जे सुरक्षा-पथक पाकिस्तान सरकारने दिले आहे त्या पथकात तो आहे. त्याला प्रथम मुख्तारनविषयी आकर्षण वाटू लागले. तो तिला वारंवार दूरध्वनी करून आपल्या प्रेमाची गाथा सांगायचा व तिची आळवणी करायचा. प्रथम मुख्तारनला त्याचा तिरस्कार वाटे. ती त्याला टाकून बोलत असे आणि 'पुनः दूरध्वनीवरून बोलू नकोस' अशी ताकीद देत असे. पण काही काळानंतर या विनवण्यांवर मुख्तारनचा विश्वास बसू लागला. गाबोलने चालविलेली प्रेम-याचना ही एक लहर नसून ती त्याच्या अंतःकरणाच्या गाभ्यात रुजलेली जोमदार भावना आहे, असे तिला वाटू लागले. मुख्तारन आपल्या आर्जवांना प्रतिसाद देत नाही, असे पक्के वाटून गाबोलने एकदा आत्महत्येचा प्रयत्न केला. तेव्हा तर गाबोलच्या प्रेमाच्या खरेपणाविषयी मुख्तारनची खात्रीच पटली व ती त्याच्या अनुनयाला प्रतिसाद देऊ लागली.

गाबोलची बायको रुख्साना (तिचे नाव शुमैल आहे, असेही काही जण सांगतात) हिलाही नवऱ्याची विमनस्कता, त्याने केलेला खुदकुशीचा प्रयत्न, नवरा-बायकोत निर्माण झालेला दुरावा यामुळे अस्वस्थ वाटू लागले. तीही मुख्तारनच्या मागे लागली की तिने गाबोलशी शादी करावी! आपण कुणाची सवत होऊन नवऱ्याबरोबर

नांदावे ही गोष्ट मुख्तरनला पटणारी नव्हती. नाही म्हटले तरी स्त्री-वादाचे वारे गेल्या चार-पाच वर्षात तिच्यावरून वाहून गेले होते. गाबोल व रुख्साना हे देखील तलाक घेऊन मुख्तरनला निर्बाध पत्नीत्व देण्यास तयार होते. पण यात एक अडचण होती.

आपल्याकडे 'साटे लोटे' नावाची एक चाल होती. तिचा मतलब असा की, नवऱ्याची बहीण व बायकोचा भाऊ यांचे लग्न होत असे. ही चाल फारशी शिष्टमान्य नसावी. पाकिस्तानातील नैऋत्य भागात ज्या बलुची टोळ्या आहेत त्यात मात्र ही चाल सर्रास आहे व त्या चालीला 'वट्टासट्टा' असे म्हणतात. ही चाल पाडण्याचा हेतू असा की, प्रत्येक घराण्याकडे व्याही घराण्याची मुलगी ओलिस राहाते; आणि त्यामुळे सुनांचे छळ होत नाहीत. गाबोल आणि रुख्साना यांच्या बाबतीतही त्या 'वट्टासट्टा'चे बंधन घडून आले होते. गाबोलच्या दोन बहिणींची लग्ने रुख्सानाच्या दोघा भावांशी झाली होती. गाबोलने रुख्सानाला 'तलाक' दिला तर गाबोलच्या दोघा बहिणींनाही तलाक मिळाला असता आणि एकूण तीन जोडप्यात फारकती झाल्या असत्या. ही गोष्ट गाबोल, मुख्तरन व रुख्साना या तिघांनाही प्रशस्त वाटली नाही.

तेव्हा असे ठरलेले दिसते की, रुख्साना आणि गाबोल यांनी तलाक न घेताच स्वतंत्र राहायचे. गाबोलने आपल्या पगारापैकी रू. १०,०००/- दर महा रुख्सानाला व तिच्या मुलांना द्यावयाचे. गाबोलला जी वडिलोपार्जित जमीन मिळाली आहे तीही त्याने रुख्सानाला द्यावयाची. नंतर मुख्तरनने गाबोलशी शादी करावयाची. या सर्व अटी बहुधा पुऱ्या झाल्या असाव्यात; कारण परवाच्या १५ मार्चला मुख्तरन व गाबोल यांची शादी झाली!

४.

आपण वर पाहिलेच आहे की, मुख्तरनने गाबोलशी केलेली शादी पाकिस्तानातील स्त्रीवाद्यांना आवडलेली नाही. एक तर मुख्तरनने, नाही म्हटले तरी, गाबोलच्या पहिल्या पत्नीवर एक प्रकारे अन्यायच केला आहे, असे त्यांचे मत असावे. प्रेम ही प्रमाथी म्हणजे जीवर नियंत्रण ठेवणे दुरापास्त, अशी भावना आहे. कोणाचे कोणावर काय कारणाने प्रेम जडेल, हे सांगता येत नाही. त्यामुळे गाबोल आणि मुख्तरन यांचे प्रेम जमावे याला आक्षेप घेता येत नाही. स्त्रीवाद्यांचे असे म्हणणे असू शकते की, प्रेम जमले म्हणून विवाह केलाच पाहिजे असे कोठे आहे? मनाने जडलेल्या प्रेमाची शारीर परिणती लैंगिक संबंधात होऊ शकते; पण तशी ती झालीच पाहिजे असे नाही. समजा झालीच तरी त्यावर विवाहाचे पांघरूण हवे, असे कोणी सांगितले आहे? मुख्तरन ही स्त्रीमुक्ती-आंदोलनातील एक विभूती म्हणून मान्यता पावली होती. अशा स्थितीत तिने लग्नाच्या बेडीत अडकावे हे योग्य नाहीच; पण दुसऱ्या स्त्रीचा संसार उद्ध्वस्त करून आपल्याला हवा तो पुरुष तिने मिळवावा ही फारच निंद्य व तिरस्कारार्ह गोष्ट होय.

इस्लामाबाद येथील कायदे-आझम विद्यापीठा-तील स्त्री-अभ्यास-केंद्राच्या प्रमुख फर्झाना बारी या पंडितेला हा सर्व युक्तिवाद असमंजसपणाचा वाटतो. तिचे म्हणणे असे दिसते की, मुख्तरनने जे काही केले ते तिला स्त्रीवादाची तत्त्वे समजली होती व मान्य होती, म्हणून केले असे काही नाही. तिच्यावर जो भयंकर प्रसंग कोसळला त्यातून बाहेर पडून इभ्रतीने जगण्याचा एकच मार्ग तिच्यासमोर होता; तो म्हणजे अत्याचार करणाऱ्यांना अदालतीकडून शिक्षा ठोठवावयाची. हे करण्यासाठी तिला टोळ्यांच्या जीवनशैलीतून बाहेर पडून आधुनिक शासनाचा आश्रय घ्यावा लागला, ही अपरिहार्य गोष्ट होती. पण त्याचा अर्थ असा नाही की, तिने आधुनिकता, व्यक्तिस्वातंत्र्य, स्त्रियांचे अधिकार इत्यादी संकल्पनांचा काही विचार केला होता. स्त्रीवादाची झूल आधुनिक प्रचार--माध्यमांनी तिच्यावर चढविली व काही काळ ती झूल घालून मिरवणे मुख्तरनला सोयीचे वाटले. अशा वेळी गाबोल तिच्या आयुष्यात आला आणि तिला निर्घृण सामूहिक अत्याचाराची बळी झालेल्या स्त्रीला जो संसाराचा मार्ग कायमचा बंद झाला होता तो, एकाएकी, आपल्या पुढे उलगडत चाललेला दिसला. तिने तो मार्ग पत्करला यात काहीच वावगे झालेले नाही.

फर्झाना बारी यांच्या या विवेचनात कोठेच फट दिसत नाही. आधुनिक प्रसार-माध्यमे ही एक जबरदस्त शक्ती आज साऱ्या व्यवहारावर कब्जा ठेवून वावरते आहे. कोणत्याही व्यक्तीच्या कर्तृत्वाचा गवगवा करून तिला प्रसिद्धीच्या झगमगाटात आणावयाचे, तिच्यावर

निरनिराळ्या वादांची व विचार प्रणालींची आभूषणे चढवायची व नंतर तिच्या दोषांची, त्रुटींची किंवा ढोंगांची किटाळे तेवढ्याच त्वेषाने लोकांपुढे मोडून त्या उत्सवमूर्तीला उचलून कोपऱ्यात टाकायचे हा या माध्यमांचा नित्याचा खेळ आहे. आपण याचा अनुभव वारंवार घेतला आहे. चारा घोटाळ्याच्या प्रकरणात याच माध्यमांनी अवहेलनेचा वर्षाव ज्यांच्यावर केला होता ते लालूप्रसाद यादव त्यानंतर काही काळातच व्यवस्थापन गुरू म्हणून स्तुतिसुमनांचा विषय झाले होते.

पण प्रसार-माध्यमांना दोष देऊन भागणार नाही. अखेर कोणाला तरी हरभऱ्याच्या झाडावर चढवायचे व कोणाला तरी शिव्याशापांच्या गर्तेत ढकलायचे हा त्या माध्यमांच्या व्यवसायाचा - किंवा धंद्याचा - भाग आहे. प्रसार-माध्यमे काही स्त्रीमुक्तीला, परिवर्तनवादाला किंवा पुरोगामित्त्वाला बांधलेली नाहीत. मुद्दा असा आहे की, परिवर्तनवादी चळवळी वारंवार कोणत्या ना कोणत्या विभूतीच्या शोधात का असतात? मुख्तारन माई सारखी अनपढ व स्त्रीवादाशी संबंध नसलेली स्त्री परिस्थितीच्या फेऱ्यात सापडून आत्महत्येखेरीज दुसरा पर्याय न उरल्याने पोलिसात तक्रार द्यायला, एका मुस्लिम धर्मगुरूच्या पाठबळावर, तयार होते तेव्हा–तिचे धैर्य वाखाणण्याजोगे नक्कीच होते तरी–तिला स्त्रीवादी ठरवण्याची घाई पाकिस्तानातील स्त्रीवाद्यांनी का करावी? आणि देशोदेशी स्त्रीवादी चळवळींनी पूजाविषय ठरवून तिची स्थापना देव्हाऱ्यात का करावी? हे एका प्रकारचे हुरळून जाणेच नव्हे काय?

अर्थात आम्ही हे सर्व स्त्रीवादी चळवळींना किंवा एकूणच पुरोगामी चळवळींना दूषण देण्याच्या हेतूने लिहीत नाही. सर्व पुरोगामी चळवळींना आपण अल्पसंख्यांक असून आपल्याविरुद्ध प्रचंड बलवान अशा प्रतिगामी शक्तींचे मोर्चे उभे आहेत अशी मानसिकता कुरवाळण्यात धन्यता वाटते. आपण कळप करून राहावे, परस्परांना घट्ट धरून असावे, नाही तर रात्री रानात झोपलेल्या माणसांच्या गटातील कडेच्या व्यक्तींना श्वापदे पळवून नेतात त्याप्रमाणे आपल्यातील काही माणसे या प्रतिगाम्यांकडून पळवली जातील अशा धास्तीत या चळवळी कार्य करीत असतात; असा ठसा या चळवळींची पाहाणी केली असता मनावर उमटतो. अल्पसंख्यांक मानसिकता गोंजारणाऱ्या चळवळीला आपला कळप एकत्र राखण्यासाठी वारंवार नवीन विभूतिमत्त्वे आराधनेसाठी लागतात. असा शोध चालत राहातो. मुख्तारन हा असा अलिकडील शोध होता.

ही अल्पसंख्यांक मानसिकता निर्माण होण्याचे कारण शोधण्यास फार लांब जावयास नको. आशियातील जे समाज आहेत तिथे या पुरोगामी चळवळी उपऱ्या आहेत. येथील परिस्थितीतून त्या निर्माण झालेल्या नसल्याने समाजातील बहुसंख्य लोक या चळवळींच्या विरुद्ध नाहीत, तर उदासीन व तटस्थ आहेत. इतिहासात अतिशय यशस्वी ठरलेली व आदिम मानली गेलेली नवमतवादी चळवळ म्हणजे फ्रान्समधील ज्ञानकोश-कर्त्यांनी (एन्-सायक्लो-पीडिस्त) आरंभिलेली चळवळ होय. जुन्या समजुती, युक्तिवाद, श्रद्धा, संकल्पना यांचा फोलपणा दाखविणारे व समाजातील प्रतिष्ठितांचे विडंबन करणारे त्यांचे विचार तत्कालीन समाजातील उगवत्या शक्तींनी डोक्यावर घेतले. परंतु, तसे होण्याला फार मोठ्या प्रमाणावर सामाजिक परिस्थिती जबाबदार होती. नवीन उत्पादन साधनांवर मालकी मिळवून श्रीमंत झालेला मध्यमवर्ग सरंजामदारी समाजात आपल्याला प्रतिष्ठा मिळावी, राजकीय निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत आपल्याला वाटा मिळावा, जमिनदार वर्गाला सहज व वारसा हक्काने उपलब्ध असणारे मानमरातब, प्रशासनातील अधिकार, वतनवाड्या आपल्यालाही प्राप्त व्हाव्यात अशी आकांक्षा बाळगून होता. पण राजसत्ता, तिची पाठराखण करणारे जमिनदार व जमिनदारांपैकीच पण सर्वात अवाढव्य जमीनजुमल्याचे मालक असणारे चर्च यांची घट्ट फळी या उद्योगधंद्यांतून उत्पादन मिळविणाऱ्या समूहाला आपल्यात शिरकाव करून द्यायला अजिबात तयार नव्हती. साहजिकच जुन्यांची रेवडी उडविणारे व नवोदितांच्या आकांक्षांना पाठिंबा देणारे ज्ञानकोशकर्त्यांचे विचार फार क्रांतिकारक ठरले. जुन्या मूल्यव्यवस्थेची दिवाळखोरी चव्हाट्यावर आणणारी व नवीन मूल्यव्यवस्थेचे उद्घाटन करणारी अशी ही नवमतवादी विचारसरणी यशस्वी झाली,

अनुक्रमणिका

ती त्या परिस्थितीमुळे. किंबहुना असेही म्हणता येईल की, नवोदित मध्यमवर्गाला सरंजामदारांविरुद्ध बंड करताना जो वैचारिक आधार हवा होता तो या ज्ञानकोशकारांनी व इतरांनी करून ठेवला होता.

आम्ही वर म्हटल्याप्रमाणे पौर्वात्य देशात असा कोणताच सामर्थ्यशाली आणि तरीही 'आपण दडपले गेलो आहोत' अशी भावना गोंजारणारा वर्ग नाही की, ज्याला या नवमतवादाचा काही फायदा उठवावासा वाटावा. किंबहुना 'प्रबोधनातून परिवर्तन' या संकल्पनेचा गाभाच हा आहे की, असा कोणता समूह किंवा वर्ग असेलच तर त्याला क्रमाक्रमाने सत्तेत वाटा मिळू शकतो, अशी आशा किंवा व्यवस्था निर्माण झाली पाहिजे. साहजिकच 'प्रबोधनातून परिवर्तन' या चळवळीशी कृतज्ञ राहावे असा कोणताच क्रांतिकारक बदल या चळवळीमुळे झाल्याचे, त्या चळवळीचा ज्यांना फायदा झाला आहे. अशा, समूहांनाही वाटत नाही. अखेर चळवळी या यश मिळण्यातून वाढत जातात आणि यश हे नेत्रदीपक आहे, असा गाजावाजा व्हावा लागतो. तथापि 'प्रबोधनातून परिवर्तन' या तत्त्वावर आधारलेल्या ज्या चळवळी असतात त्यांना असे आकर्षक जय त्यांच्या स्वभावामुळेच मिळणे शक्य नसते.

मग मुख्तरन माईसारख्या ज्या व्यक्ती अचानक प्रकाशाच्या झोतात येतात – त्यांच्यावर परिवर्तनवादाचे संस्कार झालेले असोत अगर नसोत – त्यांचा आपल्या चळवळीच्या आकर्षक यशाचे चिन्ह म्हणून वापरण्याचा मोह या चळवळींना होतो व परिस्थितीमुळे किंवा माणसाच्या ठिकाणी असणाऱ्या सहज वृत्तींमुळे त्या व्यक्तीचे वर्तन चळवळीच्या आदर्शाला विपरीत असे घडले की, या चळवळीला आपण तोंडघशी पडलो, असे वाटू लागते. परिवर्तनवादी चळवळींच्या बाबतीत हा धोका अटळ आहे, असे दिसते.

✧✧✧

अनुक्रमणिका

विवेकवाद हवाच - पण

डॉ. द. पां. बुरटे

नवभारतच्या फेब्रुवारी २००९ च्या अंकात प्रसिद्ध झालेल्या 'विवेकवाद, विज्ञान आणि श्रद्धा' या प्रा. डॉ. सुनीती देव यांच्या लेखातील महत्त्वाच्या वाटलेल्या मुद्यांवर ही प्रतिक्रिया आहे.

"हिंदूधर्म"

"हिंदू" हा शब्द प्राचीन संस्कृत वाङ्मयात नाही. भारतीय तत्त्वज्ञानांच्या मानाने तो बराच अर्वाचीन, तसेच एका अर्थाने मुळात अभारतीय आहे. तरीही प्रा. डॉ. सुनीती देव विवेकवादाच्या निकषावर (पान १०-२) "हिंदू धर्माची" म्हणून "भारतीय तत्त्वज्ञाना"ची चिकित्सा करतात.

या निमित्ताने "हिंदू धर्म" या प्रयोगातील शब्दांचे अर्थ स्वच्छ करून घेऊ. कोणताही शब्द निर्माण होतो तो अर्थासमवेतच. परकीयांनी भारतातील लोकांचा - त्यांच्या धर्माचा वगैरे नव्हे - संबोधक या अर्थाने हिंदू हा शब्द निर्माण केला व वापरला. तोच त्याचा अर्थ ठरत नाही का? जसे अरब, तुर्क, अफगाण तसेच हिंदू.

भारतीय तत्त्वज्ञानाप्रमाणेच "धर्म" हा शब्दही "हिंदू" या शब्दाच्या मानाने बराच प्राचीन आहे. तो स्वधर्म, मातृधर्म, पुत्रधर्म, राजधर्म, इतकेच काय पण शेजारधर्म वगैरेही रूपात समोर येतो. तो नात्यावर अवलंबून आहे ही गोष्ट महत्त्वाची आहे. तथापि, नातेसंबंधितांचा धर्म एक असलेच असे नाही. शेजाऱ्यांचा एकच असेल, पण नवराबायको, बापमुलगा यांचे धर्म एक असूच शकत नाहीत.

या उलट शीख, बौद्ध, वैष्णव, शैव या संकल्पनांच्या बाबतीत सामान्यतः तसे नाही. यांना संप्रदाय (किंवा पंथही) म्हटले जाते. एका कुटुंबातील प्रत्येकाचा धर्म वर म्हटल्याप्रमाणे नात्यानुरूप वेगळा असू शकतो पण संप्रदाय मात्र सामान्यतः एकच असतो. एवंच धर्म व संप्रदाय या संकल्पना परस्परभिन्न आहेत हे त्यांच्या वापरावरूनदेखील दिसते. धर्म व संप्रदाय या संकल्पनांमधील फरक स्पष्टपणे लक्षात घेतला पाहिजे.

ज्यूडाइझम्, ख्रिश्चॅनिटी, इस्लाम याना रिलिजन, मज़हब म्हटले जाते. आता या शब्दांना धर्म व संप्रदाय यापैकी समानार्थी शब्द कोणता? वरील विवेचनावरून त्यांना संप्रदाय हा शब्द योग्य आहे, धर्म हा शब्द योग्य नाही असे दिसते. भारतीय भाषांत ज्यूडाइझम्, ख्रिश्चॅनिटी, इस्लाम हे धर्म नाहीत. त्यांना संप्रदाय म्हटले पाहिजे.

ज्यूडाइझम्, ख्रिश्चॅनिटी, इस्लाम वगैरेसारखे "हिंदू" नामक काहींच नसले तरी आजकाल हिंदू, ख्रिश्चन, मुस्लिम हे शब्द रिलिजन नामक एकाच गटात मोजले जाऊ लागले व हे परस्परभिन्न रिलिजन मानले जाऊ लागले. तेणेकरून हिंदू हा ख्रिश्चन, मुस्लिम यांच्याचसारखा रिलिजन ठरला. शिवाय रिलिजन म्हणजेच धर्म मानले जाऊ लागले.

इतका सगळा गोंधळ घालून आजकाल "हिंदू धर्म" असा प्रयोग रूढच झाला आहे. "हिंदू" हा अशा अर्थाने धर्म असेल तर "हिंदुस्तान" या शब्दाचा अर्थ एखाद्या सांप्रदायिकांचा अथवा विशिष्ट धर्माच्या लोकांचा देश असा होईल. दोन्ही शब्दांचे असे अर्थ गैरच आहेत. निर्माण करणारानी "हिंदुस्तानी" हा शब्द अरबस्तान, तुर्कस्तान, अफगाणिस्तान वगैरेसारख्या विशिष्ट लोकांचा या अर्थाचा प्रदेश या अर्थाने निर्माण केला होता. जर्मनी, वियतनाम या देशांच्या विभाजना- नंतर त्यांच्या विभागांना दिशात्मक विशेषणे लागली तरी त्यांची मूळ नावे तीच राहिली. हिंदुस्तानाचे तसे झाले नाही याच्या बुडाशी हा गोंधळच उघड दिसतो. शब्द चुकीच्या अर्थाने वापरू नयेत. त्याने भाषा बिघडते. भाषा बिघडली तर विचार आणि इतरही बरेच काही बिघडते. ते टाळले पाहिजे. इत्यलम्.

भारतीय तत्त्वज्ञानांचे शब्दप्रमाण्य

आता भारतीय तत्त्वज्ञानाकडे वळू. ते "धर्माधिष्ठित" म्हणजे श्रुतिप्रामाण्यवादी आहे असे म्हटले

अनुक्रमणिका

जाते. या म्हणण्याचा अर्थ असा की भारतीय तत्त्वज्ञाने अनुमान किंबहुना प्रत्यक्षाच्याही विरोधात जाऊन श्रुतींचा शब्दच प्रमाण मानतात. म्हणजेच ती शब्दप्रामाण्यवादी आहेत. देवही तसे (पान १०-२) म्हणतात.

आता सर्वदर्शनसंग्रहातील सोळापैकी फक्त सहा दर्शने वगळता इतर दर्शने वेदप्रामाण्य मानत नाहीत हे तर प्रसिद्धच आहे. त्यापैकी चार्वाकदर्शन "काही काळ मंदपणाने तेवून नंतर विझून गेले" असे मानले तरी त्या गटातली जैन, बौद्ध, शैव ही दर्शने आजही प्रभावशाली नाहीत काय? अशा स्थितीत भारतीय तत्त्वज्ञाने सरसकटच शब्दप्रामाण्यवादी कशी ठरतात हे समजत नाही.

असे "गैरसमजू" की ही जैन, बौद्ध, शैव हे "हिंदू" नाहीत व त्यांची तत्त्वज्ञाने भारतीय असली तरी ती हिंदू नाहीत व शब्दप्रामाण्याचा आक्षेप फक्त "हिंदू" तत्त्वज्ञानापुरता आहे. तरी त्यातही सांख्य आणि पूर्वमीमांसा ही दोन तरी दर्शने ईश्वराचे अस्तित्व उघडउघड नाकारतात.

याशिवाय, इथे इतकी दर्शने निर्माण झाली. त्यावरून इथे कोणाला प्रामाण्यावरून प्रतिबंध होता असे दिसत तरी नाही. हे पुरावे भारतीय तत्त्वज्ञाने शब्दप्रामाण्यवादी होती या विधानाच्या विरोधात आहेत की नाहीत?

श्रुति, वेदवचने हेच दर्शनांच्या पूर्वीचे साहित्य होते. आक्षेप दर्शनानी ते उद्धृत करण्यालाच तर नाही ना? विधानांचा संदर्भ देणे व त्यांना प्रमाण मानणे या गोष्टी भिन्न आहेत हे विसरता नये.

अंतिम सत्

अंतिम सताचे स्वरूप (पान ११-१) काहीतरी एकच असले पाहिजे असे देव म्हणतात. वास्तविक, याबद्दल सामान्यतः तरी कोणाचेच दुमत दिसत नाही. ज्यूडाइझम्, ख्रिश्चॅनिटी, इस्लाम, इतकेच नव्हे तर प्रजापति ब्रह्मकुमारी संप्रदाय इ. सारेच हेच म्हणतात. चक्क ऋग्वेददेखील "एकं सत्" असेच म्हणतो. मात्र त्याचे स्वरूप व त्याचे जगाशी नाते वगैरे बाबत प्रत्येकाची आपापली भिन्न मांडणी आहे.

आणि तेही ठीकच आहे. प्रश्न त्यांचे स्वतःच्या व इतरांच्या मांडणीबद्दल मत काय आहे असा उरतो. याबाबत ऋग्वेद "एकं सत्" च्या पुढे "विप्रा बहुधा वदन्ति" असे म्हणतो. एक शायर अख़्तर शीरानी यांचा

"क्या कहूँ क्या है खुदा और मज़ाहिब (मज़हब चे अनेकवचन) का हुजूम (समुदाय)।

एक हकीकत (सत्) पे हैं छाये हुए अफ़साने (कहाण्या) चंद (कांही)।।"

हा शेरदेखील असेच काही म्हणतो.

जैनांचा अनेकांतवादही कोणत्याही गोष्टीसंबंधी ऐकांतिकपणे निश्चित पक्ष घेणे युक्त मानतो.

"एकम् सत्" मानणारी भारतीय दर्शने असे सत् अनिर्वचनीयही मानतात. त्यामुळे त्याची कोणतीही अभिव्यक्ती "अवर्णनीयाचे वर्णन" म्हणून अप्रमाणच ठरते. म्हणून त्याबद्दल शेवटी "न इति" किंवा "नेति" असे म्हणून ते नाकारतात. तुम्ही म्हणाल त्या संख्येपेक्षा जास्त अशा अनंताच्या गणितातील व्याख्येत अंतर्भूत असलेल्या तुम्ही म्हणाल त्या संख्येइतका नाही या प्रकारचा हा नेति आहे. याला आपण नेतिवाद म्हणू. अशा नकारापूर्वीची वर्णनांची भिन्नता नकारानंतर नष्टच होते.

देवांना अंतिम सत् एकच म्हणायचे असेल तर त्यालाही पुरावा लागेल.

काही संप्रदाय स्वतःच्या मांडणीवर, इतकेच नव्हे तर अन्य पर्यायांना चूक मानण्यावरही, ठाम असतात. त्यांना नान्यदस्तिवादी म्हणण्यास कोणाचीच हरकत नसावी.

सत् आणि व्याघात

देव म्हणतात प्रत्येक विधान (पान ४-२) सत्य किंवा असत्य यापैकी एकच असू शकते. या संदर्भात, many valued logic चे तसेच सत्याच्या "उपपत्तीनिष्ठ सत्य" म्हणजेच theory-relative truth या उपपत्तींचे खंडन त्यांच्याकडून अपेक्षित आहे.

देव म्हणतात सत्य (पान ११-२) आत्मविसंगत असू शकत नाही, ते (पान १४-२) व्याघातमुक्त असते.

नेतिवादाला व्याघाती असणे नसणे लागू नाही हे उघडच आहे.

जैनांच्या स्याद्वादानुसार ("न इति" म्हणण्याऐवजी) सत्य असेही असेल व तसेही असेल,

अनुक्रमणिका

म्हणजे त्यातून सत्य व्याघातीही असू शकेल असा निष्कर्ष निघतो.

जे सत् अंतिम असेल ते संपूर्णही असले पाहिजे. ते तसे असेल तर त्यात गणित आले, त्यातील नंबर थिअरी आली. आणि ग्योडेलने दाखविल्याप्रमाणे अशी व्यवस्था आत्मविसंगत असायला हवी. म्हणजे अंतिम सत् पूर्ण असेल तर अंतिम सत् व्याघातीच असायला हवे.

आता विवेकवादानुसार ग्योडेलच्या सिद्धांतावर तज्ज्ञांचे एकमत आहे किंवा नाही यापैकी एकच विधान सत्य असू शकते. पहिला पर्याय स्वीकारल्यास "सत्य हे व्याघातमुक्त असते" हे देवांचे विधान विवेकवादानुसार (पान ९-२) चूक आहे. दुसरा पर्याय स्वीकारल्यास ते विधान सत्य मानणे चूक आहे. हे तर विधानांवरील विश्वासासंबंधीचे खुद्द विवेकवादाच्याच सांगण्यानुसार आहे. तेव्हा एकतर माझा वरील युक्तिवाद सदोष आहे किंवा विवेकवाद आत्मविसंगत आहे असे मानावे लागेल.

साक्षात्कार

देव सताचा साक्षात्कार या संकल्पनेची हिप्नॉटिझमवादी (पान ११-१) उपपत्ती देतात. असा साक्षात्कार व्यक्तिपरत्वे वेगवेगळा येतो म्हणून तो आत्मसंमोहनात्मक, म्हणून अयथार्थ म्हणजेच भ्रामक असला पाहिजे असा निष्कर्ष त्या काढतात. योगशास्त्रानुसार योग म्हणजे चित्तवृत्तिनिरोध. हे खरे की त्यासाठी व्यक्तिपरत्वे धनुर्धारी राम, महिषासुर मर्दिनी वगैरेंचे ध्यान केले जाऊ शकते. पण ती फक्त संप्रज्ञात समाधीची सवितर्कानंतरची सविचार नामक पायरी असते. यात ज्यावर लक्ष एकाग्र करायचे असते तो आपल्या इष्ट गोष्टीचा विचार असतो. त्याला साक्षात्कार म्हणता येणार नाही. विचारात वैविध्य असले तर नवल नाही. यापुढची पायरी सानंद समाधीची. ती निर्विचार असते. तेथे हे वैविध्य जाते. अंतिम सताचा साक्षात्कार पुढपुढच्या पायऱ्यावर होत असावा. साक्षात्काराबद्दल बोलायचेच तर त्याबद्दल बोलावे लागेल. पश्चिमेकडे डेकार्ट्सुद्धेखील बुद्धीला स्पष्ट आणि सुटेपणाने प्रतीत होणाऱ्या कल्पनांबद्दल बोलतात तेव्हा माझ्या मते हे साक्षात्काराबद्दलच बोलतात. "चिन्तयामि अतः अस्मि" हा साक्षात्कार सर्वांना सारखाच होऊ शकतो.

पण इतक्या खोलात किंवा इतक्या दूर जायची जरूर नाही असे मला वाटते. "दोन अधिक दोन मिळून चार होतात", "तंबोरा सुरात लागलेला आहे" याचे आपल्याला ज्ञान होते. या ज्ञानात वैविध्य नाही, सर्वांना एकाच सत्याचा अनुभव येतो हे प्रसिद्धच आहे. हे साक्षात्कारच आहेत असे मला वाटते.

आता अशा ज्ञानासंबंधी प्रश्न असे (१) यात जे प्रतीत होते ते ज्ञान ऐंद्रिय तर नाही. यासाठीही प्रशिक्षण हे लागतेच. म्हणून ते संमोहन समजून अयथार्थ मानायचे का? पण तसे म्हटल्यास सगळेच शिक्षण संमोहन ठरेल. शिक्षक संमोहक ठरतील आणि यथार्थ ज्ञानासाठी शिक्षण निरुपयोगी ठरेल.

(२) ते ज्ञान यथार्थ म्हटल्यास संमोहनाशिवायही अनींद्रिय यथार्थ ज्ञान मिळू शकते हे मान्य केले असे होईल.

(३) देव अन्यत्र (पान २५-२) म्हणतात की मूर एक प्रकारचा साक्षात्कार किंवा अचाक्षुष दर्शन मानतात.

त्याला हे प्रतिभान (intuition) म्हणतात. हा इंद्रियज्ञानसदृश परंतु अनेंद्रिय असा साक्षात दर्शनाचा प्रकार आहे असे मानतात. माझ्या मते मूर ज्ञानाच्या याच प्रकाराबद्दल बोलत असावेत.

हे मत देवांच्या म्हणण्याप्रमाणे अनुभववादी मान्य करू शकत नाहीत. तथापि जर कोणी हे मान्य करील आणि या प्रकारच्या ज्ञानाला साक्षात्काराचा एक प्रकार मानील तर तो साक्षात्काराच्या इतर प्रकारांपासून वेगळा कसा काढायचा हे सांगावे लागेल. एरवी साक्षात्कारांचे प्रकार मानण्याची गरज दिसत नाही. मग कोणत्याही साक्षात्कारास ज्ञानप्राप्तीचा एक मार्ग मानावा लागेल.

अन्य अर्थाने "खरी" विधाने

देव म्हणतात (पान १४-२) त्याप्रमाणे श्रद्धेने प्राप्त होणारी विधाने जर अन्य कोणत्या अर्थाने खरी असतील तर तो अर्थ काय हे सांगितले पाहिजे.

आठ वर्षांची बेबी भातुकली खेळताना म्हणते चहाचा कप गच्च भरलाय, तिरपा धरू नका, तो सांडेल. तो तुमच्या दृष्टीने खरा नाही हे बेबीला कळते. म्हणून ती म्हणते की तो खोटाखोटा चहा असला तरी भातुकलीत मात्र अगदी खराच असतो, आणि तो खरा म्हणूनच

प्यायचा असतो.

वारकरी "खेळ मांडियेला वाळवंटी भाई" म्हणून भाविकपणाने नाचतात. भातुकलीतला चहा, वाळवंटातल्या खेळातला विठू वगैरे वास्तवातल्या "नसणे" किंवा "अभाव" नावाच्या पदार्थापासून बनविलेल्या भावात्मक वस्तू असतात.

प्रेक्षकांनी त्याकडे हवे तर ब्रेख्त म्हणतो तसे तिथे जे घडते ते खरे मानून त्याच्याशी तादात्म्य पावण्याऐवजी त्यापासून चिकित्सक अलिप्तता बाळगून पहावे. गालिब साऱ्या जगाकडे तसेच पहातो. तो म्हणतो,

बाज़ीचा (खेळ)–ए–अतफाल (बालबच्चांचा) है दुनिया मिरे आगे।

होता है शबोरोज़ (रात्रंदिवस) तमाशा मिरे आगे।

भातुकलीत, चंद्रभागेच्या वाळवंटात, स्टेजवर जे होते ते अशा एखाद्या अर्थाने खरे असू शकत नाही का? आणि आपण तरी खरेच असतो, तेव्हा खऱ्या आपल्या खऱ्या आनंदासाठी तरी ते स्थलकालपरिस्थितीसापेक्ष श्रद्धेने अनुभवण्यात गैर ते काय?

नियंत्रण, आदेश

स्मृती नावाचे हिंदूंच्या कर्माचे नियंत्रण (पान २१--१) करणारे एक शास्त्र आहे असे देवांना म्हणायचे असावे. वर्तमान व्यवस्थेच्या संदर्भात देव अन्यत्र (पान २७–१) म्हणतात की सामान्यपणे लोक नीतीने वागण्याची बतावणी करतात. प्रत्यक्षात बहुतेक लोक मनःपूतच वागतात. सध्याच नव्हे तर महाभारतकाळीही खुद्द व्यासांचीच अशीच तक्रार आहे की "ऊर्ध्वबाहुर्विरौम्येष न च कश्चित् श्रुणोति मे।" तस्मात् हिंदूंच्या कर्माचे नियन्त्रण,स्मृतींचे आदेश वगैरे देवांनी केलेले उल्लेख फारशा गंभीरपणाने घेण्यासाठी केले नसावेत असेच वाटते.

परमेश्वर आणि स्मृती

स्मृतीचे आदेश पाळण्यासाठी ते (पर्यायाने का होई ना पण) परमेश्वराने दिलेले आहेत हे कारण पुरेसे नाही (पान २१-१) असे देव म्हणतात ते पटणारेच आहे. पण महत्त्व, कोणी लिहिले अथवा कोणी प्रेरणा दिली यापेक्षा काय लिहिले, कशाच्या आधारावर लिहिले याचेच मानायला नको का?

या दृष्टीने मराठी विश्वकोशातील "मनुस्मृति" वरील नोंदीतील काही भाग या संदर्भात चिंतनीय आहे म्हणून तो उद्धृत करीत आहे. "धर्म व अधर्म यांच्यासंबंधी रागद्वेषरहित निर्विकार मनस्थितीत सर्व मानवांना व सर्व प्राण्यांना हितकारक असा विवेकबुद्धीचा निर्णय मिळू शकतो. अशा मनस्थितीत मानवांना किंवा प्राणिमात्रांना अहितकारक असा कोणताही विचार येऊ शकत नाही. सगळे शुभ आणि अशुभ वर्तन हे बुद्धी विकारवश असणे–नसणे याच्यावर अवलंबून आहे (मनुस्मृति–१२.११८;११९)...... त्याने (मनूने) असे म्हटले आहे की ज्ञानी, सज्जन, रागद्वेषापासून नित्यमुक्त अशांच्या हृदयाला पटलेला असा धर्म या मानवधर्मशास्त्रात सांगितलेला आहे (मनु–२.१). .....मनुष्याच्या जीवनाची धर्म, अर्थ आणि काम ही तीन मुख्य उद्दिष्टे आहेत. यांचा समतोल ज्या जीवनपद्धतीने साधेल तीच आचारपद्धती लोकयात्रेस, सामाजिक जीवन व्यवस्थित रीतीने चालू रहाण्यास म्हणजे समाजधारणेस कारणीभूत होते." भले आम्ही परमेश्वरास नाकारतो. तरी मनुस्मृतीच्या श्रेयात त्याचा अंतर्भाव केला एवढ्याशा कारणावरून ती आम्ही मानणार नाही असे कोणीच म्हणू शकणार नाही. एरवीही कित्येक जण प्रेरणा देणाऱ्याचा ऋणनिर्देश करतातच. त्याचे एवढे काय?

गीता

गीतेसंबंधी देव म्हणतात (पान २१.१) की (१) तीत नीतीसंबंधी शिकवण आहे असे मानले जाते, (२) गीतेनुसार मोक्ष हे सर्वोच्च प्राप्तव्य आहे आणि (३) त्यासाठी गीता उपाय सांगते आणि तो म्हणजे निष्काम कर्म होय. त्या पुढे म्हणतात की (४) हे नीतिशास्त्र अखेरीस श्रुतींवर आधारलेले असल्याने निराधारच आहे. म्हणून निष्काम कर्म सांगणारे गीतेतील नीतिशास्त्र (पान २२.१) आपण टाकू शकतो.

गीता निष्काम कर्म हा उपाय सांगते हे खरेच आहे. तो कोणत्या श्रुतीवर आधारलेला असेल तर असो. यासंबंधातील गीतेतील श्लोक प्रसिद्ध आहे. त्यात कृष्णानं

काय सांगितले हे प्रथम पाहिले पाहिजे. तो म्हणाला "कर्मण्येवधिकारस्ते मा फलेषु कदाचन।" तुझ्या अधिकारात काय आहे अन् काय नाही एवढंच यात सांगितले आहे. कर्म करणे एवढेच तुझ्या अधिकारात आहे. मात्र कोणत्याही परिस्थितीत त्याच्या परिणामावर तुझा अधिकार नाही. हे तर एक खंडनार्ह विधान आहे. याचा आपण हवा तर प्रतिवाद अवश्य करू शकतो. ते खरं का खोटं ते आपण पाहू शकतो. तरीही हे विधान उघड सत्य दिसते. निष्काम कर्माची शिकवण त्यावर आधारलेली आहे. कुठली श्रृती अन कुठला परमेश्वर?

उरला मुद्दा गीतेची शिकवण आपण टाकू शकतो का हा.

पहिली गोष्ट ही की गीता न विचारता सांगितली गेली नाही. अनाहूत सल्ला देण्याचा अधिकार फक्त आई व गुरू या दोघांनाच आहे असे मानले जाते. श्रीकृष्ण या तथाकथित परमेश्वरालाही तो नाही.

येथे दुसऱ्याच्या सातव्या श्लोकात अर्जुन स्पष्टपणे म्हणतो की माझा गोंधळ उडालेला आहे. तुझा शिष्य म्हणून हा मी तुझ्यापुढे पडतोय. मला शिकव.

मैत्रीमधली आधीची मस्करी कृष्ण येथे थांबवतो व "अशोच्यान्वशोचस्त्वं ....." अशी अर्जुनाची खरी शिकवणी सुरू होते. त्याने जे सांगितले तेंहीं "इष्टोऽसि" म्हणून.

ज्या (सर्व) उपनिषदांचे सार कृष्णाने गीतेत सांगितले असे समजले जाते त्यापैकी तैत्तरीयात गुरु शिष्याला स्पष्टपणे सांगतात –

"यानि अस्माकं सुचरितानि तानि त्वसोपास्यानि, नो इतराणि"

आमचे जे चांगले आचार-विचार, ते तू घ्यावेस, इतर नव्हे. गुरुने द्यायची मोकळीक यापरती काय असू शकते? अठराव्याच्या त्रेसष्ठाव्या श्लोकात कृष्ण तर चांगले घे वाईट नको असेही म्हणत नाही. तो त्याहीपुढे जाऊन अगदी "यथेच्छसि तथा कुरु" असे म्हणतो. आता ज्या अर्जुनाने शिकवणी लावायची आगळीक केली त्यालाही एवढी मोकळीक तर इतरा कोणावर गीतेचा काय जोरा? ती नाकारण्यासाठी कारण द्यायलादेखील शिष्यदेखील बांधील नाही तर अशिष्यांचा संबंधच काय?

गीतेत शिकवण आहे ती नीतीची असे कोणी म्हणत असेल तर म्हणो. गीतेत केवळ अर्जुनाने मागितला म्हणून कृष्णाने सल्ला दिला. याला हिंदूधर्मप्रणित नीतिशास्त्र असे वादासाठी तरी कसे म्हणता येईल ते समजत नाही.

दुःखाचे खरे कारण म्हणजे इहलोकीचा जन्म, आत्महत्या केली तरी पुनर्जन्म आहेच, सगळ्यापासून खरी सुटका म्हणजे मोक्ष आणि त्यासाठी गीता वगैरे वगैरे हा देवांचा कोटिक्रम कोठून आला हे कळत नाही. मनुष्याचे सर्वोच्च प्राप्तव्य काय आहे, ते कसे मिळवायचे ते मला सांग असे काही अर्जुन म्हणाला व म्हणून गीता सांगितली गेली असे का देवांना म्हणायचे आहे?

Authentic living

निष्काम कर्माबद्दल झाले. पण कर्म कोणते करायचे? तर स्वधर्मानुसार असेल ते करायचे आणि निकराने करायचे असे गीता शिकवते. याबद्दल माझ्या मते हायडेगर आणि गीता यांचे एकमत आहे. ते त्याला अनुक्रमे authentic living आणि स्वधर्माचरण म्हणतात.

शेवटी रेगे सरांचा जिव्हाळ्याचा मुद्दा

दीर्घ प्रवासाच्या शेवटी फलाटावर कोणी जिव्हाळ्याचे दिसावे तसा देवांच्या लेखाच्या शेवटी रेगे सरांच्या जिव्हाळ्याचा मुद्दा दिसला. "पाश्चात्त्यांकडून आपण जे जे स्वीकारतो त्याचा आपली जी भारतीय परंपरा तिच्याशी आपण सांधा जुळविला पाहिजे." याविषयी थोडेसे लिहून मीही शेवट करतो.

"आ नो भद्रा क्रतवो यन्तु विश्वतः" असे ऋग्वेदात म्हटले आहे. "क्रतु" म्हणजे ढोबळपणे "चांगला विचार." ते अखिल विश्वातून येवोत असे यात म्हणणे आहे. इतरांकडून चांगले स्वीकारावे ही परंपरा ऋग्वेदापासून तरी आहे असे यावरून दिसते.

पाश्चात्त्यांच्या परंपरेचा विकास कोणत्या संदर्भात झाला हे पाहिल्यास असे दिसते की तो काही किलोमीटरच्या एकाच परिसरात निर्माण झालेल्या ज्यूडाइझम्, ख्रिश्चॅनिटी, व इस्लाम या (नान्यदस्तिवादी) संप्रदायांच्या परस्परांशी तीव्र सत्तासंघर्षात (कुमार

अनुक्रमणिका

केतकर, लोकसत्ता, मार्च १४, २००९) झाला. आधुनिक विज्ञान संशयवादी (seeptic). स्वाभाविकच त्याच्या विकासक्रमात त्याला तेथे प्रबल असलेले नान्यदस्तिवादी संप्रदायपीठ जे चर्च त्याच्याशी संघर्षच करावा लागला. तो अजून शमलेला नाही. उद्या कोणतेही विधान चूक ठरून दुसरे काही बरोबर ठरू शकेल असेच आधुनिक विज्ञान समजते. याचा अर्थ हे स्याद्वादी आहे, नान्यदस्तिवादी नाही असाच घ्यावा लागेल.

आपली परंपराही नान्यदस्तिवादी नाही. विज्ञानाच्या परंपरेचा सांधा आपल्या भारतीय परंपरेशी सहजच जुळला. आता वेळ लागायचा तो लोकांना विज्ञान उपलब्ध व्हायला आणि त्याची सवय व्हायला लागायचा तेवढाच!

पण आजकाल येथेही जो तो आपल्या परंपरेत नसलेल्या नान्यदस्तिवादाकडे झुकू लागल्यासारखा दिसत आहे. संप्रदाय म्हटला की तो नान्यदस्तिवादीच असणार असे ठरल्यासारखे होऊ लागले आहे. इतकेच नव्हे तर नवनवे संप्रदाय उदाहरणार्थ "हिंदू", आणि संप्रदाय म्हणून नान्यदस्तिवादी संप्रदाय, निर्माण होऊ लागले आहेत.

पाश्चात्त्यांकडून आपण आधुनिक विज्ञान घेतले ते निवांतपणे! पण विवेकवाद घेताना रेगे सरांचा सावधानतेचा इशारा माझ्या मते लक्षणीयच आहे. देवांनी मांडलेला विवेकवाद माझ्या मते नान्यदस्तिवादी आहे. संशयवादी विज्ञानावर निःसंशय श्रद्धा ठेवणारा असा तो एक संप्रदाय भासू लागला आहे. युरोपात लढाया झाल्या, त्याअर्थी इथेही लढलेच पाहिजे. मग त्यासाठी शत्रू हवा. तिथे शत्रू धर्म हा होता. तिथला धर्म ख्रिस्ती. इथला हिंदू. तेव्हा एल्गार! "डेमन" समजून पवनचक्कीवर हल्लाबोल करणारा जणू डॉन क्विझोति! डॉन क्विझोति बरा! स्वतः हास्यस्पद झाला, त्याने दुखविले कोणाला नाही. विवेकवादाच्या काही पाइकांच्या वागण्या-बोलण्यात इतरांबद्दल तुच्छता, टिंगल, आकस पाहिला आहे. त्याने व्यथित झालो आहे. कधी तरी विवेकवादातील नान्यदस्तिवादाचा प्रतिवाद करावा अशी इच्छा होतीच. देवांच्या दयेने ती पुरी झाली. या संधीबद्दल त्यांना धन्यवाद. या माझ्या प्रतिक्रियेचीही उलटतपासणी व्हावी आणि काही चुकत असल्यास काही शिकायला मिळावे हीही इच्छा आहेच.

विवेकवाद भारतीय परंपरेत खरेच नाही का असा प्रश्न मनात येतो. समजा असला, तरी रेगे सर म्हणतात तसे भारतीय परंपरेशी जुळवून, पण त्याचा पाश्चात्त्य आविष्कार म्हणून तरी तो हवाच आहे असे शेवटी मला म्हणायचेच आहे. "आ नो भद्रा क्रतवो यन्तु विश्वतः.'

✧✧✧

लेखकांचा परिचय

❦ **प्रा. श्री. मा. भावे**

माजी प्रपाठक व विभाग प्रमुख, गणित विभाग, नौरोजी वाडिया कॉलेज, पुणे; गणित व तत्त्वज्ञान या विषयांत पी.एच्.डी. व पदवीत्त्युर संशोधन; शिक्षक चळवळीत सहभाग; शिक्षण, गणित व तत्त्वज्ञान विषयावर २५ शोधनिबंध प्रसिद्ध.

पत्ता : ३३/२०, ४ थी गल्ली, प्रभात रोड, पुणे ४११ ००४.

❦ **देवीदास बागुल**

मराठी साहित्याचे व्यासंगी अभ्यासक व लेखक; ललित कलांचे जाणकार समीक्षक; नामवंत व छायाचित्रकार; पुस्तकांची मुखपृष्ठे व मजकूर यांच्या मांडणीच्या विषयात वैशिष्ट्यपूर्ण कार्य.

पत्ता : ६५/२०, एरंडवणे, कृपांजली, पुणे - ४११ ००४.

❦ **प्रा. रत्नाकर बापूराव मंचरकर**

मराठीचे सेवानिवृत्त अध्यापक, मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचे अभ्यासक, साहित्य, शिक्षण आणि समाज यांवर वैविध्यपूर्ण लेखन, संपादन व शोध निबंध लेखनाबद्दल राज्य पुरस्काराने सन्मानित.

पत्ता : श्री स्वामी समर्थ, १९, नंदनवन कॉलनी, कोहिनूर मंगल कार्यालयासमोर, सावेडी, अहमदनगर - ४१४ ००३.

❦ **डॉ. द. पां. बुरटे**

भाभा ॲटोमिक रिसर्च सेंटर येथे नोकरीस होते व आता निवृत्त; न्यूक्लिर फिजिक्स या विषयात पी. एच.डी.; तत्त्वज्ञानाचे अभ्यासक.

पत्ता : ब ४, बाणगंगा को. हौ.सो. गोवंडी स्टेशन रोड, देवनार, मुंबई - ४०० ०८८.

❦ **उषा हस्तक**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील सेवानिवृत्त सहायक ग्रंथपाल.

पत्ता : ५-जी, चेतनानगर, श्रेयनगरच्या मागे, औरंगाबाद - ४३१ ००५.

आवाहन

'नवभारत' हे वैचारिक मासिक सुरू होऊन आता ६१ वर्षे झाली. साहजिकच मासिकाच्या मूळ कर्त्यांनी जे उद्देश डोळ्यांपुढे ठेवले होते, ते उद्देश स्वीकारून लिहिणारे लेखक व त्या उद्देशांविषयी आस्था बाळगणारे वाचक आता कमी होत चालले आहेत. तरीदेखील वैचारिक आदान-प्रदानाचे समर्थ व्यासपीठ म्हणूनच 'नवभारता'ने कार्य करीत राहावे असाच आमचा संकल्प आहे.

भारतीय परंपरेची ओळख व परिष्करण करून देणारे लेख येतच राहातील. परंतु, विज्ञान, अर्थकारण, तत्त्वज्ञानातील आधुनिक विचारप्रवाह, इतिहासलेखनाला आलेले नवे रूप इत्यादी विषयांची भाष्यरूपाने ओळख करून देणे, नवीन ग्रंथांची समीक्षा करणे, लोकसाहित्य, दलित-वाङ्मय यांना जी काळानुरूप वळणे मिळत आहेत त्यांचा मागोवा ठेवणे या विषयांवर भर देणे अगत्याचे झाले आहे. लघुकथा, ललित लेख व कविता या 'नवभारता'ने पूर्वीही कक्षेबाहेर ठेवल्या नव्हत्या व आताही त्या कक्षेबाहेर ठेवलेल्या नाहीत.

आज तालुक्याच्या ठिकाणी महाविद्यालये निघाली आहेत. येथील शिक्षण मराठी भाषेतून चालते व ते योग्यच आहे. तथापि, इंग्रजी वा अन्य भारतीय भाषांतील विचारप्रवाहांशी या शिक्षणाचा संबंध राहू नये, ही खेदाची गोष्ट आहे. या महाविद्यालयातील ग्रंथालयात अद्ययावत् पुस्तके येत नाहीत व आली तरी ती वाचून सकस चर्चा करतील असे अभ्यासूंचे गटही सहसा असत नाहीत. आमचे अनेक विद्यार्थी या महाविद्यालयातून प्राध्यापक व प्राचार्य आहेत. त्यांनी ही व्यथा आमच्यापाशी बोलून दाखविली व असेही सांगितले की, 'नवभारता'तील काही लेखांच्या छायांकित प्रती काढून त्यांनी विद्यार्थ्यांना आवर्जून वाटल्या.

आमची अशी खात्री आहे की, महाविद्यालये, तेथील प्राध्यापक व विद्यार्थी तसेच गावोगावी विखुरलेले अभ्यासू नागरिक यांना 'नवभारत' वाचण्याची व त्यातील लेखांवर चर्चा करण्याची सवय लागून जाईल. या सर्वांनी आपले दर्जेदार लेख 'नवभारत'कडे अवश्य पाठवावेत.

यासाठी 'नवभारता'चा प्रसार झाला पाहिजे. आमची वाचकांना अशी विनंती आहे की, त्यांनी 'नवभारता'ला वर्गणीदार मिळवून देण्याची मोहीम चालवावी. जो वाचक पाच वर्गणीदार मिळवून देईल त्याने सहाव्या व्यक्तीचे नाव व पत्ता कळवावा. त्या सहाव्या व्यक्तीला 'नवभारता'चे अंक वर्षभर आमच्याकडून विनाशुल्क पाठवले जातील. वर्गणीदार कोणत्याही महिन्यापासून होता येते.

वर्षाची वर्गणी रू. ३००/- असून वर्गणी चेक/डी.डी./मनिऑर्डर यांच्याद्वारे 'नवभारता'च्या पत्त्यावर पाठवावी. चेक/डी.डी. 'नवभारत' मासिक, या नावाने ३१५, गंगापुरी, वाई ४१२८०३ या पत्त्यावर पाठवावे.

– संपादक मंडळ

लेखकांस आवाहन

नवभारत मासिकामध्ये दर्जेदार वैचारिक लेखनाचे आम्ही नेहमीच स्वागत करतो. पण नवभारतकडे आपले लेखन पाठविण्यापूर्वी काही काळजी घ्यावी अशी विनंती आहे.

१. आपले लेखन सुवाच्य अक्षरात कागदाच्या एकाच बाजूस असावे.

२. आपण लेखनासाठी जे संदर्भ वापरले असतील ते लेखाच्या शेवटी काही टीपा असल्यास त्यासह द्यावेत.

३. महत्त्वाचे म्हणजे आपण आपला लेख यापूर्वी कुठल्याही नियतकालिकात प्रसिद्धीसाठी पाठविलेला नाही याची स्पष्ट कल्पना नवभारतच्या संपादकांना द्यावी.

४. नवभारतमध्ये लेख छापण्यापूर्वी तो संपादक मंडळाच्या योग्य त्या सदस्याकडे वाचनासाठी व अभिप्रायासाठी पाठविला जातो त्यामुळे तो लेख कुठल्या महिन्यात नवभारतमध्ये येईल किंवा येणार नाही ते यथाकाश कळविले जाईल याची लेखकांनी कृपया नोंद घ्यावी.

आपल्या सहकार्याबद्दल संपादक मंडळ आपले आभारी आहे.

- संपादक मंडळ

अनुक्रमणिका

आपल्या ग्रंथालयात अवश्य हवीत अशी

प्राज्ञपाठशाळा मंडळ ग्रंथमालेची

संग्राह्य वैचारिक मराठी प्रकाशने

	सुधारित किंमत २० नोव्हेंबर २००६ पासून लागू
❑ **वैदिक संस्कृतीचा विकास** (तिसरी आवृत्ती) । तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी	३०० रु.
❑ **अद्वैतसिद्धीचे मराठी भाषांतर** (पूर्वार्ध) । ब्र. स्वामी केवलानंद सरस्वती	२०० रु.
❑ **पुरोहितवर्गवर्चस्व व भारताचा सामाजिक इतिहास** । डॉ. सुमंत मुरंजन	१२० रु.
❑ **हिंदी साहित्यविचार** । प्रा. प्यारेलाल गोहेल	२५ रु.
❑ **श्री. यशवंतराव चव्हाण अभिनंदन ग्रंथ**	६० रु.
❑ **संशोधन साधना** । डॉ. वसंत स. जोशी	६० रु.
❑ **तरंगयामिक व पुंजयामिक** । मा. ग. टोळे	२० रु.
❑ **आर्यांच्या सणांचा प्राचीन व अर्वाचीन इतिहास** । ऋग्वेदी	१५० रु.
❑ **वागीश्वरी** । डॉ. गो. के. भट	६० रु.
❑ **प्रस्थानभेद** (प्राचीन १४ विद्यांची माहिती) पुनर्मुद्रण । गं. वा. लेले	५० रु.
❑ **गिर्यारोहण परिचय** । अच्युत खोडवे	४० रु.
❑ **इतिहासाचे तत्त्वज्ञान** (दुसरी आवृत्ती) । सदाशिव आठवले	१३० रु.
❑ **दासशूद्रांची गुलामगिरी** (भाग २) । शरद पाटील	१५० रु.
❑ **शाहीर हैबती** । डॉ. शिवाजीराव चव्हाण	४० रु.
❑ **गीताचिकित्सा** । भाऊ धर्माधिकारी	१४० रु.
❑ **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी** (चरित्र) । सौ. मालती देशपांडे	२५ रु.
❑ **बौद्ध धर्माचा अभ्युदय आणि प्रसार** । प. ल. वैद्य	५० रु.
❑ **हिंदू धार्मिक परंपरा आणि सामाजिक परिवर्तन** (संवर्धित दुसरी आवृत्ती) । मे. पुं. रेगे	१६० रु.
❑ **पाच पुस्तक-परीक्षणे** । वा. म. कुलकर्णी	६० रु.
❑ **भेदविलोपन : एक आकलन** । अशोक केळकर	३० रु.
❑ **कॉलिंगवुडची कलामीमांसा - एक भाष्य** । रा. भा. पाटणकर	१०० रु.
❑ **धर्मश्रद्धा : एक पुनर्विचार** । दि.के. बेडेकर	३० रु.
❑ **आचार्य शं. द. जावडेकर : व्यक्तित्त्व आणि विचार**	१०० रु.
❑ **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, कार्य आणि विचार**	१५० रु.
❑ **इहवाद आणि सर्वधर्मसमभाव** । मे. पुं. रेगे	१२० रु.
❑ **प्राज्ञपाठशाळा आणि तिची परंपरा**	२०० रु.
❑ **चार्वाक : इतिहास आणि तत्त्वज्ञान** (तृतीयावृत्ती) । सदाशिव आठवले	१०० रु.
❑ **विनोबांची संस्कृत साम्यसूत्रे** (रसग्रहणात्मक मराठी अनुवाद) । वसंत नारगोलकर	१२० रु.
❑ **नागरी समाज, राज्यसंस्था आणि लोकतंत्र : भारतीय संदर्भात विवेचन** । द.ना. धनागरे	४० रु.
❑ **प्राचीन भारत : समाज आणि संस्कृती** (निवडक मौलिक लेखांचा संग्रह) । डॉ. म. अ. मेहेंदळे	५५० रु.
❑ हिंदुधर्माची समीक्षा आणि सर्वधर्मसमीक्षा (दुसरी आवृत्ती) । तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी	२२५ रु.
❑ पाश्चात्त्य नीतिशास्त्राचा इतिहास (दुसरी आवृत्ती) । प्रा. मे. पुं. रेगे	१६० रु.

१) ग्रंथालये व संस्थांना किंमतीत १० टक्के सूट. पोस्टेजचा खर्च वेगळा पडेल. २) व्ही.पी. ची पद्धत नाही.
३) पैसे मनिऑर्डरने वा ड्राफ्टने पाठवावेत.

संपर्कासाठी पत्ता : **चिटणीस, प्राज्ञपाठशाळा मंडळ, ३१५ गंगापुरी, वाई ४१२८०३ (जि. सातारा)**

हे मासिक घ.वा. जोशी यांनी अक्षरसाहित्य, ३५, गुरुकृपा सो., शाहूनगर, गोडोली, सातारा ४१५००१ येथे छापून सरोजा भाटे यांनी प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई यांच्याकरिता तेथेच प्रसिद्ध केले.

अनुक्रमणिका